आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, ३० जून २०२४



# पंढरी नगरी दैवत श्रीहरी



आधुनिक केसरी न्यूज

**पंढरीची वारी सध्या सुरू झालेली असून वारकरी समतेची पताका खांद्यावर घेतली आहे. ही दिंडी एकात्मतेची व,मानवतेचा धर्म शिकवणारी आहे. हा वारीचा सोहळा सर्वांना समान धाग्यात ओवणारा, धर्मा धर्मातील तेढ मिटवणारा आहे.धर्माच्या नावाने राजकारण करणाऱ्या व्यक्तीने प्रत्यक्ष दिंडीत येऊन पहावे, येथे कट्टरता, द्वेष, घृणा,तिरस्कार, मतलबी पणा, राग, कपट, छळ काहीही नाही, म्हणून वारकरी पंढरी नगरी दैवत श्रीहरी असे अभिमानाने म्हणतो. येथे आल्यानंतर प्रत्येक वारकऱ्याला आपुलकी, माया, प्रेम सहिष्णुता, जिव्हाळा, समानता मिळते. याचबरोबर रिंगणात धावणारे अश्व, माऊलीच्या पादुकांचे नीरास्नान प्रत्येक दिंडीत होणारी आरती, हरिपाठ, कीर्तन सेवा यामुळे वारकरी मनोमन सुखावतो या अभंगाचे निरूपण करीत आहेत. साहित्यिक विठ्ठल बरसमवाड यांच्या शब्दात हा केलेला लेखन प्रपंच...आषाढी वारी म्हणजे भक्तांनी घरापासून पंढरपूर पर्यंत केलेली पदयात्रा होय. ओढ लागते ती पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनाची। असंख्य वारकरी चिखल तुडवीत पावसात भिजत पंढरपूरच्या दिशेने मनात कसलाही भेदभाव न ठेवता निर्मळ मनाने देहभान विसरून पदयात्रा काढून जगाच्या पंढरीनाथाला भेटण्यास जातात. म्हणून पंढरीची वारी साठी संत नरहरी यांनी लिहिलेल्या अभंगाच्या माहितीचे निरूपण येथे करीत आहोत.**

**पंढरी नगरी दैवत श्रीहरी। जाती वारकरी व्रतनेमे।। 1।।**

युगेअठ्ठावीस पासून पांडुरंग हात कमरेवर ठेवून विटेवर उभा आहे. त्यांचे दर्शन घेऊन मन आनंदी होते. पंढरपूरला अनेक वारक-यांनी माहेर म्हटलेलं आहे. येथील दर्शनाने सर्व दुःख विसरून जातात.चंद्रभागेच्या काठी हा वैष्णवाचा मेळावा एकत्रित येतो आणि चंद्रभागे स्नान तुका मागे हेचि दान असे म्हणतो.आषाढी कार्तिकीला महान साधुसंत, भक्तगण, वारकरी दिंड्या पताकाची दाटी पंढरीत करतात. आणि मुखाने माऊली माऊली म्हणत पंढरपूरकडे प्रस्थान करतात.

**आषाढी कार्तिकी महापर्व थोर।।*भजनाचा गजर करिती तेथे ।। 2।**

श्री विठ्ठलाचे अमृतमय नाम माऊली माऊली वारकरी उच्चारतात या दिवशी पंढरपूरला जणू वैष्णवाचा मेळावा भरतो. मानला आनंद देणारे भजन येथे म्हटले जाते.जिकडे तिकडे वारकरी आनंदाने परमेश्वराच्या नामाचा जप करीत असतात. पंढरपूर ही अशी नगरी आहे की येथे प्रत्येक वैष्णव नतमस्तक होतो म्हणून पंढरपूरला आल्यानंतर माणूस जगायला, वागायला, शिकतो समतेची पताका खांद्यावर तो घेऊन एकात्मतेच्या दिंडीत प्रवेश घेतो ही दिंडी मानवता धर्म शिकवणारी असते साधुसंत थोर पताकाचा भार।।मुखी तो उच्चार नामामृत।।3।

पंढरीला येते वेळेस सर्व लहान, मोठे ,थोर, गरीब श्रीमंत एकत्रित येतात .भगव्या पताका त्यांच्या हातात असतात. कपाळाला गोपीचंदनाचा टिळा लावलेला असतो. खांद्यावर भगवी पताका घेऊन तो चालतो. हातात टाळ, मुखात पांडुरंगाच्या नामाचा जयघोष करत सर्व देहभान विसरून पंढरपूरात विलीन होतो, या पंढरपुरात लाखो वारकऱ्यांमध्ये आनंदी आनंद पसरलेला दिसतो, प्रत्येकाच्या मुखात नामाचा जयघोष चालू असतो हा वारीचा सोहळा सर्वांना समान धाग्यात बांधणारा आणि धर्मभेद मिटवणारा म्हणून ओळखला जातो ही वारी माणसाला जगायला बोलायला वागायला स्वतःची कामे स्वतः करायला शिकविते


**आनंदाचा गोपाळ काला केला।।।।*हृदयी बिंबला नरहरी।।4।।**

संत नरहरी महाराज म्हणतात. आनंदाचा गोपाळ काला केला आणि आमच्या हृदयात आनंदाचा गोपाळ काला झाला. सर्व भक्त तल्लीन होतात.हा पवित्र नयनरम्य सोहळा माझ्या मनात कायम ठसला आहे. पंढरीच्या तीर्थक्षेत्री माझे आराध्य दैवत आहे. सर्व वारकरी नित्यनेमाने व्रतस्थ पणे श्री विठ्ठलाचे दर्शन घेतात दरवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीला मोठा उत्सव पर्व सुरू होतो. वारकरी तेथे आनंदाने जातात. वारीमध्ये जे शिकायला मिळते ते इतर कुठेही मिळत नाही एक तरी ओवी अनुभवावी असे संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. तसे संत नरहरी महाराज एक तरी वारी अनुभवावी म्हणतात. वारी हा चैतन्याचा सोहळा आहे वारी ही एक सामाजिक प्रेरणा आहे. राम कृष्ण हरी



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड


मांडणी व सजावट
अतुल ह. खंडागळकर





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

माझे यश हे माझे एकट्याचे कधीच असू शकत नाही. माझ्या आजच्या उन्नतीसाठी ज्यांनी ज्यांनी हातभार लावला, त्यांच्यासाठी कृतज्ञतेची भावना माझ्या मनात असते का ? ती कधीतरी मी व्यक्त करतो का ? माझ्या ताटात येणारी पोळी, भाजी, भात आदी पदार्थ माझ्या पैशावर आलेले असतात हे जरी खरे असले तरी त्यामागे अनेकांचे कितीतरी परिश्रम असतात. शेतकरी मोठ्या कष्टाने शेत पिकवतो. धान्याची नेआण करणाऱ्या शेकडो हातांमुळे ते माझ्यापर्यंत पोहोचते. माझी आई, पत्नी, बहीण मोठया प्रेमाने माझ्यासाठी स्वयंपाक करते. तेव्हा कुठे हे सगळे पदार्थ माझ्या पानापर्यंत पोहोचतात. या सगळ्यांबद्दल प्रेम, कृतज्ञता आपण व्यक्त करतो का ? कधीतरी आई, पत्नी यांच्या जवळ जाऊन आजचं जेवण तू खूप छान बनवलं असं सांगतो का ? त्यांच्या चेहेऱ्यावरील समाधान, डोळ्यातील आनंद आपल्याला खूप काही देऊन जाईल. म्हणूनच योगदिन साजरा करताना जीवनातील हाही योग्यायोग्यतेचा योग ज्याला जमला, तो योगीच झाला. ज्ञानोबा माउली म्हणतात, ' अवघाचि संसार सुखाचा करीन, आनंदे भरीन तिन्ही लोक. ' यातच जीवनाचे सार्थक आहे.




## हितगुज





पुष्प
१०३वे

**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे,
दिंडोरी (नाशिक)**

### रामबाण उपाय!

ऐहिक सुखाच्या प्राप्तीकरिता नामस्मरण करणे, 'मी स्वामी महाराजांची सेवा करतो' ही अहंकाराची भावना बाळगणे अशा उपाधींमुळे आपल्या प्रगतीला अडथळे येतात, म्हणून स्वामी महाराजांसाठी नामस्मरण करावे आणि ते ही स्वतः स्वामी महाराज आपल्याकडून करवून घेतात या भावनेने करावे. श्री स्वामींच्या चरणी शरणागती येण्यासाठी त्यांचे अखंड स्मरण हाच 'रामबाण उपाय' आहे. मनुष्यप्राणी भवसागरात गटांगळ्या खातो आहे, समुद्रातून तरुन जाण्यासाठी जशी नाव, तसे भवसागरातून तरुन जाण्यासाठी श्री स्वामींचे नामस्मरण. दक्षता एकच, समुद्राचे पाणी नावेत येऊ नये तसे नामस्मरणात व्यत्यय येऊ देऊ नये. लग्नाला आलेल्या पाहुण्याला लग्न कसे पार पडेल ही काळजी नसते, पण घरातल्या माणसाला फार काळजी वाटते. आपल्या प्रपंचात आपण पाहुण्यासारखे रहावे. देहादिक सर्व श्री स्वामी महाराजांचे चरणी अर्पण करुन निश्चिंत होऊ. श्री स्वामींचे स्मरण हे सर्वांना सारखेच साधन आहे. सूर्य प्रकाश देतो, अंधार मात्र आपोआप नाहीसा होतो. नामस्मरणाने परब्रम्हाचे प्रेम वाढते, आपले दोष मात्र आपोआप नाहीसे होतात. भगवंताच्या कर्तृत्वाची साक्ष जास्ती जास्त अनुभवास येऊ लागली, की परमार्थामध्ये आपली प्रगती झाली असे समजावे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

त्याला शाबरी विद्येत प्रवीण केले. अस्त्रविद्येतही निपुण केले. योगबळामुळे गोरक्षनाथांनी चिरंजीवित्व प्राप्त करून घेतले होते.



सिद्ध सिद्धांतपद्धती, अमनस्कयोग, विवेकमार्तंड, गोरक्षबोध, गोरक्ष शतक इत्यादी त्यांचे ग्रंथ प्रसिध्द आहेत. गिरनारपर्वतातील श्रीदत्तात्रेयाच्या आश्रमात गोरक्षनाथ राहिले. चौऱ्याऐंशी सिद्धांपासून नाथपंथ भरभराटीस आला. नेपाळी लोक गोरक्षनाथांना पशुपतीनाथाचा अवतार मानतात. नेपाळमध्ये काही ठिकाणी त्यांचे आश्रम आहेत. त्याच प्रमाणे उत्तरप्रदेश येथिल गोरखपुर जिल्ह्यात गोरक्षनाथांचे भव्य मंदिर आहे.

एकदा गुरु गोरक्षनाथ तीर्थाटन करत एका गावामध्ये आले. गावाबाहेर एक मारुतीचे देऊळ होते, तेथे ते थांबले. एक-दोन दिवस झाल्यावर हळूहळू गावातील मंडळी नाथमहाराजांकडे येऊ लागली. प्रतिदिन येण्या-जाण्यामुळे गावातील लोकांची त्यांच्याशी बरीच जवळीक निर्माण झाली. लोक त्यांना अध्यात्मविषयक शंका विचारू लागले. प्रपंचातील अडचणी सांगू लागले. तेही त्या सर्वांना योग्य उत्तरे देऊन त्यांचे समाधान करू लागले. काही वेळा ते एखाद्या विषयावर लोकांना मार्गदर्शन करुन अचंभित करत आसत. एके दिवशी गावातील मंडळी जमली असता नाथ त्यांना म्हणाले, "बाबांनो, प्रपंचामध्ये कधीच कोणाला पूर्ण सुख मिळाले नाही; म्हणून आहे त्या परिस्थितीत समाधान टिकवण्याचा प्रयत्न करावा आणि भगवंताचे नाम घ्यावे, भगवंताची निरपेक्ष सेवा करावी. यातच खरा आनंद आहे." त्यांचे हे बोलणे ऐकून साठ वर्षांचे एक गृहस्थ एकदम चिडून नाथांना म्हणाले, "प्रपंचामध्ये समाधानी रहावे, असे सांगायला काय जाते; पण ते शक्य आहे का? माझंच बघा, माझा एक मुलगा बारा वर्षांचा आहे, त्याची अजून मुंज व्हायची आहे. दुसरा मुलगा अठरा वर्षांचा आहे, त्याचे शिक्षण अर्धवट झालेले आहे. सर्वांत मोठी मुलगी आहे तिला वीस वर्षे पूर्ण झाली, तरी तिचे लग्न जमत नाही. मुलांच्या काळजीने बायको खंगत चालली आहे. तिला औषधपाणी करावे लागते. या सर्वांसाठी माझी मिळकत अपुरी पडते. अशा परिस्थितीत काळजी करू नको तर काय करू?" नाथांनी त्या गृहस्थाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. नंतर ते हसून त्याला म्हणाले, "काळजी करून प्रपंचातील प्रश्न सुटतात का ? आजपर्यंत आपण काळजी करत आलात, त्याने तुंमच्या समस्या दुर झाल्या का? तरी कोणतीही गोष्ट केवळ काळजीने सुटली नाही. हे कळूनसुद्धा आपल्याला असे वाटत नाही की, आतापर्यंत केली तेवढी काळजी पुरे. काळजी करण्यापेक्षा मनाचे समाधान जर टिकवले आणि चित्त भगवंताच्या नामावर केंद्रित केले, तर मार्ग सापडण्याची शक्यता जास्त असते. भगवंत सर्वशक्तीमान असल्यामुळे त्याला सर्व गोष्टी शक्य आहेत. तो आपल्या भक्ताच्या मार्गातिल काटे अलगत दुर ककतो. यासाठी जास्तीतजास्त वेळ भगवंताचे नाम स्मरण चिंतन करावे आपला वेळ त्यात जास्तित जास्त घालवावा." हे सर्व ऐकल्यावर त्या गृहस्थाला आपली चूक समजली.



आधुनिक केसरी

**मनी आळवावा | मौनराग ||**

सद्गुणांचा संग | घडो वेळोवेळा ||
आणिकांचा लळा | काय कामी ||१||
दुर्गणांचा संग | दोषास कारण ||
जिवंत मरण | क्लेशदायी ||२||
सात्विकाचे पोटी | जन्म राक्षसाचा ||
कर्म भोग त्याचा | नरकचि ||३||
सुख दुःख सारे | कर्माचे फलित ||
संत संगतीत | शुद्ध होते ||४||
निस्संग होऊनी | आत्मबोध घ्यावा ||
मनी आळवावा | मौनराग ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आत्म ज्ञान बाहर भया,
जगत दृश्य सब देख ।
अन्तरमुख सोइ ज्ञान से, परब्रह्म कहँ
पेख ।।१०।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
दशम अध्याय) ०२/१०/१०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
आत्म्याची शक्ती मन, इंद्रियांद्वारे जेव्हा बाहेर जाते, तेव्हा ती बाह्य जगताला बघते. याच शक्तीला आत्मा जेव्हा अंतर्मुख करून दिव्य ज्ञानाने अंतरात बघतो तेव्हा तो परब्रह्माचा साक्षात्कार करतो.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी

स्थिर रूपात ती संपूर्ण विश्वाला अनंतकाळ टिकवून धरते. तर गतिमान रूपात ती विश्व निर्माण करून त्यामध्ये वेगवेगळ्या घडामोडी घडवून आणते. शक्ति ही जाणीव संपन्न आहे. म्हणजेच मूळमायेचे रूप जाणीव रूप आहे. जाणीव ही अत्यंत शांत ,स्थिर,ज्ञानमय,अनंत व आनंदी स्वरूपाची असते. तिच्या अस्तित्वाची जाणीव आनंद निर्माण करून देत असते. जाणीव रूपातील तिचे अस्तित्व कधी दिसते तर कधी दिसत देखिल नाही. शक्ति जाणीव रूप असते हे दाखवताना समर्थ आपल्याला तिचे वर्णन सांगतात. मूळमाया जाणीव रूप आहे. स्वस्वरूप हे जाणीवेने मूळ ठिकाण असून तिथे ती सहज रहाते. स्वस्वरूपी लीन असणारी जाणीव शांत व स्तब्ध असते. तर विश्व मध्ये ती गतिमान होऊन कर्तृत्व गाजवते. आपण व्यक्तीचं म्हणलेलं आहे की जाणीवेचे रूप कधी दिसते तर कधी दिसत नाही. आत्ता बघा ना मित्रांनो नुकताचं उन्हाळा संपून पावसाळ्याची सुरुवात झाली पावसाचे पाणी कधी उफाळून वर येते तर कधी पाणी नाही म्हणून जनता पण त्रस्त होते.कधी पाण्याचा प्रवाह आडवला जातो. त्याच /प्रमाणं जाणीव कुठे गुप्त होते तर कुठे प्रगट होते. जाणीव नेणीव स्थिर व गतीमान आहे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## ऐसा करावा काही नेम । जेणे जोडेल आत्माराम ॥

आधुनिक केसरी

ऐसा करावा काही नेम । जेणे जोडेल आत्माराम ॥ नेम असावा शाश्वताचा । जेणे राम कृपा करील साचा ॥ नेम असावा वाचा मन । जेणे संतुष्ट होईल रघुनंदन ॥ कर्तव्यात गुंतवावे शरीर । जेणे संतोषे रघुवीर ॥ सतीला नसे दुजे दैवत जाण । तिला पति एकच प्रमाण ॥ न पाहावे त्याचे दोष गुण । आपले कर्तव्य करावे जतन ॥ पतिव्रताधर्म श्रेष्ठ भारी । वंदिताती संत महामुनि ॥ पतिआज्ञा प्रमाण । हेच मुख्य साध्वीचे लक्षण जाण ॥ न बोलावे उणेपुरे । जे परमात्म्यास न आवडेल खरे ॥ संतति व संपत्ति । भगवत्कृपेने ज्याची प्राप्ति । त्याचे करावे रक्षण । पण न गुंतू द्यावे मन ॥ जे आवडेल पतीला पाही । तो तो आपला धर्मच राही ॥ मनाने करावे भगवंताचे स्मरण । जेणे चुकेल जन्ममरण ॥ अखंड राखावे समाधान । चुको न द्यावे अनुसंधान ॥ काया गुंतवावी प्रपंचात । मन असावे रघुनाथात ॥ प्रपंचात राखावी खबरदारी । मन लावावे रामावरी । त्याचा राम होईल दाता । न करावी कशाची चिंता ॥ मुखी असावे नामस्मरण ।



हृदयात भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव । शुद्ध राखावे आचरण । पवित्रतम अंतःकरण । मुखाने भगवंताचे स्मरण । त्यावर कृपा करील रघुनंदन । हा ठेवावा विश्वास । अनुभव येईल नक्की खास ॥ पतीस करावे एकदा तरी नमन । रामरूप जाणून ॥ त्याचे जाणावे मनोगत । तैसे वर्तणे हे आपले हित ॥ ऐसा नेम ज्याचे घरी । राम उभा त्याचे दारी ॥ आल्या अतिथा अन्न द्यावे । कोणास विन्मुख न पाठवावे । राम कर्ता हा ठेवा भाव । कमीपणाला नाही ठाव ॥ सर्वांचे उगमस्थान एक । हे धरावे चित्ती । त्याला नाही कशाची भीति । रामाविण न पाहावे जग । समाधानाची खूण हीच सत्य ॥ जे जे काही यावे । ते ते रामापासून आले । हा ठेवावा भाव॥ साक्षित्वाने देहाचा प्रपंच पाहावा । अंतरी रघुनाथ भजावा ॥ देहाची गति प्रारब्धाचे हाती । ऐसे शास्त्रे सांगती। परि न येई हे चित्तीं । एकच जगती माझा रघुपति । मुखानें घ्यावे रामनाम । हृदयीं परमात्म्याचें प्रेम । याहून दुजा न करावा विचार । हा ठेवावा निर्धार । चातुर्मासांत करावी सुरुवात । अखंड चालवावा हा हेत ॥ थोडा नेम सांगतो कांही । तो करूनिया पाही ॥ घ्यावें भगवंताचें नाम । खात, पीत, करीत असता काम । होईल तेवढे करावें जतन । परमात्मा पुरे करील हे जाणावे ॥ सर्वांस सांगावे आशीर्वाद । सर्वांनी जोडावा भगवंत ॥

**१८२. मागणे तुम्हा एकच पाही । नामावाचून दूर कधी न राही ॥**

## निरूपण

आधुनिक केसरी

नाना स्तुती आणी स्तवनें । मर्यादा धरावी ॥ ५४॥
जो अन्न देतो उदरासी । शेरीर विकावें लागे त्यासी ।
मां जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ॥ ५५॥
अहिर्निशीं ज्या भगवंता । सकळ जिवांची लागली चिंता ।
मेघ वरुषे जयाची सत्ता । सिंधु मर्यादा धरी ॥ ५६॥
भूमि धरिली धराधरें । प्रगट होईजे दिनकरें ।
ऐसी सृष्टी सत्तामात्रें । चालवी जो कां ॥ ५७॥

रविवार, ३० जून २०२४
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २९६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

•MARATHI •DAINIK •CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 30 JUNE 2024 | adhunikkesari.com | •YEAR-03 •ISSUE-296 •RNI : MAHMAR/2021/82566 •PAGE-16 •PRICE-05

# जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले माऊलींच्या पालखी रथाचे सारथ्य

## आपेगावहुन संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा पंढरीकडे मार्गस्थ

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** टाळ, मृदंगाचा गजर आणि संत ज्ञानेश्वर माउलीचा जयघोष व असंख्य वारकरी, भाविकांच्या उपस्थितीमध्ये श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याने शनिवारी 29 रोजी सकाळी ८ वाजता श्रीक्षेत्र आपेगांवहुन निघुन आगरनांदर येथे पहीला विसावा घेवुन दुपारी २ वा कुरणपिंपरी मार्गे पंढरपुरकडे मार्गस्थ झाली. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज पाई पालखी सोहळ्याला निरोप देण्यासाठी खासदार डॉ.कल्याण काळे यांनी माऊलींच्या पादुकांचे दर्शन घेवून पालखी रथात ठेवुन पाई जाण्यार्या सर्वच वारकरी भाविकांना शुभेच्छा दिल्या.प्रसंगी संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर अध्यक्ष ज्ञानेश्वर विष्णु महाराज कोल्हापूर यांनी संस्थानच्या वतीने खासदार डॉ.कल्याण काळे यांचे शाल श्रीफळ देवुन सत्कार केला. माजी आमदार संजय वाघचौरे, दत्तात्रय गोर्डे,रवींद्र काळे, भाऊसाहेब औटे,व्हॉ.चेअरमन प्रल्हाद औटे,प्रा.युवराज औटे,रामकाका औटे,माजी



सरपंच अशोक औटे यांनी माऊली तसेच मातापिता पादुकाकाचे दर्शन घेतले.



माऊली पालखीच्या पहिल्या विसावा माऊली पेट्रोल पंप आपेगाव येथे संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सपत्नीक दर्शन घेत ज्ञानोबा माऊलीच्या जयघोषात फुगडीचा आनंद घेवून विण्याची सेवा करत संत ज्ञानेश्वर महाराज पालखी रथाचे सारथ्य करुन आनंद साजरा करत वारकरी भाविकांना शुभेच्छा देवुन आपेगाव येथील पालखी सोहळ्यास पंढरपुर कडे मार्गस्थ होताना निरोप दिला.त्यांच्या सोबत तहसीलदार सारंग चव्हाण,मुख्याधिकारी संतोष आगळे, सौ.करूना दिलीप स्वामी, दिलीप बावस्कर, मंडळ अधिकारी चित्रा धाडेकर, अश्विनी शेळकेसह महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# आर्थिक सहाय्याता लाभार्थ्यांना दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील सर्वसामान्य, वंचित-उपेक्षित,



आर्थिक दुर्बल घटकांसाठी शासनाने विविध योजना सुरु केल्या आहेत. पात्र लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ वेळीच मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, दिव्यांग बांधवांसाठीच्या योजनांसह सर्वच विशेष सहाय्याच्या योजनांचे पैसे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याचे निर्देश देण्यात येतील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून आमदार बच्चू कडू यांच्याकडून दुर्बल घटकांना वेळेवर आर्थिक सहाय्य मिळत नसल्याबाबत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यांसंदर्भात माहिती दिली. अधिवेशनातील आजच्या दिवसाचे कामकाज संपल्यानंतर वित्त विभागाच्या सचिवांशी चर्चा करून याबाबतच्या वस्तुस्थितीची माहिती घेण्यात येईल. श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, दिव्यांग बांधवांसाठीच्या योजनांसह सर्वच विशेष सहाय्याच्या योजनांसाठी राज्य शासनाने निधीची भरीव तरतूद केली आहे. त्यामुळे या योजनांमधून मिळणारे आर्थिक सहाय्य वेळेवर लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होणे गरजेचे आहे. आर्थिक योजनांच्या सर्वच योजनांचे पैसे लाभार्थ्यांना प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला मिळण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येतील.

# राज्याच्या आर्थिक धोरणासंदर्भात श्वेतपत्रिका काढा

## मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांची अर्थमंत्र्यांकडे पत्राद्वारे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य सरकारच्या वतीने शुक्रवारी अर्थसंकल्प जाहीर करण्यात आला होता. यानंतर आता महाराष्ट्राच्या आर्थिक धोरणासंदर्भात श्वेतपत्रिका जाहीर करण्याची मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे मुख्य प्रवक्ते महेश तपास यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांना पत्राद्वारे केली आहे.

महेश तपासे म्हणाले की, राज्य सरकारच्या वतीने शुक्रवारी अर्थसंकल्प जाहीर करण्यात आला. शिंदे सरकारचा हा शेवटचा अर्थसंकल्प अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी विधानसभेत मांडला. अर्थमंत्री यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात अनेक घोषणा करण्यात आल्या. मात्र या घोषणा कशा प्रकारे पूर्ण करणाऱ्या संदर्भात कुठलीही ठोस माहिती देण्यात आली नाही आहे. असे तपासे म्हणाले.

पुढे महेश तपासे म्हणाले की, अर्थमंत्री अजित पवार यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पा मध्ये अनेक धक्कादायक गोष्टी समोर आल्या आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचा दरडोई उत्पन्न मागील वर्षी देशाच्या पाचव्या स्थानी होतं ते आता सहाव्या स्थानी आलं आहे. विशेष म्हणजे यामध्ये आपल्याला गुजरातने मागे टाकले आहे. महाराष्ट्राच्या जनतेच्या डोक्यावर असलेले कर्ज कशाप्रकारे कमी होणाऱ्या संदर्भात कुठलेही ठोस माहिती अर्थमंत्री यांनी दिलेली नाही आहे. महाराष्ट्राचा जीडीपी वाढवण्यासंदर्भात अर्थमंत्र्यांकडे कुठली ठोस उपायोजना आहे या संदर्भात कुठलाही खुलासा करण्यात आलेला नाही आहे. असेही महेश तपासे यांनी म्हटले आहे.

महेश तपासे म्हणाले की, राज्य सरकारच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या योजना संदर्भात राज्य सरकार पैसा कुठून आणणार आहे. यासंदर्भातील माहिती महाराष्ट्रातील जनतेला मिळाली पाहिजे. या संदर्भात राज्य सरकारने श्वेतपत्रिका काढायला पाहिजेत. यामध्ये कर्ज, व्याज आणि मुद्दल कशा प्रकारे चुकवली जाते आहे. तसेच १ ट्रिलियनचे अर्थव्यवस्था महाराष्ट्राची करण्यासंदर्भात सरकारकडे कोणते ठोस उपाययोजना आहे. हे या श्वेतपत्रिकामधून महाराष्ट्रातील जनतेला कळल पाहिजे. त्यामुळे अर्थमंत्री अजित पवार यांनी श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी पत्राद्वारे महेश तपासे यांनी केली आहे.




# सामाजिक न्याय : आरक्षण आणि शासन



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८४२४२५४

आधुनिक केसरी

**सामाजिक न्याय म्हणजे समाजातील प्रत्येक व्यक्तीला न्याय, समानता आणि सन्मान प्राप्त होणे. हे तत्त्व प्रत्येकाच्या मानवाधिकारांचे संरक्षण करण्यावर आधारित आहे. सामाजिक न्याय ही एक महत्वपूर्ण संकल्पना आहे जी आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरांवर समान संधी प्रदान करण्यासाठी आवश्यक आहे. शासनाची भूमिका सामाजिक न्याय साध्य करण्यात अत्यंत महत्त्वाची आहे, कारण शासनाचे धोरण आणि कार्यक्रम समाजाच्या रचनेत मूलभूत बदल घडवू शकतात. सामाजिक न्यायाच्या संकल्पनेत समाविष्ट घटक हे अनेकविध आहेत. यात आर्थिक समानता, शिक्षणाची संधी, आरोग्यसेवा, रोजगार आणि नैतिक मान्यता यांचा समावेश आहे.**



## क्षितिजापल्याड

सामाजिक न्यायाचे मुख्य तत्त्व म्हणजे प्रत्येक व्यक्तीला आपल्या क्षमता आणि आवडीनुसार प्रगती करण्याची संधी मिळावी आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव होऊ नये. शासनाची भूमिका सामाजिक न्याय साध्य करण्यासाठी विविध स्तरांवर कार्य करणे आवश्यक आहे. शासनाचे विविध धोरणे आणि कार्यक्रम हे सामाजिक न्यायाची अंमलबजावणी करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतात. शासनाने आर्थिक असमानता कमी करण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. यामध्ये गरीब आणि वंचित घटकांना आर्थिक मदत, रोजगाराच्या संधी आणि उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणे यांचा समावेश आहे. यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी केली जाऊ शकते. जसे की मनरेगा, प्रधानमंत्री रोजगार योजना आणि स्टार्टअप इंडिया. शिक्षण हे सामाजिक न्यायाचे एक महत्त्वपूर्ण अंग आहे. शासनाने प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत. यामध्ये सरकारी शाळांचे उन्नतीकरण, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि उच्च शिक्षणाच्या संधी वाढवणे यांचा समावेश आहे. सर्वांसाठी शिक्षणाचा हक्क हा कायद्यानुसार सुनिश्चित करणे आवश्यक आहे. सर्वांना सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. यासाठी शासनाने विविध आरोग्यविमा योजना, सरकारी रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी करणे आवश्यक आहे. आयुष्मान भारत योजना याचे एक उत्तम उदाहरण आहे. शासनाने जात, धर्म, लिंग आणि आर्थिक स्थितीवर आधारित कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला आळा घालण्यासाठी कठोर कायदे आणि त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विशेष कायदे आणि आरक्षणाचे धोरण यांचा समावेश आहे. महिलांच्या हक्कांचे रक्षण आणि त्यांच्या सशक्तीकरणासाठी शासनाने विविध योजना आणि कार्यक्रम राबवले पाहिजेत. यामध्ये स्त्री-शिक्षण, रोजगार संधी, सुरक्षितता आणि आरोग्य सुविधांचा समावेश आहे. बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना आणि महिलांसाठी विशेष कर्ज योजना याची उदाहरणे आहेत. समाजातील वंचित घटक, जसे की दिव्यांग, वृद्ध आणि अल्पसंख्याक यांचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठी शासनाने विशेष योजना आणि कार्यक्रम राबवले पाहिजेत. दिव्यांगांसाठी विशेष शैक्षणिक आणि रोजगार संधी, वृद्धांसाठी पेन्शन योजना आणि अल्पसंख्याकांसाठी शैक्षणिक आणि आर्थिक सहाय्य यांचा समावेश आहे. सामाजिक न्याय साध्य करण्यासाठी शासनाने विविध धोरणे आणि कार्यक्रमांची अंमलबजावणी केली आहे. या धोरणांमध्ये सामाजिक न्यायाचे तत्त्व समाविष्ट असले पाहिजे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. हे धोरण शिक्षण, सरकारी नोकऱ्या, आणि निवडणुकीतील प्रतिनिधित्वात समानता साध्य करण्यासाठी आहे. भारतीय इतिहासात आणि सामाजिक संरचनेत जातीय भेदभाव, अस्पृश्यता आणि विषमता या समस्या दीर्घकाळापासून आहेत. या समस्या दूर करण्यासाठी आणि सामाजिक न्याय साध्य करण्यासाठी आरक्षणाची संकल्पना आली. अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि इतर मागासवर्ग (OBC) यांना आरक्षणाच्या माध्यमातून समाजात मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केला जातो. आरक्षणामुळे समाजातील दुर्बल घटकांना शैक्षणिक आणि व्यावसायिक संधी मिळाल्या आहेत. यामुळे त्यांचे जीवनमान उंचावले आहे. आरक्षणामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांमधील अनेकांनी उच्च शिक्षण घेऊन उच्च पदावर पोहोचण्याची संधी मिळवली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शिक्षणाची संधी मिळाल्यामुळे त्यांचा आर्थिक स्तर सुधारला आहे. आरक्षणामुळे काही



समाजघटकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. काही लोकांचा असा आरोप आहे की आरक्षणामुळे गुणवान पण आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांना संधी मिळत नाही. हे ताणतणाव सामाजिक सौहार्दाला हानी पोहोचवू शकतात. आरक्षणाच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणि निष्पक्षता आवश्यक आहे. आरक्षणाचा लाभ योग्य व्यक्तींनाच मिळावा यासाठी कठोर नियम आणि तंत्रे आवश्यक आहेत. शासनाने सामाजिक न्याय साध्य करण्यासाठी विविध धोरणे आणि कार्यक्रम राबवले पाहिजेत. यामध्ये आर्थिक समता, शिक्षणाची संधी, आरोग्यसेवा, आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना अनुसरून आरक्षणाच्या नियमांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. शासनाने आर्थिक असमानता कमी करण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करावी. गरीब आणि वंचित घटकांना आर्थिक मदत, रोजगाराच्या संधी आणि उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी दिली गेली पाहिजे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जात, धर्म, लिंग यांच्या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव नसावा. सर्वांना सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. यासाठी विविध आरोग्यविमा योजना, सरकारी रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणी करणे आवश्यक आहे. महिलांच्या हक्कांचे रक्षण आणि त्यांच्या सशक्तीकरणासाठी शासनाने विविध योजना आणि कार्यक्रम राबवले पाहिजेत. समाजातील वंचित घटक, जसे की दिव्यांग, वृद्ध आणि अल्पसंख्याक यांचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठी शासनाने विशेष योजना आणि कार्यक्रम राबवले पाहिजेत. सामाजिक न्याय आणि आरक्षण हे दोन्ही विषय परस्पर संबंधित आहेत. सामाजिक न्याय साध्य करण्यासाठी आरक्षणाची गरज आहे, परंतु त्याची अंमलबजावणी करताना पारदर्शकता, निष्पक्षता आणि सुधारणा आवश्यक आहेत. सामाजिक न्याय साध्य करणे हे कोणत्याही समाजासाठी आवश्यक आहे. शासनाने यासाठी विविध धोरणे आणि कार्यक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. आर्थिक समता, शैक्षणिक संधी, आरोग्यसेवा, आणि भेदभाव विरोधी उपाययोजना यांसारख्या मुद्द्यांवर काम करून सामाजिक न्याय साधता येईल. शासनाच्या या प्रयत्नांमुळे समाजातील प्रत्येक घटकाला न्याय, समानता, आणि सन्मान प्राप्त होऊ शकतो. सामाजिक न्याय साध्य करणे हे एक सतत चालणारे कार्य आहे, ज्यासाठी शासन, समाज आणि व्यक्ती यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. फक्त अशा प्रकारेच आपण एक सशक्त, न्यायप्रिय, आणि समरस समाज निर्माण करू शकतो.

# मानवी जीवनाला खरंच काही अर्थ नाही ?



बबन गुळवे
मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**गाढ झोपेत असताना मध्य रात्री नंतर,दीड वाजताच्या सुमारास मोबाईलवर फोन आल्याची रिंग वाजली.एवढ्या मध्यरात्री गावाकडे राहणाऱ्या बहिणीचा तो फोन होता.मनात कसंतरीच झालं. मोबाईल खणखणत होता.भीत भीत फोन उचलला आणि बहिणीने रडत रडतच माझी काकी सीताबाई गुळवे हिच्या निधनाची वार्ता ऐकवली.काळजात धस्स झालं, मनात अतीव दुःखाची वेदना दाटून आली.चार दिवसांपूर्वी मला भेटलेली माझी काकी अल्पशा आजाराने मृत्यू पावली. सुख दुःखाच्या अनेक आठवणी मागे ठेवून काकी या जगातून निघून गेली होती.**

सकाळ होताच मी गावाकडे चालता झालो. काकीच्या निधनाने शोककळा पसरली होती. माझ्या बहिणी व इतर नातेवाईक स्त्रिया रडत होत्या. काकीच्या स्मृती आठवून आणखी रडत होत्या. साडे अकराच्या सुमारास सार्वजनिक स्मशानभूमीत काकीच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तिच्या मुलाने चितेला अग्नी दिला.बघता बघता चीता पेटली. चीतेच्या जाळा बरोबर माझी काकी अनंतात विलीन होत होती. सगळे नातलग पांगले. जळणाऱ्या चितेजवळ आम्ही मोजके लोक थांबलो होतो.त्या जळणाऱ्या चीतेकडे पाहून कोणीतरी म्हणाले,'माणसांचे काही खरे नाही, मानवी जीवन क्षणभंगुर आहे,पाण्यावरचा बुडबुडा आहे.' मी त्यावर भाष्य केले,'फक्त स्मशानभूमीत आल्यावरच व्यक्ती असा विचार करतो, इथून घरी गेला की आपल्याच मस्तीत जगतो'. होय, हे अगदी खरे आहे की मानवी जीवनाला काहीच अर्थ नाही. परंतु, मिळालेले जीवन सन्मार्गाने जगून, आपल्या जीवनाला सत्कारणी लावून जीवनाला अर्थ मिळवून देता येतो.पण ही बाब सहसा कोणाच्याही लक्षात का बरे येत नाही याचेही वाईट वाटते. आजकाल माणसे निष्ठूर झाली आहेत, निर्जीव व भावनाहीन झाले आहेत. त्यामुळे परोपकार, दया, सहानुभूती, कर्तव्य व मानवता विसरून मनमानी जीवन जगत आहेत. सर्व नातेवाईकांनी मिळून मिसळून, एकमेकांना समजून घेऊन आणि एकमेकांच्या भावनांची कदर करून जीवन जगले पाहिजे. भाकरी तर सगळेच कमावतात पण कमावलेली भाकरी कुटुंबासोबत एकत्र बसून खाता आली पाहिजे. यातून जे सुख समाधान मिळते ते दुसरीकडे कुठे मिळत नाही. जन्म मिळणे,लाडाकोडात लहानाचे मोठे होणे, शिक्षण शिकणे, तरुणपणात नोकरी किंवा व्यवसाय करणे, लग्न करणे, संसारात रमणे, लेकरांसाठी घर बांधणे, सेवानिवृत्त झाले की उर्वरित जीवन जगणे आणि एके दिवशी जगाचा निरोप घेणे म्हणजे मानवी जीवन नव्हे. आपल्याला इतरही नातेवाईक असतात,त्यांच्या अडी अडचणीत आपण उपयोगी पडले पाहिजे. मित्रांच्या मदतीला धावून जाता आले पाहिजे. समाजासाठी मदतीचा हातभार लावता आला पाहिजे. तेव्हा कुठे आपल्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो. वडिलांनी कमावलेल्या संपत्तीच्या वाटणीसाठी भांडणारे भाऊ, वृद्ध आईवडिलांना वृध्दाश्रमात पाठवणारे वंशाचे दिवे, भावा बहिणींना अंतर देणारे आणि आपल्या धुंदीत एकलकोंडे जीवन जगणारे लोक आपल्या अवतीभवती असतात.अशा व्यक्तींच्या जीवनाला




कसा काय अर्थ प्राप्त होईल?अशा लोकांचे जीवन म्हणजे निर्थक आदळ आपट असते. संत महात्मे, समाजसुधारक, विचारवंत, स्वातंत्र्य सैनिक व महामानवांनी संपूर्ण आयुष्य समाजासाठी, सामान्य जनतेच्या कल्याणासाठी खर्ची केलेले आहे. म्हणून त्यांच्या जीवनाला कायमस्वरूपी अर्थ प्राप्त झाला आहे.म्हणूनच आपण त्यांची जयंती व पुण्यतिथी साजरी करत असतो. त्यांचे विचार आत्मसात करून आपण चांगले जीवन जगू लागलो तर आपल्या जीवनाला सुध्दा नक्कीच अर्थ प्राप्त होतो.फक्त तशी चांगली वृत्ती व चांगली दृष्टी आपल्याकडे असायला हवी.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# डॉ. रामक्रीष्ण शिंदे : वैद्यकीय क्षेत्रापासून शिक्षण महर्षीपर्यंतचा जिद्दीचा प्रवास



सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

आधुनिक केसरी

अवलिया माणसंच इतिहास घडवू शकतात , संधीभोळी माणसं त्यांचं स्वतःच आयुष्य फक्त नाकाच्या सरळ रेषेत जगू शकतात. आव्हाने पेलण्याची त्यांच्यात क्षमता नसते,त्यामुळे त्यांच्यात नवनिर्मितीचा अभाव असतो.परंतु तरीही साध्या भोळ्या माणसांना समाज देवमाणूस म्हणत असतो.अशी देवमाणसं समाजाच्या उपयोगाची नसतात हे माहिती असतांना देखील ते 'देवमाणूस' या उपाधीला पात्र ठरतात. जो कपबशी धुईल त्याच्याच हातून कपबशी फुटत असते,जो त्या कपबशी ला हातच लावत नाही त्याच्याकडून फुटण्याची शक्यताच नसते. काहीतरी केल्याशिवाय नवीन काही घडत नाही.  नफा-तोटा,यश-अपयश हे येतच राहणार.परंतु त्यातून धडा घेत काहीतरी निर्माण करण्याची किंवा जगावेगळं करण्याची अंगी हिंमत व तसे कसब असावे लागते. डॉ. रामक्रीष्ण शिंदे हे मेहकर शहरातील प्रख्यात दंतरोग तज्ञ. ग्रामीण भागातून मेहकरात येत शिवाजी नगर सारख्या शहराच्या एका भागात हा माणूस आपला दवाखाना उभा करतो. लोकांची सेवा करतांना वैद्यकीय क्षेत्रासोबतच काहीतरी वेगळं करण्याची जिद्द अंगी बाळगतो.

वेगवेगळ्या व्यवसायात उतरून त्यात अपयश येऊन ही खचून जात नाही,उलट त्यातून पुन्हा नव्याने उभा राहतो आणि बघता बघता वाशीम



आणि बुलढाणा जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात मोठी भरारी घेत हजारो मुलामुलींसाठी शिक्षणाची दालने उभी करतो आणि शैक्षणिक क्षेत्रातील ही गगनभरारी पाहून समाज ह्या माणसाला शिक्षण महर्षी ही पदवी देतो हा या सामाजिक पदवी पर्यंतचा प्रवासच मुळात किती रंजक आणि संघर्षाने भरलेला आहे हे बघणे देखील मला महत्वाचे वाटते.  वाशीम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील खंडाळा शिंदे हे डॉ रामक्रीष्ण शिंदे यांचे मुळगाव. स्व सौ सुभद्राबाई आणि स्व भिवसन पाटील शिंदे यांचे हे पाचवे अपत्य. एकूण चार भाऊ आणि एक बहिण.डॉ रामक्रीष्ण शिंदे हे सर्वात लहान. शेतकरी कुटुंबातील असतांना सुद्धा त्यांनी बी डी एस पर्यंतचे शिक्षण घेतले. सर्वात लहान असल्याने स्वभावात हट्टीपणा, जिद्दीपणा, आपला वैद्यकीय व्यवसाय सुरळीत सुरू असताना ट्रॅक्टर ट्रॉली तयार करण्याचा व आपल्या मूळ पेशाशी दुरान्वये सबंध नसलेल्या व्यवसायात उडी घेतली. स्वतःची प्रॅक्टिस सांभाळून त्यांनी हा व्यवसाय उभा केला खरा पण त्यात त्यांना यश आले नाही. या व्यवसायात अपयश आल्यानंतर थोडा ब्रेक घेत नंतर त्यांनी म्हशी घेतल्या.त्यांच्या साठी डोंणगाव-मालेगाव या महामार्गावरील रोड टच शेतात पक्के बांधकाम केले.म्हशी ठेवण्यासाठी व्यवस्था निर्माण केली.आणि या व्यवसायात देखील अपयश आले. मेहकर-अकोला मार्गाने जाणारे अनेकजण डॉ रामक्रीष्ण





शिंदे  यांचे शेतातील बांधकाम बघायचे. दुधाच्या व्यवसायात अपयश आले आणि त्यातल्या त्यात एव्हडे मोठे बांधकाम तसेच पडून आहे अशी खंत व्यक्त करायचे, कुणी टिंगलटवाळी करायचे.ह्या सगळ्या कडे दुर्लक्ष करत असतांना आपण जर यात डी एड कॉलेज आणले तर...? हा विचार डोक्यात आला आणि दूध डेअरी च्या फसलेल्या व्यवसायाने त्यांचा शैक्षणिक क्षेत्रातील प्रवेश निश्चित केला. आणि आज डी एड,बी एड,डी फार्म,इंजिनिअरिंग कॉलेज, बीएचएमएस हे होमिओपॅथी चे कॉलेज,आयटिआय,पोलिटेकनिक कॉलेज, अशी असंख्य दालने अंजनी बु ता मेहकर आणि वाशीम जिल्ह्यात कोंडाळा झामरे येथे सुरू केली. आज हजारो मुले मुली यात शिक्षण घेत आहेत.नोकरीला लागत आहेत,डॉक्टर होत आहेत

अनेक तज्ज्ञ व अनुभवी प्राद्यापक, येथे कार्यरत आहेत. इथल्या संस्थेत संगणक प्रयोगशाळा आहे. इथे सौरभ कनिष्ठ महाविद्यालय, श्रद्धा कनिष्ठ महाविद्यालय, श्रद्धा पी जी डी एम एल टी कॉलेज आहे.तब्बल 2 हजार विद्यार्थी इथे शिक्षण घेतात,500 कर्मचारी कार्यरत असल्याने 500 कुटुंबांना आधार देण्याचे काम डॉ रामक्रीष्ण शिंदे यांनी केले आहे.

एका सर्वसामान्य ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा मुलगा जिद्द आणि चिकाटीच्या बळावर आपलं स्वतःच स्वतंत्र विश्व उभं करतो,ज्यांना पुणे मुंबई सारख्या ठिकाणी आपल्या पाल्याना पाठवणे शक्य होत नाही अशा सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मुलींसाठी- मुलांसाठी शिक्षणाची दालने उभी करतो,सर्वसामान्यांच्या मुलांना रोजगार उपलब्ध करून देतो,500 कुटुंबाचा आधार बनतो.अशा डॉ रामक्रीष्ण शिंदे यांचा वैद्यकीय क्षेत्रापासूनचा शिक्षण महर्षी पर्यंतचा झालेला संघर्षाचा प्रवास इतरांसाठी प्रेरणादायी व दिशादर्शक ठरतो आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरू नये.

# लोकसभा निवडणुकीत ज्यांनी प्रामाणिकपणे काम केले त्यांनाच उमेदवारीचा अधिकार : जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** शेवगाव पाथर्डी विधानसभा मतदारसंघांमध्ये लोकसभा निवडणुकीमध्ये ज्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीच्या उमेदवाराचे काम प्रामाणिकपणे केले त्याच कार्यकर्त्यांना विधानसभेची उमेदवारी दिली पाहिजे असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी व्यक्त केले. शेवगाव येथील शुभम मंगल कार्यालयात आयोजित विस्तारित कार्यकारणी सभेत अध्यक्षपदावरून ते बोलत होते. शेवगाव - पाथर्डी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे संभाव्य उमेदवार अ‍ॅड. प्रताप काका ढाकणे पाथर्डी चे तालुका अध्यक्ष शिवशंकर राजळे, शेवगावचे तालुका अध्यक्ष हरीश भारदे, कार्याध्यक्ष माधव काटे, शहराध्यक्ष बाळासाहेब डाके, केदारेश्वर कारखान्याचे चेअरमन ऋषिकेश ढाकणे, एजाज काजी, वजीर पठाण आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना राजेंद्र फाळके पुढे म्हणाले की, पक्षामध्ये काम करण्यासाठी कार्यकर्त्यांना संधी द्यावीच लागते. मात्र कार्यकर्त्यांनी शिस्त पाळली पाहिजे. कुठल्याही प्रकारचा वाद न घालता कुठलेही मतभेद न ठेवता संघटना मजबूत करायची आणि विधानसभेमध्ये आपला उमेदवार निवडून देण्याचे काम प्रामाणिकपणे करायचं. विधानसभेला प्रताप





काकांनाच निवडून द्यायचं हे शेवगाव पाथर्डीतील जनतेने ठरवलेले आहे. लोकांनी निवडणूक हातात घेतली तर यश मिळाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे पक्ष संघटना मजबूत करा, बुथ कमिट्या करा आणि शरद पवारांच्या ताब्यात महाराष्ट्र देऊन शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्याची संधी द्या, असे आवाहन राजेंद्र फाळके यांनी यावेळी केले.

यावेळी बोलताना राजेंद्र फाळके पुढे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीमध्ये शेवगाव - पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी आपल्या उमेदवाराला मताधिक्य दिले. त्याबद्दल मतदारांचा मी आभारी आहे. यापेक्षा अधिक काम आपल्याला येत्या विधानसभा निवडणुकीसाठी करायचे आहे. त्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी सज्ज व्हावे. आपली पक्ष, संघटना मजबूत करू.

अ‍ॅड. प्रताप ढाकणे म्हणाले की, आदरणीय शरद पवार या विचारांच्या विद्यापीठावर निष्ठा ठेवणारा मी एक सामान्य कार्यकर्ता आहे. राजकारणामध्ये अनेक पद येतात, सत्ता येते आणि जाते मात्र विचार हा आज, काल आणि उद्याही जिवंत राहणार आहे. माझा विचार हा जनतेचा विचार आहे, असे ते म्हणाले. यावेळी शिवशंकर राजळे, शंकर काटे, रामराव चव्हाण, मल्हारी आव्हाड, बद्रीनाथ मडके, इब्राहिम भाई पठाण, बंडूशेठ बोरुडे, वजीर पठाण, सविता भापकर आदी कार्यकर्त्यांची भाषणे झाली. माधव काटे यांनी प्रास्ताविक केले. कुसळकर सर यांनी सूत्रसंचालन केले. हरीश भारडे यांनी आभार मानले. या बैठकीस शेवगाव, पाथर्डी तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शेवगाव तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तालुका कार्यकारिणीचा विस्तार करण्यात आला. अ‍ॅड. प्रताप काका ढाकणे, शिवशंकर राजळे आणि हरीश भारदे यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

# शिर्डीत चांदीच्या ताटात साईभक्तांना शाही भोजन

## उद्योजक दीपक निकम यांचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** शिर्डी येथील साईबाबा संस्थांनच्या रुग्णालयातील डॉक्टर व वैद्यकीय सेवा देणाऱ्या कामगारांसाठी थेट दिल्ली येथील साईभक्तांकडून विमानाने दान स्वरूपात पीपीई किट कोरोना काळात उपलब्ध करून देण्यासाठी उद्योजक दिपक निकम यांनी पुढाकार घेतला ते चालवत असलेल्या ॲबीगेल रिजन्सी या हॉटेलात त्यांनी साईभक्तांना चांदीच्या ताटात भोजन देण्याचा उपक्रम सुरू केला असून अशा प्रकारचे उपक्रम राबवणारे ते शिर्डीतील पहिले उद्योजक ठरले आहे चांदीचे  ताट चांदीचा सात वाट्या चांदीचाच ग्लास असा थाट असलेल्या ताटात शाही भोजन दिले जाते  भोजनासाठी कुठलीही अतिरिक्त दर आकारण्यात येत नाही साईभक्तांना शिर्डी येथे आल्यानंतर साईंचे दर्शन कायमस्वरूपी आठवणीत राहावे हा हेतू यामागे असल्याचे त्यांनी सांगितले  कोरोणा  काळात साईबाबा संस्थानच्या रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर रुग्ण महाराष्ट्रातून येत होते अशावेळी पीपीई किट वैद्यकीय साहित्य मिळवणे मोठे अडचणीचे झाले होते अशा काळात दीपक निकम व त्यांचे  मित्र जैन समाजातील कार्यकर्ते



सतीश गंगवाल यांनी दिल्ली येथील साईभक्तांशी संपर्क साधला दोन दिवसात लागणारे हे साहित्य थेट विमानाने शिर्डीत दाखल झाले वैद्यकीय पथक नर्स रुग्णाची अडचण दूर  झाली शिर्डी येथील द्वारकामाई वृद्धाश्रमात १४० पेक्षा जास्त वयोवृद्ध स्त्री पुरुष आहेत त्यांच्यासाठी दानशूर दाता शोधून भव्य अशी तीन मजली इमारत उभी करून निकम यांनी दिली  आहे नेहमीच सेवाभावी उपक्रमासाठी त्यांचा पुढाकार असतो आपला  जनसंपर्क  व मैत्री

शिर्डी येथे साईबाबाच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्त भाविकांना



चांगल्या सेवा सुविधा व सन्मान देणे मोठे गरजेचे आहे उद्योजक दिपक निकम यांनी चांदीच्या ताटात भाविकांसाठी भोजन देण्याचा सुरू केलेला हा उपक्रम शिर्डीच्या धार्मिक पर्यटन विस्तार व शिर्डीच्या अर्थकारण वाढण्यासाठी पूरक ठरेल व शिर्डीचा नावलौकिक देखील वाढण्यासाठी मोठे कारण ठरणार आहे .

**सतीश गंगवाल, शिर्डी**

समाजातील लोकाच्या हितासाठी सेवा देणारी ठरावी हा हेतु त्याचा असतो ते म्हणाले की भाविकांना चांदीच्या ताटात भोजन केल्याचा आनंद समाधान वाटते शिर्डी साईच्या पावनभुमीतील भेट कायमची आठवण ठरावी  हेतू हा उपक्रम सुरू करण्यामागे आहे साईबाबाच्या दर्शनासाठी शिर्डीत देश विदेशातून साईभक्त येत असतात त्यांच्या दृष्टीने सेवा  नम्रता स्वच्छता ही त्रिसूत्री महत्त्वाची ठरते साईभक्तांचे समाधान यातच बरेच काही अवलंबून असते.

# श्री रोकडेश्वर हनुमान दिंडी सोहळ्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** यावर्षी वैजापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र भऊर ते श्रीक्षेत्र पंढरपूर श्री. रोकडेश्वर हनुमान पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन केल्याची माहिती दिंडी सोहळ्याचे मार्गदर्शक ह.भ.प. संजयजी जगताप महाराज व सहमार्गदर्शक ॲड. प्रमोद (दादा) मुरलीधर जगताप यांनी एका पत्रकाद्वारे दिली. हा पायी दिंडी सोहळा गुरुवार ४ जुलै ते गुरुवार १८ जुलै २०२४ या कालावधीत  आयोजित करण्यात आला आहे. श्री. रोकडेश्वर हनुमान महाराज, योगीराज सद्गुरू गंगागिरीजी महाराज, समर्थ सद्गुरु संत श्री. नारायणगिरीजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने गुरुवार ४ जुलै रोजी सकाळी नऊ वाजता श्रीक्षेत्र भऊर येथील श्री. रोकडेश्वर हनुमान मंदिरापासून या दिंडी सोहळ्याला प्रारंभ होणार आहे. हा पायी दिंडी सोहळा गोडेंगाव, देवळाली, नांदगाव, एमआयडीसी अहमदनगर, करमाळा, टेंभुर्णी असा हातात भगवा झेंडा, भगवी पताका, हातात टाळ, मुखाने पांडुरंगाचे भजन व जय हरीचा जय घोष करत, मजल दरमजल पायी प्रवास करत पंढरपूरला पोचणार आहे. पंढरपूरला महादेव लक्ष्मणराव परचंडराव, चिंचोली गेट समोर, ट्रॅक्टर शोरूम समोर, टेंभुर्णी रोड, अहिल्या चौक, पंढरपूर येथे दिंडीचा विसावा राहणार आहे.

# महुरा ऐसी फळे नाही । आली काही गळती ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**माय-बाप वाचकहो, साष्टांग दंडवत! जगात एवढी माणसे आहेत परंतु लेखन, चिंतन, व्याख्यान, जागृती करणारी खूपच कमी आहेत. या उलट व्यर्थ चिंता करणारी, बडबड करणारी, षड्गुण धारण करणारी, भांडणारी, ओरडणारी, फसवणारी माणसं सगळीकडे मोठ्या प्रमाणात भेटतात. सुज्ञ वाचकहो, यावर जरा खोलवर विचार करा. आपण आपला चोवीस तासांचा वेळ कसा व्यतीत करतो? सकाळपासून ते सायंकाळी डोळा मिटेपर्यंत आपण काय काय करतो? याची दिवसातून सायंकाळी कधीतरी गोळा बेरीज करण्याचा प्रयत्न करा. इतर प्राणी आणि आपल्यात विचार हा एकमेव फरक आहे, बाकी इतर प्राणी आपल्यापेक्षा बलवान आणि देखणे आहेत!**

होय देखणे-बलवान आहेत. मोर, पोपट, धीवर, राजहंस, हरिणी, काळवीट, पांढरा शुभ्र बैल आणि अन्य अनेक प्राणी आपल्यापेक्षा कितीतरी पटीने देखणे आणि शक्तिशाली आहेत, परंतु माणसाने बुद्धी चातुर्याच्या बळावर, कपटाने या सर्वांवर कुरघोडी करून स्वतःचे श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. अनेक प्राण्यांना आपले भक्ष्य केले आहे. माणूस किती क्रूर आहे? याचे हे एक उदाहरण. त्यासाठी रोज दिवसाच्या सरतेवेळी थोडा विचार करावाच! दिवसाचे गणित रात्री शांत डोळे मिटायला सहाय्यभूत ठरते. त्यासाठी नित्य मोठ्या माणसांच्या सहवासात काही वेळ तरी नक्की घालवला पाहिजे. अशी माणसे भरपूर आहेत आणि जर नसतील तर ज्ञानोबा-तुकोबा आपल्या स्वागतासाठी आपले मोफतचे शब्दभांडार घेऊन बसलेले आहेत. अगदी डोळ्यात प्राण आणून आपली प्रतीक्षा करत आहेत.  महामानव आपल्याशी जोडून घ्यायला आपल्याला त्यांच्या उंचीवर जावे लागेल. माऊली एकांतात किंवा तुकोबा डोंगरावर जाऊन बसले, म्हणजे आपणही केवळ तसे बसून चालणार नाही. त्यांच्या वैचारिक, अध्यात्मिक, चिंतनिक उंचीवर गेल्यानंतर हे लोक आपल्याला काही प्रमाणात भेटतील. तुकोबांचा गाथा हा पाचवा वेद म्हणून संबोधतात, त्यामागील तुकोबांची सखोलता लक्षात घ्यावी लागेल. वेद म्हणजे जाणणे. वेदाचा कोणत्याही धर्म, जाति, लिंग, प्रदेश अथवा देव इत्यादिसी संबंध जोडणे म्हणजे त्या ज्ञान भांडारावर अन्याय करणे होय. प्राचीन काळापासून माणसाच्या सरळ-सोपे जगण्याचे विचार सांगणाऱ्या वेद ग्रंथात कालौघात अनेक आक्षेपार्ह विक्षेप घुसडले गेले. त्यासाठी वेदातील प्रेम, जिव्हाळा, समता, एकता, वैश्विकता, मानवता इत्यादी सार्वजनिक भावभावना व्यक्त होणारे विचार हेच मुळचे वेद विचार आणि त्या व्यतिरिक्त भेदभेद किंवा इतर अस्विकार्ह बाबी केवळ विक्षेप आहेत. मनाचा विकास म्हणजे जीवनाचा विकास हे वेदाचे मुल तत्व! सत्य रुजावे, असत्य नष्ट व्हावे. मक्डोनॉल्ड यांच्या 'वेदिक मायथॉलॉजी' ग्रंथात, "वेद शीलवंत आणि नितिमय आहेत. वेद विचारांच्या अंगी सत्यत्व असून कपट छद्माचा अभाव आहे. प्रामाणिकपणा, न्याय परायणता, सद्गुण-विशुद्ध ज्ञानाचा शोध घेण्याची अभिप्सा, सर्वोच्च समजोत्कर्ष, समष्टी शांती-विश्वकल्याणाची संकल्पना, जीवन ज्ञानरूप आहे, प्रकाश म्हणजे ज्ञान आणि जीवनात असीम शांतता" इत्यादी अंतर्भाव असणारे विचार म्हणजेच वेद! वेदांच्या ऋचेचा कर्ता हा कोणीतरी दृष्टा महापुरुष होता, ज्याने निसर्ग आणि माणसाचे आनंदी जगणे याचा जवळून, सखोल अभ्यास




केला आणि त्याला अनुसरून जीवन तत्वे मांडली. असेच कार्य संबोधि गौतम बुद्धाने करतांना धम्मपदे सांगितली. हे सर्वच तत्व-ज्ञान माणसाच्या सर्वोच्च उत्थानाचे गमक आहे आणि ज्यांनी हे सर्व समजून घेतले त्यांनी आपले विचार आपल्या अनुभवातून कथन केले. त्यात अगदी सॉक्रेटिस पासून ते आजतागायत अनेक विचारकांचे मोलाचे योगदान आहे. याच विचार यात्रेचा एक कल्पक वाटसरू म्हणजे जगद्गुरू श्री तुकोबाराय! संसारातील वेदनांनी त्रस्त-ग्रस्त झालेला माणूस एकांतात बसतो आणि त्याचे उच्च चिंतनीय विचारासी सुत जुळते आणि सुरु होते एकेका अभंगाचा निर्मिती!

तुकोबांचे अभंग म्हणजे संपूर्ण सजगतेने जीवन जगतांना सभोवतालाचे सुक्ष निरीक्षण आणि त्या आधारे

**महुरा ऐसी फळे नाही । आली काही गळती ॥१॥**
**पक्वदशे येती थोडे । नास आढी वेच ते ॥२॥**
**विरळा पावे विरळा पावे । अवघड गोवे सेवटीचे ॥३॥**
**उंच नीच परिवार देवी । धन्या ठावी चाकरी ॥४॥**
**झळके तेथे पावे आणी । ऐसे क्षणी बहू थोडे ॥५॥**
**पावेल तो पैल थडी । म्हणो गडी आपुला ॥६॥**
**तुका म्हणे उभाऱ्याने । खरे कोण मानितसे ॥७॥** (१२९०)

अशी शब्द निर्मिती होय. मित्रहो, तुकोबांचे अभंग एकदम बारकाईने, काळजीपूर्वक वाचा. आपली मातृभाषा मराठी आहे, आपण उच्च शिक्षित असून देखील एका वाचनात अभंगाचे पूर्णतः आकलन होत नाही. एका चरणाचा दुसऱ्या चरणासी संबंध जोडतांना आपले चरण थरथरायला लागतात. इथेच आपली विद्वत्ता, गुणवत्ता तपासली जाते. तुकोबा काय काय दृष्टांत मांडून कोणता सिद्धांत देताहेत? त्याचा तेंव्हा आणि वर्तमानातसुद्धा आपल्या दैनंदिन जीवनासी किती निकटचा संबंध आहे? याचे वाचक-चिंतकांनी सूक्ष्म अवलोकन केले पाहिजे. असे वाङ्मय जर आपण सांगाती ठेवले तर जीवनात आपण आपल्याला भेटल्याशिवाय राहणार नाही. माणसाने स्वतःला भेटणे म्हणजेच खऱ्या अर्थाने देव भेटणे! आपल्यातील उणीवा आणि त्या संबंधाने जाणीवा जागृत होणे म्हणजे देव भेटणे! प्रस्तुत अभंगात तुकोबाराय विविध दृष्टांताच्या आधारे काही महत्वपूर्ण वैश्विक सिद्धांत जगाला देतात. आपण सर्वांनी अंबा मोहरलेला पाहिला असेल. एकेका फांदीवर हजारो फुले लागतात. पुढे किती पिकतात? हेच तुकोबाराय इथे सांगतात. जवळपास साठ ते सत्तर टक्के मोहर गळून जातो. त्यातही पिकण्यापर्यंत जातांना काही फळे नासतात. यावरून ज्याचा स्वत पिकून आनंदाने शेवट होतो तो अंबा  अत्यंत दुर्मिळ! तसा माणूसही सापडणे कठीणच. भेदाभेद न बाळगणारा, सर्वांना आपले कुटुंब समजणारा, जो झळकतो आणि शेवटपर्यंत टिकतो तोच खरा भाग्यवान! अनेक कठीण प्रसंगांना तोंड देऊन पिकलेला अंबा आणि संसाराचे टक्के-टोणपे खाऊन, तावून-सुलाखून निघालेला माणूस खरा आपला माणूस! शेवटी तुकोबाराय म्हणतात, जो पैलतीरी तरून जात नाही आणि अलीकडे उभे राहून गप्पा मारतो त्याला कोण मानणार? मित्रहो, आमच्या दारात केशर अंबा आहे. मागील तीन वर्षांपासून त्याला फळे लागत आहेत. या वर्षी केशर  अंबा लगडून मोहरला होता. लाखो फुले लागली होती; परंतु शेवटी अडीचशे-तीनशे फळे उतरली. मी रोज अंब्याचे जवळून निरीक्षण केले आणि त्यावर लिहिणार होतो. जो टिकतो तोच पिकतो! जो तगतो तोच जगतो! माणसाच्या जीवनाचे सुद्धा असेच आहे. किती माणसं जन्मतात, परंतु समाजोपयोगी कामे करत किती माणसं दीर्घायुषी होतात? याचे उत्तर शोधल्यास आपल्या जीवनाची शुल्लकता-क्षणभंगुरता लक्षात येते. आपल्या नियंत्रणात काहीच नसतांना आपण किती मोठ मोठ्या गप्पा मारतो? अचानक श्वास बंद होतो आणि भोवताल केवळ हळहळ! हलकल्लोळ! जो तो आपल्या स्वार्थाचे गाऱ्हाणे मांडत असतो परंतु जी बिचारा गेला त्याच्या जीवनाचे काय? यावर कुणीही बोलत नाही. त्यासाठी नित्य नित्य जागृत राहून आपला भोवताल सजग करत जाणे ही खऱ्या सजग माणसाची सामाजिक निकड आहे. त्यासाठी वर्तमानात आनंदी राहतांना महापुरुषांचे चरित्र-चारित्र्य-विचार सोबत बाळगतांना आपला वर्तमान कलुषित होता कामा नये. वर्तमानात आनंदी जगतांना भविष्याची फार काही चिंता करण्याची गरज नाही, कारण ते अनिश्चित आहे. कुणालाच माहिती नाही उद्या काय होणार आहे? त्यासाठी तुकोबा सोबत असावेत. असे अभंग वाचले, त्यावर चिंतन केले की; आपला मोहर किती दिवस टिकणार? फळ पिकणार की मध्येच पडणार? यामुळेच बुजुर्ग, जेष्ठ, अनुभवी, जास्त उन्हाळे-पावसाळे भोगले-जगलेले माणसे शांत, संयमी असतात. ते विचलित होत नाहीत. त्यांनी आपल्या भोवतालचा फुलोरा गळतांना आणि जळतांना पहिला, जवळून अनुभवला आहे. हा त्यांचा अनुभव लाखो ग्रंथ आणि पढीत विद्वानाच्या तुलनेत कितीतरी पटीने श्रेष्ठ असतो.

माय-बाप वाचकहो, मी कुणी वाचावे म्हणून लिहित नाही. मला तुकोबांचे अभंग स्वस्थ बसू देत नाहीत. सतत हलवत असतात. आत मध्ये कालवत असतात. त्यासाठी मी लिहितो. कळसाने केलेले एवढे मोठे महत्कार्य, त्याची थोडीसी झळाळी आपल्या जीवनाला यावी यासाठी हे लिहितोय. मी वाचण्याचे आव्हान करत असलो तरी; माझा तसा आग्रह नाही. पुस्तके वाचल्याने माणूस सखोल-शांत-प्रशांत होतो! त्यासाठी मला जे विचार तुकोबारायांच्या संगतीने सुचतात, कळतात तेच इथे लिहिण्याचा प्रयत्न करत असतो. मराठी मनावर आणि सारस्वतावर तुकोबांचे अनंतकोटी उपकार आहेत, त्यांच्या उपकरातून उत्तराई होणे जरी शक्य नसले तरी त्यांच्या लेखनाची सेवा करून काही वेळ त्यांच्या सहवासात राहण्याचे महद्भाग्य आपल्याला लाभते आहे याचा मनस्वी आनंद आहे! नेटाने आणि नेमाने दै.आधुनिक केसरीचे संपादक मित्र डॉ.प्रभुजी गोरे सर अखंडपणे या तुकाराम नीतीला आपल्या रविवारच्या पुरवणीत स्थान देतात, त्याबद्दल त्यांचे ऋण फेडणे अशक्य! तेंव्हा, आपणही तुकोबाराय, वाचा, समजून घ्या आणि जीवनात अंगीकारण्याचा प्रयत्न करा ही नम्र विनंती! जय तुकोबाराय!

# गझलेचे दोन बादशहा मदनमोहन- तलत महमूद



डॉ. नीता पांढरीपांडे
संपर्क क्र. 7659064555

आधुनिक केसरी

**25 जून 2024 हे संगीतकार मदन मोहन यांचे शताब्दी वर्ष आहे. तलत महमूद यांचे देखील हे शताब्दी वर्ष आहे. हे औचित्य साधून त्या दोघांना मानवंदना..संगीतकार मदन मोहन सोबत तलत मेहमूद यांचं एक खास नातं होतं. संगीतासाठी प्रसिद्ध गझलचे बादशहा म्हणून ओळखले जाणारे मदन मोहन आणि गझल प्रस्तुतीकरणात उत्कृष्ट असे गायक तलत महमूद यांची उत्तम जोडी जमली. या जोडीने अनेक हिट चित्रपट दिले.**

‘मदहोश’ 1951 चित्रपटातील ‘मेरी याद में तुम ना आंसू बहाना नदिल को जलाना मुझे भूल जाना’ शब्दातून अत्यंत सूक्ष्मपणे व्यक्त झालेले दुःख तलत तितक्याच संयमीतपणे रसिकांपर्यंत पोहोचवतात. राजा मेहदी अली खाँ यांच्या समर्पक शब्दातून मुख्यतः व्हायोलिन आणि सितारच्या सहाय्याने मांडलेल्या मदन मोहनच्या हळव्या संगीत रचनेतून प्रेयसी सोबतच्या फाळणीचे दुःख व्यक्त करणारे हे एक भावपूर्ण गीत आहे. त्याला तलतचा आवाज हृदय पिळवटून टाकणारा आहे. शब्द, संगीत आणि स्वर यांच्या अद्भुत किमयातून साकारलेली ही गझल अगदी स्वतंत्रपणे आपली अशी एक वेगळी प्रतिमा ऐकणाऱ्याच्या मनात उमटवते. राजा मेहदी अली खाँ यांच्या काव्यातील दडलेला आशय तितक्याच समर्पक सुरातून व्यक्त करण्याची अद्भुत किमया मदन मोहनच्या रचनेतून स्पष्ट दिसून येते. ‘आशियाना’ 1952 चित्रपटातील :मेरा करार लेजा मुझे बेकरार कर जा’ आणि ‘मै पागल मेरा मनवा पागल, पागल मेरी प्रीत रे’ गाण्यातून आयुष्यातील प्रेमाला हळुवार हळवेपणाने मांडणारे शब्द तितक्याच मुलायम हळुवार स्वरात गाऊन तलतने रसिकांची मने जिंकली .राजेंद्र कृष्ण यांच्या गाण्यातील शुद्ध भाव आपल्या स्वरातून लोकांपर्यंत पोहोचवले. त्या गाण्यातील काही ओळी-‘ छुपी हुई मेरी काया मे राख किसी परवाने की/ ये मेरा दुखिया जीवन है रूह किसी दिवाने की/ मन के तुटे तार बजा कर गाऊ अपने गीत रे/’ हृदयाला स्पर्श करून जातात. हे गाणे वियोग आणि अपरिचित प्रेमाची वेदना व्यक्त करणारे क्लासिक गाणे आहे. प्रेमाच्या वेदनेमुळे नायक पागल झाला आहे. वस्तुस्थितीशी जुळवून घेण्यास असमर्थ आहे. विभक्त होण्याच्या वेदना आणि त्याचा नायकावर झालेल्या खोल परिणामाविषयी तो बोलतो आहे. वियोगाची वेदना ज्याने अनुभवली आहे तो ज्या वेडेपणातून जात आहे ते कोणाला कसे समजू शकेल? त्याच्या प्रेमाची व्याप्ती आणि त्याला होत



असलेल्या वेदना लोक समजू शकत नाही. हे एक अतिशय मार्मिक गाणे आहे. एका प्रियकराच्या तीव्र भावनांना सुंदर प्रभावी शब्दात व्यक्त करत आहे जो त्याच्या अतुलनीय प्रेमाशी जोडून घेण्यासाठी धडपडत आहे. हे गाणे अतिशय हळुवारपणे तलत यांनी गायले आहे. ‘देख कबीरा रोया’ 1957 चित्रपटातील राग बागेश्वरीतील एक अप्रतिम रचना-‘हमसे आया ना गया, तुमसे बुलाया न गया’ हे गाणे म्हणजे नायिकेला साक्षात्कार म्हणून प्रेम व्यक्त करताना नायकाची होणारी कोंडी. यातील ओळी‘वोघडी याद है जब तुमसे मुलाकात हुई, एक इशारा हुआ दो हात बढे बात हुई, देखते देखते दिन ढल गया और रात हुई’! म्हणताना तलतचा असा काही स्वर लागला आहे की ऐकणाऱ्याच्या डोळ्यासमोर अक्षरशः ते चित्र उभे राहते. प्रणय, मिलन, रुसवा- फुगवा, विरह, विद्ध झालेले मन या सगळ्या अंतर्गत अशा अनंतछटा रसिकांसमोर उलगडत जातात. मदन मोहन मध्ये शब्दांच्या



आधारे आशयाचे विविध तरंग निर्माण करण्याची विलक्षण क्षमता होती. त्यांच्या रचनेत गाण्याच्या आशयाबरोबर संगीत हातात हात घालून आपले अस्तित्व दाखवते. दोघांचा फारच सुरेख मेळ घालून गाणे जेव्हा रसिकांपर्यंत येते तेंव्हा रसिक त्या गाण्यात गुंतून पडतो कारण गाणे त्यांच्या हृदयापर्यंत पोहोचलेले असते. राजेंद्र कृष्ण यांचे शब्द मदन मोहनची सितारचा प्रयोग करून केलेली प्रभावी रचना आणि तलतचे सुरेल गाणे या तिन्हीच्या समीकरणामुळे या गाण्याने रसिकांच्या मनाचा ठाव घेतला आहे. ‘दो दिन की मोहब्बत में हमने, कुछ खोया है कुछ पाया है/ दो गम के आँसु हमको मिले, जीने का चैन गंवाया है’/‘छोटे बाबू’ मधीलकैफ इराणी यांनी लिहिलेल्या गीतामध्ये नायकाने प्रेमात काय मिळवले तर अश्रू आणि दुःख. जीवनाची शांती तोहरवून बसला आहे. तलतने मदन मोहनच्या भावपूर्ण रचनेला अतिशय उच्च आणि अत्यंत खालच्या नोट्स मधून कुशलतेने सर्फिंग करून पूर्ण न्याय दिला आहे. ‘यादजब आये तेरी’;‘मोहर’चित्रपटासाठी मदन मोहन यांनी हे गाणे नेहमीपेक्षा वेगळ्या शैलीत संगीतबद्ध केलेले आहे. काहीसे अरबी संगीताच्या जवळ जाणाऱ्या या गाण्याचे बोल राजेंद्र कृष्ण यांचे आहेत. तलतचे सादरीकरण एकदम विचारशील मूड तयार करतात. ‘जहांआरा’ चित्रपटातील राजेंद्र कृष्ण यांनी लिहिलेली गाणी अतिशय अप्रतिम अशीच आहेत.‘फिरवही श्याम वही गम वही तन्हाई है’ हे अतिशय भावनाप्रधान गाणे. मदन मोहन यांनी बासरी, सतार आणि व्हायोलिनचा उत्तम प्रकारे केलेल्या वापर आणि तलतचा मुलायम आवाज रसिकांच्या मनावर खोल परिणाम करून जातो.‘तेरी आंख के आंसू पी जाऊं’ लयीला आणि स्वर सांभाळायला अतिशय अवघडआहे .अशा अवघड रचना मदन मोहन यांनी केल्या आणि त्याच ताकदीने तलतनेत्या समर्थपणे गायल्या आहेत. असंख्य रसिक त्या सोहळ्यात पुन्हा पुन्हा न्हाऊन निघाले आणि तृप्ततेची अनुभूती घेत राहिले.‘जहांआरा’ चित्रपटातील एक अजून महत्त्वाचे मदन मोहनचे संगीत असलेली गाणे-‘मै तेरी नजर का सुरूर हूं’एक वेदनामय गझल. तलतच्या आवाजाला पूरक असलेल्या वादनांचे ऐकू येणारे संगीत रसिकांच्या मनाचा ठाव घेते. आशयाला भिडून विविध तरंग निर्माण करण्याची असाधारण क्षमता त्यांच्यात होती.

याच चित्रपटातील तलत आणि लतादीदींचे एक हलकेफुलके युगलगीत मनाला भावून जातेते म्हणजे-‘एसनम आज ये कसम खाये.’ या गाण्याचा पहिला भाग संगीताच्या तुकड्यांनी सजला आहे तर दुसरा भाग उत्तम गायनाचा आहे. कोणतेही गाणे भावपूर्ण रीतीने कसे गावे आणि त्यातून काळजाला भिडणारी असाधारण कृती कशी निर्माण करावी यात तलत माहीर होते.

मदन मोहन यांनी तलत बरोबर‘बेरहम आसमां मेरी मंजिल’ आणि ‘तेरी निगाहों मे तेरी ही बाहों में’ तलत आणि आशा भोसले बरोबर (बहाना १९६०),‘पॉकेटमार’ मधील लतादीदीं बरोबर उडत्या चालीचे ‘ये नई प्रीत है, तू ही मेरा मीत है’ आणि ‘तेरी चमकती आँखो के आगे ये सितारे कुछ भी नही’ तलत आणि लतादीदींचे ‘याद आये तेरी अपनी गुजरी जिंदगी’(मोहर),‘मेरी रातो के अंधेरे मे’ आणि ‘मोहब्बत में कशिश होगी तो’;‘जिसे दिल मे बसाना चाहता था’; (’अदा’)  अशी अनेक गाणी तलत बरोबर केली आहेत.

तलतने त्या काळातील गझल गायनावर आपल्या मधुर आवाजाने मोठा प्रभाव पडला. रागदारीची उत्तम जाण, आवाजातील दैवी गोडवा, सुस्पष्ट आवाज आणि लखनवी शास्त्रीय संगीताचे त्यांच्यावर झालेले संस्कार, याला संगीतकार मदन मोहन यांची साथ मिळाली.

संगीतातील समज, उमज आणि कल्पकता लक्षात घेऊन असं वाटतं की मदन मोहन यांना समकालीनांपेक्षा काहीतरी वेगळे करण्याचे दुर्दम्य इच्छा होती. त्यांच्या रचनेतून त्याचे नितांत रमणीय दर्शन होते. मदन मोहन यांच्या रचना ऐकताना नेहमी याचा प्रत्यय रसिकांना येतो.

गीतकार आपले संपूर्ण कसब पणाला लावून गझला लिहितो. त्यांना योग्य संगीताने सजवून नायकाच्या गळ्यातून परिणामकारकपणे गाऊन घ्यायचे कसबहे संगीतकाराचे असते. त्यामुळे कोणत्याही गाण्याच्या चांगले वाईट ठरण्यात संगीतकाराचा मोलाचा वाटा असतो. कधी शब्दांमुळे सूर तर कधी सुरांमुळे शब्द रसिकांच्या मनाचा ठाव घेत असतात. शब्द, संगीत आणि स्वर यांची भट्टी जमली की त्यातून अफलातून असेच गाणे रसिकांच्या समोर येते. हा प्रत्यय मदन मोहन आणि तलत महमूदचे गाणे ऐकून आपल्याला होते. मदन मोहन आणि तलत या जोडीने आपल्या गाण्यातून रसिकांना हा आनंद भरभरून दिला आहे.. त्यांची ही जादू इतक्या वर्षानंतर आजही कायम आहे हेच त्यांचे यश.

# दोन हुकूमशहांची युती : महासत्तेला आव्हान



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**भूराजनैतिक दृष्टीने उत्तर कोरिया आणि रशिया यांची युती युरेशियातील राजकारणात महत्त्वाची आहे. युरोप आणि आशियाच्या एकत्रित भागाला युरेशिया असे म्हणतात. या युरेशियावर अमेरिकेचे नाही तर रशियाचे वर्चस्व आहे. दोन हुकुमशहांची ही युती महासत्तेला आव्हान आहे काय ? रशियाचे अध्यक्ष पुतीन यांची उत्तर कोरिया भेट ही अनेक अर्थाने वादळी आणि तेवढीच बहुचर्चित बनली आहे. त्यांचा अमेरिका आणि पाश्चिमात्य राष्ट्रांशी असलेला तीव्र विरोध या भेटीतून प्रकट झाला आहे. पुतीन आणि त्यांचे कोरियन समपदस्थ किंग जोंग उन यांच्या भेटीमध्ये नेमके काय घडले, कुणी कुणाला कोणत्या सहकार्याचे आश्वासन दिले, त्याचे जगाच्या राजकारणावर काय परिणाम होतील, त्यामुळे जगाची शांतता बिघडेल काय, आंतरराष्ट्रीय राजकारणातील सत्ता समतोलाला त्यामुळे काही धोका निर्माण होईल का, असे अनेक प्रश्न उद्भवतात. या सर्व प्रश्नांची उत्तरे प्रस्तुत लेखामध्ये शोधलेली आहेत.**

रशियाचे अध्यक्ष पुतीन यांची ही दुसरी उत्तर कोरिया भेट आहे. यापूर्वी त्यांनी इ.स. २००० मध्ये उत्तर कोरियाला भेट दिली होती. तेव्हा सध्याचे सर्वेसर्वा किम यांचे पितामह किम जोंग दुसरे हे राज्यकारभार करीत होते. आता ही भेट अशा एका टप्प्यावर आहे की, सध्याचे राज्यकर्ते हळूहळू पायउतार होऊन आपल्या मुलीला आपला वारस म्हणून पुढे करण्याच्या तयारीत आहेत. शिवाय उत्तर कोरियाची सर्वंकष सत्ता त्यांनी हातात केंद्रित केली आहे व तेथील कार्यकारी सत्ता, विधी सत्ता व न्याय सत्ता या तीनही सत्तांचे ते प्रमुख आहेत. त्यामुळे एका अर्थाने किम हे उत्तर कोरियाचे हुकूमशहाच मानले जातात. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन हे चौथ्यांदा अध्यक्षपदाची धुरा वहात आहेत आणि त्यांच्याबरोबर किम यांची भेट म्हणजे दोन हुकूमशहांची युती असे म्हटले जाते आणि या युतीतून नेमके काय घडले, त्याच्या जगाच्या शांततेवर काय परिणाम होतील, अमेरिका या भेटीकडे कशी पहात आहे असे अनेक प्रश्न उभे राहतात. त्या प्रश्नांची चर्चा करणे उचित ठरेल. पुतीन यांनी उत्तर कोरियाला दिलेली ही दुर्मिळ आणि वैशिष्ट्यपूर्ण भेट अशावेळी होत आहे की, युक्रेन युद्धाला दीड-पावणे दोन वर्षे पूर्ण झाली आहेत आणि हे युद्ध पुढे चालू ठेवण्याचा त्यांचा इरादा आहे तर त्यांना भक्कम विरोध करण्याची युरोपियन युनियन, नाटो आणि अमेरिकेची तयारी आहे. अशावेळी पुतीन उत्तर कोरियाकडे शस्त्रास्त्रांची मागणी करीत आहेत, दारुगोळ्याची मदत मागत आहेत आणि त्यांना त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे एकाकी पडल्यामुळे त्यांना आपले समर्थन करण्यासाठी कुणीतरी आपल्या पाठिशी भक्कमपणे उभे आहे असे वाटणे साहजिक आहे. दोनही देश अमेरिकेने लादलेल्या निर्बंधाशी सामना करण्यासाठी म्हणून एकमेकांना सहाय्य करण्यासाठी कटिबद्ध झाले आहेत. उत्तर कोरियाचे नेते किंग जोंग उन यांनी उत्तर कोरियाची राजधानी प्योंगयांग या शहरात पुतीन यांचे जोरदार स्वागत केले. पुतीन यांनी या भेटी दरम्यान असे प्रथमच जाहीर केले की, रशिया एकाकी देशाला मदत करू शकतो, शस्त्र पुरवठा करू शकतो. परंतु त्यांच्या या खेळीमुळे उत्तर कोरियन द्वीपकल्प अस्थिर होऊ शकेल आणि त्या पलिकडेही जगातील शांतता धोक्यात येऊन अमेरिका विरूद्ध उत्तर कोरिया, चीन व रशिया यांच्यात संघर्षाचा भडका उडू शकतो. उभय नेत्यांमधील ऊबदार हस्तांदोलन, हास्यांची कारंजी, गप्पागोष्टी आणि मैत्रीचा विश्वास तसेच पुतीन यांना देण्यात आलेली रेड कार्पेट वागणूक यातून असा संकेत देण्यात आला की, आता दोन्ही देश एकमेकांशिवाय राहू नाहीत आणि त्यांचे खरे जबर आव्हान पश्चिमी देशांना आहे. त्यामुळे रशिया व पश्चिमी देशातील संघर्षाची किनार या भेटीमुळे अधिक गडद झाली आहे असे म्हणता येईल.

**संरक्षण सहकार्याचा करारः**
या दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या विविध करार मदारांचा आत्मा आहे संरक्षण व लष्करी सहकार्य. विशेषतः दोघांपैकी कोणावरही हल्ला झाल्यास दोन्ही देश एकमेकांच्या संरक्षणासाठी धावून येतील अशी हमी या करारामध्ये देण्यात आली आहे, हे अधोरेखित केले पाहिजे. नाटो आणि सहयोगी राष्ट्रांना लांब पल्ल्याच्या शस्त्रास्त्रासह चोख उत्तर देण्याची योजना रशियाने उत्तर कोरियाच्या मदतीने तयार केली आहे असे यावरून दिसते. पुतीन म्हणतात, रशियाला आता कोरियाकडे मागण्यासारखे काही नाही. मागावयाची आहे ती मैत्री व सहकार्य. पण ही मैत्री सक्रिय लष्करी सहयोगावर आधारलेली असणार आहे असे त्यांना म्हणावयाचे आहे. मॉस्को उत्तर कोरियाला आर्थिक सहकार्य आणि शस्त्रास्त्रे देऊ इच्छितो. तसेच त्यामुळे त्याचा क्षेपणास्त्र कार्यक्रम अधिक आत्मविश्वासाने पुढे चालेल. शिवाय त्याच्याजवळ प्रगत आण्विक अस्त्रे असल्यामुळे त्याचा धोकाही युरोप आणि अमेरिकेला संभवतो. म्हणजे या भेटीने पुतीन यांनी वॉशिंग्टन व सेऊलला जबर धक्का दिला आहे असे म्हणावे लागेल.
रशिया आणि उत्तर कोरिया यांच्यामधील हा मौलिक करार अनेकदृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचा खरा पाया १९६१ साली तेव्हाच्या सोव्हिएट रशियाने आणि उत्तर कोरियाने केलेल्या एका करारामध्ये दडलेला आहे. त्यावेळी सोव्हिएट रशियाचे अध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह हे होते. त्यांच्या धोरणाचे प्रतिबिंब पुढे २००० साली पुतीन यांनी उत्तर कोरियाला भेट दिली त्यात पडले होते आणि आता हा तिसरा टप्पा आहे. या टप्प्यात हे संबंध आता नव्या वळणावर आले आहेत. त्यामुळे दोन्ही देशांशी मैत्री अधिक घट्ट झाली आहे आणि ही मैत्री आता पाश्चात्य राष्ट्राला जबरदस्त आव्हान देत आहे. उत्तर कोरिया आणि रशियातील लष्करी सहकार्याचा हा करार म्हणजे अमेरिकेने रशियाला एकाकी पाडण्याची जी खेळी केली त्याला पुतीन



यांनी दिलेले उत्तर आहे असे म्हणावे लागेल. पुतीन यांच्या या भेटीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे उभय राष्ट्रामधील लष्करी सहकार्याप्रमाणे त्याला आर्थिक सहकार्याचीसुद्धा किनार आहे. रशियाला उत्तर कोरियाबरोबरचा व्यापार वाढवावयाचा आहे आणि त्याची जी आर्थिक कोंडी झाली आहे, त्यावर जे निर्बंध लादले आहेत त्याला त्याचे उत्तर द्यावयाचे आहे. १९६१ चा करार, त्यानंतर २००० साली पुतीन यांनी दिलेली भेट आणि आता २०२३ चा करार या तिन्हीमध्ये एक समान सूत्र आहे. ते म्हणजे पाश्चिमात्य राष्ट्रांना विरोध आणि रशियन नेतृत्वास पाठिंबा. त्यामुळे उत्तर कोरिया व रशिया दोघेही अमेरिकेच्या विरोधात उभे आहेत. युक्रेन युद्ध सामोपचाराने थांबले नाही, संघर्ष चालू राहिला तर जागतिक शांतता टिकावी आणि युद्ध थांबावे हे कसे साध्य होणार ? एकतर फेब्रुवारी २०२२ मध्ये सुरू झालेले युक्रेन युद्ध थांबले पाहिजे. एकमेकाला शह प्रतिशह देण्याच्या नादात जगाची आणि मानवजातीची हानी होता कामा नये यावर भर दिला पाहिजे. त्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने भांडणाऱ्या सर्व देशांना एका व्यासपीठावर आणून हे शह-प्रतिशह, दावे-प्रतिदावे, शह-काटशह थांबविले पाहिजेत. तरच जगात शांतता स्थापन होऊ शकेल.

**भूराजनैतिक विश्लेषणः** रशिया आणि उत्तर कोरिया यांच्यातील कराराचे भूराजनैतिकदृष्टीने विश्लेषण पाहता त्याचे कारण असे की, युक्रेन युद्धात रशियाला शस्त्रास्त्रे पाहिजेत. ती जगात कोणीही त्याला देण्यास तयार नाहीत. असे म्हटले जाते की, उत्तर कोरियाने दहा हजार शिपिंग कंटेनरमध्ये ४.५ दशलक्ष एवढ्या तोफा रशियाकडे रवाना केल्या आहेत. शिवाय दारुगोळा, युद्ध सामुग्री या बाबतीमध्ये रसद पुरविण्यास कोरिया पुढाकार घेत आहे. उत्तर कोरियाची ही चाल मोठी महत्त्वपूर्ण आहे. कारण दोघांचे शत्रू समान आहेत. दोघांनाही अमेरिकेला विरोध करावयाचा आहे आणि अमेरिकेला विरोध करण्यासाठी दोघेही तत्परतेने एकमेकांचे हात हातात घेऊन सहकार्याला तयार झाले आहेत. तसेच शिक्षण, सांस्कृतिक देवाण-घेवाण, पर्यटन विकास या तीन बाबतीत सुद्धा स्वतंत्र करार करण्यात आले आहेत. त्यामुळे दोन्ही देशांमध्ये PEOPLE TO PEOPLE CONTACT म्हणजे लोकपातळीवर संपर्क वाढावा हा त्यामागचा हेतू दिसतो. अशाप्रकारे उत्तर कोरिया रशियाला लष्करी सामुग्री देणार आहे, तर रशिया उत्तर कोरियास जगण्यासाठी नैतिक बळ देऊ इच्छितो. आजमितीस रशियाकडे सर्वात मोठी आण्विक क्षेपणास्त्रे आहेत आणि अणुबॉंबही आहेत. ९ पैकी २ निकामी झाले. पण ७ ही सर्वात मोठी संख्या रशियाकडे आहे. त्यामुळे रशियाला कोणतेही राष्ट्र घाबरते. आता रशिया आणि उत्तर कोरिया यांच्यातील युतीमुळे भूराजनैतिकदृष्टीने जगाच्या राजकारणात सत्ता समतोलामध्ये कोणीही कोणाला एकाकी पाडले तर कोणीतरी मित्र असतोच. त्यामुळे रशियाला जरी एकाकी पाडण्यात आले असले तरीदेखील उत्तर कोरियाच्या पाठिंब्यामुळे रशिया आता मजबूत होत आहे. पुतीन वयोवृद्ध नेते आहेत. त्यांचे वर्णन राजकीय साधू असे केले जाते. पण हा साधू साधासुधा नाही. तो साधू त्याच्या हातातील क्षेपणास्त्रे, आण्विक शस्त्रे, पाणबुड्या सगळ्यांचा साठा पाहिला की, उत्तर कोरियाला लढण्यासाठी बळ देण्याचा रशियाचा प्रयत्न दिसून येतो. असे म्हणतात की, हा करार होण्यापूर्वीच रशियाने उत्तर कोरियाला काही पाणबुड्या पुरविल्या आहेत. त्या पाणबुड्यांचा उपयोग कोरिया सागरामध्ये टेहळणी करण्यासाठी करू शकतो. शिवाय त्याची लांब पल्ल्याची, मध्यम पल्ल्याची आणि लघु पल्ल्याची आयसीबीएम म्हणजे आंतरखंडीय क्षेपणास्त्रांचा प्रकल्प मोठा आहे. निर्बंधांची ( सँक्शनची ) पर्वा न करता किम जोंग यांनी अनेकवेळा आण्विक चाचण्या केल्या आहेत आणि आंतरखंडीय क्षेपणास्त्रांचा मोठा प्रकल्प पुढे चालविला आहे. याद्वारे काही क्षेपणास्त्रे त्यांनी जपानच्या हद्दीतही टाकली आहेत. त्यामुळे केवळ अमेरिकेलाच नव्हे तर जपानलाही आव्हान देण्यासाठी तो पुढे आहे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.

**समारोप :** भूराजनैतिकदृष्टीने उत्तर कोरिया आणि रशिया यांची युती युरेशियातील राजकारण महत्त्वाची आहे. युरोप आणि आशियाच्या एकत्रित भागाला युरेशिया असे म्हणतात. या युरेशियावर अमेरिकेचे नाही तर रशियाचे वर्चस्व आहे. त्यामुळे सत्ता समतोलाच्या राजकारणात रशिया नेहमीच अमेरिकेला वरचढ राहिलेला आहे. या करारानंतर अमेरिका कोणती खेळी घेते याकडे जगाचे लक्ष लागले आहे. यावरून असे दिसते की, नजीकच्या भविष्यकाळात उत्तर कोरिया आणि रशियामधील मैत्री अधिक घट्ट होणार आहे. ही मैत्री संरक्षणदृष्टीने महत्त्वाची आहे. विशेषतः भूराजनैतिकदृष्टीने त्याला विशेष महत्त्व आहे. दोन हुकुमशहांची युती महासत्ता अमेरिकेला आव्हान देणारी आहे असेच म्हणावे लागेल.

# मृत्यू हेच तुमचे अंतिम सत्य...



सचिन कोरडे
संपर्क क्र. 90219 20903

आधुनिक केसरी

**सौंदर्य टिकणार नाही, पद,पैसा हे सोबत येणार नाहीत, मृत्यूनंतर तुम्हाला तुमच्या आलिशान बंगल्यात ठेवल जात नाही. तरीही स्वार्थ का? मानवा जगाच्या पटलावर आपण किती दिवस आहोत. आपला प्रवास कधी थांबणार याची पुसटशीही कल्पना नाही. त्यामुळे या सुंदर अशा आयुष्याला अगदी फुलपाखरा सारखं भरभरून जगून घ्या. त्याला रुसण्या फुगण्यात, अबोला पकडण्यात, किंवा आधी मीच का बोलाव यातही वेळ घालवू नका.**

"कारण तुमच्यातील मी हा तुमच्यात नसून तो मरणात आहे." त्यामुळे तुमच्यातला मी काढा व या सुंदर अशा आयुष्याला आपलेपणाने समुद्राच्या लाटा प्रमाणे जगू द्या. ज्या गोष्टीने तूम्ही कायम प्रेरित आणि प्रभावीत आहात ते सदैव मनात ठेवा. तुम्ही स्वतंत्र आहात तुम्ही कोणाचे गुलाम नाहीत तुमचा जन्म हाच मृत्यूचा गुलाम आहे. यामुळे मृत्यू कधीही तुमच्या जन्माला गिळंकृत करू शकतो. तुम्ही तुमचे लक्ष अकल्पनीय उंचीवर ठेवले आणि कोसळलात तरी मनात कसलेही भीती बाळगू कारण तुम्ही कोसळले तरी नेहमीच इतरांच्या यशाच्या वरच राहाल हे कायम ध्यानात राहू द्या. मानवाने एक गोष्ट आत्मसात करावी की,तुम्ही कधीही,कोणत्याही वेळी, कोणीशीही प्रभावित होऊ शकता. फक्त ती प्रेरणा तुम्ही नेहमीच लक्षात ठेवण्याची गरज असते. या पृथ्वीतलावर निसर्ग हाच अतिशय शक्तिशाली आहे. अतुलनीय आहे.त्याची कधीच कुठेच तुलना होऊ शकत नाही.
ह्या जीवनाला ह्या निसर्गाच्या सानिध्यात झोकून द्या, त्याला मनमुराद जगू द्या. निसर्गावर प्रेम करा प्राणी मात्रावर प्रेम करा, स्वतःला ओळखा स्वतःला सिद्ध करत हा जन्म रोज उठल की आहे. मृत्यू मात्र एकदा आहे. या मानव जन्माला ईश्वराची सुंदर अशी देणगी समजून घेतं ते जगून घ्या त्याला संपवू नका.
एखाद्या शिक्षणरुपी परीक्षेमध्ये नापास झालात म्हणून लागलीस मृत्यूला कवटाळणे हे कितपत योग्य आहे. जीवन रोज एक परीक्षा घेते अन् ती परीक्षा आपण खूप सुंदर गुणांनी पास व्हा. रोजच्या परीक्षेला यशस्वी येत्या जिंकलात म्हणजे तुम्ही तुमच्या या जीवनाला जिंकल हे यमक जुळवून जगा.
निसर्गाचा लहरीपणा आणि सावकारकी कर्ज हताशपणा नैराश्य हे घेऊन मृत्यूला कवटाळणारे शेतकरी त्यांनीही त्यांना कर्ज फेडण्यासाठी रोज एक नवीन संधी असते. मित्रांना,नातेवाईक,परिवार तो सावकार यांना तुमच्या हाताशपणाविषयी स्पष्ट मोकळे व्हा.मनमोकळे बोला मनातल्या अडचणी सांगा. यात तुमच्या अडचणी कोणी सोडविणार नाही. पण तुमच्या मनातील अतील दुःख हलक होऊन या अडचणीवर मात करण्याची एक नैसर्गिक ताकद आपल्यात आपोआप येईल. तुमचं भविष्य हे मृत्यू अंतिम सत्य आहेच. कारण या अंतिम सत्याला सर्वजण एक ना एक दिवस त्याला भेटायचं आहे. जरी एखाद्याची त्याला भेटायची इच्छा नाही.तरीही तो स्वतःहून तुम्हाला शोधत भेटायला येणारच आहे. कारण तो तुमच्या जीवनाचा महापुरुष आहे. मग आजच त्याला भेटण्याची घाई का करता?
त्यासाठी मित्रांनो सुंदर आयुष्य जगून घ्या, सर्वांना हसून खेळून बोलून घ्या, स्वतःही मनमुराद हसून घ्या, आलंच रडायला तर रडून ही घ्या. काही अडचणीमुळे, भांडणामुळे, विचार पटत नसतील म्हणून किंवा भावभावकीची भांडण यात जर रुसल असेल कोणी तर स्वतः बोलुन सुरवात करून पहा.
प्रेम केलं जगासमोर पती-पत्नी म्हणुन एकत्र होता नाही आलं, तरीही नैराश्य मध्ये जाऊ नका. तुम्ही त्या पुढचे नातं आहे. ठीक आहे तुम्हाला काही कारणाने एकत्र येता येत नाही.
पण तुम्ही तुमच्यासाठी एक जीव आहात हे विसरून चालणार नाही. कारण निसर्गानेच तुमच्या दोघांच्या हृदयाची तशी गुंतागुंत करून ठेवली असेल तर त्याला तुम्ही काहीच करू शकत नाही तुम्ही फक्त जगून घ्या,तुम्ही प्रेम करून घ्या.तुम्ही नितांत प्रेम करा.
तुम्हाला आयुष्याचा प्रत्येक क्षण जगता आला पाहिजे. तो क्षण वय,नोकरी, व्यवसाय, प्रतिष्ठा, जात पात, धर्म यापलीकडे जाऊन् जगता आल पाहिजे. नाचायची इच्छा असेल तर नाचून घ्या. प्रत्येकाला लहानपणी वाटत मोठ व्हावं, मोठेपणी वाटत श्रीमंत व्हावं आणि म्हातारपणी वाटत परत लहान व्हावं. जीवनाच्या या चक्रयुव्हात जगायचं मात्र राहून गेलं हे जाणवायला शेवटी सुरुवात होते. ज्याला जे आवडत त्यासाठी स्वतः वेळ काढावा. अति कमवून तरी कुठ घेऊन जायचं आहे? आणि समजा कमवलं तरी पुढच्या पिढीला ते सांभाळता येईल का? यावर ही आपला विचार असावा.
हो पैसे नक्कीच कमवा पण स्वतःसाठीही थोडस जगा मित्रांनो. खूप काही कमावण्याच्या नादात तुमच्या इच्छा,आकांक्षा,तुमचं जगणं याला जर म्हातारपण आलं तर त्या कमवण्याला काय अर्थ राहिला. निसर्ग, विविध ठिकाण,तुमचा स्वभाव यावरून तुम्हाला वेगवेगळे अनुभव मिळतात. आज आपण शहरी लाइफ स्टाइलमुळे सहजपणे आपण संवेदनांपासून वेगळे झालो आहोत. या शहरी भागात आपलेपणा नष्ट होऊन तुमच्यातला मी पण आज जागा झाला आहे. पण वरती लेखात सांगितल्याप्रमाणे माझ्या प्रिय जणांनो, माझ्या मित्रांनो तुमचा 'मी' हा मृत्यू मधला आहे. त्यामुळे तो येईल त्यावेळी येणारच आहे. कारण तो तुमच्या जीवनाचा शेवटचा सत्य महापुरुष आहे. आणि या महामृत्युला कुणाचा सांगावा धाड्याऱ्याची गरज नाही. तो रोज तुमच्या समोरच आहे. त्यालाही लाज वाटावी असं आयुष्य मनमुरांदपणाने,आपलेपणाने, आनंदी, निस्वार्थ, भावाने फक्त जगून घ्या.



# विठू माझा लेकुरवाळा | संगे गोपाळांचा मेळा ||



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

आधुनिक केसरी

**सुखा लागलिसी तळमळ | तरी तू पंढरिसी जाय एकवेळ || सर्व ठिकाणी आज भक्तिमय वातावरण तयार झालेला आहे. प्रत्येकाच्या हृदयातील सहृदय भावना जागृत झालेले आहे. प्रत्येकाच्या मनामध्ये भक्ती भाव निर्माण झालेला आहे. श्रद्धा विश्वास ओसंडून वाहत आहे. कारण प्रत्येकाला वारीचा सोहळा अनुभवायला मिळणार आहे. या वारीच्या सोहळ्यामध्ये प्रत्येक जण न्हाऊन निघणार आहे. जगाचा चालक-मालक पालक याची वारी दरवर्षी येते. दरवर्षी तेवढ्या श्रद्धेने लोक त्याच्यामध्ये सहभागी होतात. त्या आनंदामध्ये अगदी नाहून निघतात. परंतु तो आनंद हा चिरकाल टिकणारा असेल तर तो खरा आनंद आहे. तूच मायबाप बंधू सखा आमचा | वित्त गोत जिवलग जीवाचा ||**

विठ्ठल माझी माय | आम्हां सुखा उणें काय || आपला भाव हा एका वारीपुरता मर्यादित नसावा. आपल्या मनातील श्रद्धा सतत जागृत असायला हवी. माझा भार हा माझा भगवंतच वाहतो हा दृढ विश्वास असायला हवा. कारण संत म्हणतात, "विश्वास करे स्वामी वर सत्ता" म्हणून आपण सर्व भावाने विठुरायाला, संतांना शरण जायला हवं. जोपर्यंत आपण नम्र होत नाही तोपर्यंत आपल्या अंतकरणांमध्ये प्रेम निर्माण होणार नाही. आपण वैखरी वाणीने माऊली चा गजर करत राहो परंतु तो खरा गजर आपल्या अंतर्मनात सुरू असला पाहिजे. जोपर्यंत अंतर्मनातील गजर स्वतःला ऐकू येत नाही तोपर्यंत आपला भाव शुद्ध होऊ शकत नाही. वैखरी वाणीने आपण जोपर्यंत बोलत आहोत तोपर्यंत ते तेवढ्यापुरतं सुख मर्यादित राहतं. जोपर्यंत त्या सोहळ्यात आहोत तोपर्यंतच आनंद उपभोगता येतो. परंतु त्या सोहळा समता क्षणी आपला आनंद सुद्धा कापुराच्या सुगंधासारखा त्या सोहळ्यामध्ये विरून जातो. म्हणून जो चिरकाल टिकणारा शाश्वत आनंद आपल्याजवळ आहे आणि तोच आपल्याला उपभोगायचा असेल तर अंतर्मनातील नाद हा गर्जत राहिला पाहिजे. कारण संत सांगतात,

**"देह ही पंढरी | आत्मा हा विठ्ठल | तेथे नांदतो | केवळ पांडुरंग ||"** त्याचा जर वास आपल्या हृदयात असेल तर आपल्या हृदयामध्ये प्रेम असायला हवं... नम्र असायला हवं, अहंकाराचा वास तेथे असता कामा नये. कारण जर घरामध्ये कचरा असेल तर त्या घरामध्ये आपल्याला थांबू वाटत नाही, बसू वाटत नाही, मनाची चलबिचल अधिक वाढत जाते. पण तेच त्या घरातील स्वच्छता असेल प्रत्येक वस्तू जागच्या जागी असेल तर मात्र त्या घरामध्ये आपलं मन रमतं. सकारात्मक ऊर्जा आपल्या निर्माण होते अगदी तद्वतच आपलं अंतकरण रुपी घर हे स्वच्छ असायला हवं. तिथे गुण आणि दोष यांचा वास असता कामा नये. ज्या क्षणी आपण अंतकरणाने सर्व गोष्टी स्वीकारून त्याप्रमाणे आचरण करून तेव्हा भगवंत आहेच आहे. तो आपले सोबत करत असतोच असतो. आपलं सारथ्य स्वतः भगवंत करत असतो म्हणून ह्या भावसोहळ्यामध्ये आपण पाच ज्ञानेंद्रिये पाच कर्म इंद्रिय आणि एक मन असं हे सर्व एकवटून आपण एकरूप व्हायला हवं. तेव्हाच आपल्याला खरी एकादशी घडणार आहे. जोपर्यंत हे सगळे एकरूप होत नाही तोपर्यंत चंचल मन स्थिर होणार नाही. आणि इंद्रियांना वळण लागणार नाही. त्याला संत सांगतात, "लागले इंद्रियांशी वळण तो भाव निराळा ||" जोपर्यंत इंद्रियांना वळण लागत नाही, अंतकरणांमध्ये प्रेम निर्माण होत नाही, दृष्टीमध्ये, आचार विचारांमध्ये बदल होत नाही, तोपर्यंत खऱ्या भगवंताची ओळख आपल्याला होऊ शकत नाही. वारीच्या सोहळ्यामध्ये जात असताना प्रत्येकाला जेवण देणारा, पाणी वाढणारा, वारीमध्ये चालणारा, विठ्ठल दिसत असतो. तेव्हा सगळा सकारात्मक भाव एकरूप झालेला असतो. माऊलीमय हे जग होऊन गेलेलं असतं. तोच भाव आपला सदोदित असेल तर आपल्याला दुःख होऊ शकत नाही. परंतु आपण जसं मंदिरात गेलं की आपलं सगळं लक्ष मंदिरा बाहेर काढलेल्या चपलांवर असतं. त्याला संत म्हणतात देह मंदिरात आणि चित्त खेटरात. असा जर आपला भाव असेल तर मग कसा या जीवाचा उद्धार होणार? वारीचा सोहळ्यामध्ये आपण जात असताना आपल्या मनामध्ये, चित्तामध्ये, वाणीमध्ये जर संसाराचं रहाट गाडगं सुरू असेल, इतरांविषयीचे गुणदोष सुरू असतील, तर आपण ह्या आचाराचरसृष्टीमध्ये भगवंत कसा पाहणार ? जोपर्यंत आपल्या मनामध्ये इतरांविषयीचे गुणदोष न पाहता, त्यांचे चिंतन न होता भगवंताचे नामस्मरण केलं, भगवंताचं चिंतन केलं संतांच्या मार्गदर्शनाप्रमाणे आचरण केलं तर मात्र आपला भाव शुद्ध व्हायला वेळ लागणार नाही. कारण संत सांगतात, भावबळे आकळे एरवी ना कळे करतळे आवळे तैसा हरी । 'जसा ज्याचा भाव तसा त्याचा देव' आपला भाव जर शुद्ध असेल तर या विश्वाच्या कणाकणात आपल्याला भगवंत दिसणार आहे. आणि आपला भाव जर शुद्ध नसेल तर पांडुरंगाच्या मंदिरात उभा राहून सुद्धा आपला पांडुरंग भेटणार नाही. म्हणून आपल्याला आपल्या आचार विचार विचारांमध्ये बदल केला तर भगवंत दिसल्याशिवाय राहणार नाही. आजही आपल्या मनामध्ये भक्ती ओत प्रोत भरलेली आहे, त्यामुळे विठुरायाचं नाम जरी घेतलं, चिंतन जरी घेतलं तरी आपोआप डोळ्यातून अश्रूधारा सुरू राहतात. कारण तेवढा विश्वास आपला आहे, तेवढी श्रद्धा आपली आहे. त्या भगवंताचं आपल्यावर सुद्धा अफाट प्रेम आहे. त्याची गणती कधी कशातच होऊ शकत नाही. पण ह्या संसाराचं रहाटगाडगं चालवत असताना त्यावरती आवरण येतं आणि आपणच आपल्या माऊली पासून थोडं बाजूला होतो आणि विषयांमध्ये रमतो. याला संत माऊली म्हणतात, विषय विषयाचा पडे पाडू | गोड परमार्थ लागे कडू || कडू विषय जीवाशी गोड झाला || तो भगवंत नाही का? आहे फक्त आपल्यावरती बुद्धीवर, मनावर आवरण आलं. त्यामुळे आपण आपल्याच भगवंतापासून आपल्या आई पासून, विठू माऊली पासून, संतांपासून थोडंसं लांब गेलो आणि आपण लांब गेल्यामुळे आपल्या मनामध्ये विषय आसक्ती तयार झाली. इच्छा तयार झाल्या , अपेक्षा वाढीस लागल्या आणि आपण सुखदुःखाच्या चक्रव्ह्यूवमध्ये अडकून गेलो. मग आपल्याला ह्या सगळ्यातून बाहेर पडायचं असेल तर आपला संतांवरचा असणारा विश्वास- श्रद्धा अशी दृढ ठेवायला हवी. आणि त्यातच आपण रममान असायला हवं. आपण जीवन जगत असताना ज्या गोष्टींना अधिक महत्त्व देतो, तीच गोष्ट आपल्याला अधिक दुःख देत असते. मग ह्या गोष्टी करायचा नाहीत का जरूर करायच्या... अगदी उत्तमोत्तम करायच्या. असं सद्गुरु माऊली सांगते, परंतु त्या करत असताना मात्र आपण कोणाच्या सत्तेमुळे करत आहोत याचा विसर पडता कामा नये. त्याला संत म्हणतात, चाले हे शरीर कोणाचीये सत्ते | कोण बोलवितो हरी विण | देखवी ऐकवी एक नारायणा | तयाचे भजन चुकू नका || मजवर भगवंताची सत्ता आहे, त्याच्या



संत साहित्यातील तत्वज्ञान भाग १३

सत्तेमुळे सगळं चराचर सृष्टी सुरळीतपणे सुरू आह. मग त्या भगवंताविषयी शंका येण्याचं काहीच कारण नाही. आपल्याला येणारा जाणारा श्वास सुद्धा तो भगवंत चालवत आहे. जर आपण जर चालवत असू तर मात्र आपलं एक क्षणात केव्हाच जय हरी झाला असतं. म्हणून आपण सावध राहिलं पाहिजे. यालाच संत तुकाराम महाराज म्हणतात , आपुलिया हिता जो असे जागता | धन्य माता पिता तयाचिया || कुळी कन्या पुत्र होती जी सात्विक | तयाचा हरिक वाटे देवा || गीता भागवत करिती श्रवण | अखंड चिंतन विठोबाचे ||तुका म्हणे मज घडो त्याची सेवा | तरी माझ्या देवा पार नाही || म्हणून आपण संत सांगतात त्याप्रमाणे आपला आचरण असायला हवं. त्यातच आपलं खरं हित आहे. संतांनी एवढा अनमोल असा मार्ग आपल्याला दाखवून दिलेला आहे परंतु आपण स्वतःच्या अविचाराने स्वतःचा घात करून घेतो. आणि आपण सुखदुःख भोगतो. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपल्याला सुख व्हावं, या हेतूनेच आपण कार्य करत असतो. परंतु आपल्याला सुख मात्र होत नाही, कारण सुखासाठी आपण धडपड करतो ,आनंदासाठी आपण धडपड करतो, पण तेच कार्य आपण आनंदाने करत नाही. आणि जे कार्य आनंदाने करत नाही त्यातून आपल्याला आनंद कसा मिळेल बरं ? म्हणून आपल्याला सुख द्यायलाही कोणी समर्थ नाही आणि दुःख द्यायलाही कमी समर्थ नाही. पण हे आपल्याला तेंव्हाच कळेल जेंव्हा आपल्या जीवनामध्ये सद्गुरु येतील, नाम आपल्याला मिळेल, सद्गुरु , नाम , देव, संत जेव्हा आपल्याला समजतील, त्यांचा कृपाशीर्वाद आपल्यावरती असेल तेव्हा या जीवाचा उद्धार झाल्याशिवाय राहणार नाही. तोपर्यंत आपण कितीही पोथ्या पाठ केल्या, कितीही ओव्या पाठ केल्या, कितीही माळा जपल्या तरी क्षणिक सुखाची प्राप्ती होईल. परंतु सुखाच्या पाठोपाठ दुःख पाठलाग करत येतच राहील. याला संत सांगतात, सुख पाहता जवा एवढे ... आणि हे सुख फक्त संतांच्या जवळच आहे. याला संत तुकाराम महाराज म्हणतात,

***संतांची गावी प्रेमाचा सुकाळ | नाही तळमळ दुःख लेश ||तेथे मी राहीन होऊनी याचक | घालितील भीक तेचि मज ||***

***संतांची गावी वरो भांडवल | अवघा विठ्ठल धन वित्त ||***
***संतांचे भोजन अमृताचे पान | करी ती कीर्तन सर्वकाळ ||***
***संतांचा उदिम उपदेशाची पेठ | प्रेम-सुख साठी घेती देती ||***
***तुका म्हणे तेथे आणिक नाही परी | म्हणोनि भिकारी झालो त्यांचा ||***

हाच सुख सोहळा आपल्याला अनुभवायचा असेल तर मात्र आपण विचारांनी सूक्ष्म व्हायला हवं. जोपर्यंत आपण विचाराने सूक्ष्म होत नाही, संतांच्या विचारातलं मर्म समजून घेत नाही, गुह्यर्थ आपल्या लक्षात येत नाही, तोपर्यंत संत आपल्याला कळणार नाहीत. संतांचे विचार आपल्याला समजणार नाही. आपण शब्दार्थाने, मतीत अर्थाने जर संत साहित्याचा विचार केला तर आपल्यावर शास्त्र कृपा होऊ शकत नाही. आपल्या मनामध्ये अंतकरणांमध्ये प्रेम निर्माण व्हायचं असेल, तर शास्त्र कृपा, गुरुकृपा, संत कृपा, अंतकरण कृपा, स्पर्श कृपा ह्या व्हायलाच हव्यात. जोपर्यंत ह्या कृपा होत नाहीत तोपर्यंत मी कोण आहे याचा उलगडा होऊ शकत नाही. आणि मी कोण आहे हे समजून घ्यायचं असेल तर आपण प्रथम संतांना शरण गेलं पाहिजे . जोपर्यंत आपण संतांना शरण जात नाही तोपर्यंत आपल्या मनीचा भाव निर्माण होणार नाही. यालाच संत सांगतात , "नाही निर्मळ जीवन काय करील साबण" बाह्यांग आपल्याला इतर वस्तू घेऊन स्वच्छ करता येईल पण अंतरंग आपल्याला स्वच्छ करायचा असेल तर त्यासाठी नामच लागणार आहे. जोपर्यंत नाम घेत नाही तोपर्यंत अंतरंग स्वच्छ होऊ शकत नाही आणि संत सांगतात मुळात परमार्थ हा फक्त अंतकरण शुद्धीसाठी आहे आणि अंतकरण शुद्धी ही नामाशिवाय होऊ शकत नाही. नाम हे गुरु शिवाय कार्य करू शकत नाही. म्हणून आयुष्यात येऊन आपण जर गुरु नाही केला तर आपलं जीवन वाया गेलं. त्याला संत म्हणतात ,नाम घेता वाया गेला | ऐसा कोणी देखीला || आपल्या मनामध्ये सकारात्मक भाव तयार होत नाही, प्रेम निर्माण होत नाही कारण आपण शरण जायला मागत नाही. यालाच तुकाराम महाराज म्हणतात, **लहानपण देगा देवा |मुंगी साखरेचा रवा || ऐरावत रत्न थोर | त्यासी अंकुशाचा मार || ज्याचे अंगी मोठेपण | तया यातना कठीण || तुका म्हणे जाण | व्हावे लहानाहुनि लहान ||**

जोपर्यंत आपण विचाराने सूक्ष्म होत नाही तोपर्यंत आपल्याला भगवंत कळूच शकत नाही. कारण संत सांगतात डोळ्यांनी दिसणाऱ्या गोष्टी आपल्याला नीट करता येत नसतील तर जो चर्मदृष्टीने दिसतच नाही तो भगवंता आपल्याला कसा कळेल . आपल्याला भगवंत आपला करून घ्यायचा असेल तर स्थूल गोष्टी ज्या आहेत त्या नीट समजून घेतल्या पाहिजे. नीट करता आल्या पाहिजे , व्यवहार उत्तम करता आला पाहिजे. आपल्या मनावरती आपल्याला काम करता आलं पाहिजे. जेव्हा ह्या गोष्टी संतांच्या मताप्रमाणे होतील तेव्हा कुठेतरी आपण हा भवसागर तरुण जाण्याच्या दृष्टीने पावले उचलली जाणार आहेत. म्हणून संतांवर विश्वास ठेवून त्याप्रमाणेच आपण आचरण करायला हवं. यालाच माऊली सांगतात, विचारूनी अहंकार सांडीजे | मग अस्तिच वस्तू होईजे || जोपर्यंत आपण विचारांचा विचार करत नाही तोपर्यंत संतांच्या हृदयातील भाव आपल्याला कळत नाही. आणि तेव्हा आपल्या लक्षात येईल की संत तुकाराम महाराज म्हणतात, त्याप्रमाणे

***बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल | करावा विठ्ठल जीवभाव || येणे सोसे मन झाले हावभरी | परती माघारी घेत नाही ||***
***बंधनापासुनी उकलली गाठी | देत आले मिठी सावकाश ||***
***तुका म्हणे देह भरीला विठ्ठले | काम क्रोधे केले घर रिते ||***

जनाबाई म्हणतात त्याप्रमाणे उठता, बसता दळीता कांडीता आपण हरी बोललं पाहिजे. त्यासाठी आपल्याला भूतकाळाचा विसर पडला पाहिजे आणि आपण भविष्यकाळाची चिंता सोडून दिली पाहिजे . वर्तमान काळात आपण जगायला शिकलं पाहिजे. जोपर्यंत आपण वर्तमान काळात जगत नाही तोपर्यंत आपल्याला कोणत्याही गोष्टीचा आनंद घेता येणार नाही. प्रत्येक मनुष्य जीव हा एकतर भूतकाळात घडलेल्या घटनांमुळे त्रस्त असतो किंवा भविष्यकाळात काय घडणारे या गोष्टीमुळे तो चिंतेत असतो. त्यामुळे वर्तमानात निघून चालला प्रत्येक क्षण हा त्याला दुःख देऊनच जात असतो. तो आलेलाही कळत नाही आणि गेलेलाही कळत नाही. आत्ताचा चालू असणारा क्षण कधी भूतकाळात जमा होतो आणि त्याचाही आपल्याला अधिकाधिक त्रास होतो हे आपल्यालाच कळत नाही. म्हणून भूतकाळात जे काही घडून गेलेला आहे त्याचा विसर पडायला हवा .त्यासाठी मनावरती आपण कार्य करायला शिकलं पाहिजे, मन स्थिर होत नाही तोपर्यंत भूतकाळाचा विसर पडू शकत नाही . आपल्याला सुखी व्हायचा असेल , ज्या काही घटना घडून गेल्या आहेत त्या धरून न बसता सोडून देत आल्या पाहिजेत. आपण इतरांच्या कडून अपेक्षा करतो पण तीच गोष्ट करायला आपलं मन तयार होत नाही. आपल्याकडुन कळत नकळत चूक झाली असेल ,तर ती आपण भगवंत चरणी अर्पण करतो. भगवंताने संतांनी, आपल्या प्रेमाच्या माणसांनी ते विसरून जावं ही जशी आपली अपेक्षा असते अगदी तद्वत्तच इतरांच्याकडून घडलेल्या घटना सुद्धा आपण विसरून जायला हव्यात. कारण संत तुकाराम महाराज सांगतात ,

***दया क्षमा शांती |तेथे देवाची वसती || पावे धावोनिया घरा राहे | धरुनिया थारा कीर्तनाचे वाटे || बराडिया ऐसा लाटे होते | तुका म्हणे घडे पूजा नामे देव जोडे ||***

आपल्या अंतकरणांमध्ये प्रेम,भक्ती भाव असतो परंतु जसं संत सांगतात त्याप्रमाणे पाणी हे शुद्ध निर्मळ आहेच आहे फक्त ते जर कारल्याला गेलं तर कडू होतं ,चिंचेला गेलं तर आंबट होतं , मिरचीला गेलं तर तिखट होतं, उसाला गेलं तर गोड होतं, म्हणून दोष पाण्याचा नाही. तसंच आपलं हे अंतर्मन आहे त्याच्यामध्ये प्रेम आहेच आहे फक्त ते विषयांमध्ये भरकट जातं आणि विषयांमध्ये भरकटत गेल्यामुळे मनामध्ये गुणदोष निर्माण होतात. आपण आपल्या जीवनामध्ये घडणाऱ्या काही घटना असतात ,गोष्टी असतात त्या सहजपणे आपल्याला इतरांशी बोलता येत नाही. मन मोकळेपणाने सांगता येत नाही. पण त्याच गोष्टी आपण आपल्या भगवंताशी बोलत असतो. आपलं जे काही दुखणं असेल ते भगवंता चरणी आपण वाहत असतो. आणि आपल्याला समजून घेणारा आपलं हित जाणणारा भगवंता शिवाय दुसरं कोणी असूच शकत नाही. पण आपल्या बुद्धीमध्येच भेद असल्यामुळे आपल्याला या गोष्टींची लवकर उकल होत नाही. जेव्हा उकल व्हायला सुरुवात होते तेव्हा आपल्या ह्या विश्वातील कार्यकाल संपत आलेला असतो .म्हणून आपला जर आपल्याला उद्धार करून घ्यायचा असेल आणि आपण आपल्या विचाराने जा नरक यातना भोगत आहे त्या नको असतील, तर आपण वेळेस सावध व्हायला हवं. आपला भाव हा कोणत्याही गोष्टीवर कोणत्याही परिस्थितीवर तेवढ्या वेळे पुरता असता कामा नये. वारीच्या सोहळ्यात जाताना माऊलीच्या नामाचा गजर करत असताना आपल्याला माऊली शिवाय दुसरं कोणीही दिसत नाही. ज्याक्षणी आपण घरात पाऊल टाकतो, आपल्या कार्यक्षेत्रात पाऊल टाकतो तेव्हा आपल्याला माऊली दिसत नाही. तेव्हा आपल्याच लोकांतील आपल्याला गुणदोष दिसायला लागतात. हे आवरण जोपर्यंत बाजूला होत नाही तोपर्यंत भगवंताची आणि आपली नाळ पुन्हा जोडली जाऊ शकत नाही. आपण आईच्या गर्भामध्ये अगदी नऊ महिने राहत असतो कारण त्यावेळेला आपली आणि भगवंताची नाळ जोडलेली असते. आता जर आपल्याला एक दिवस अंधार कोठडीत कोंडलं तर आपण श्वास सुद्धा घेऊ शकणार नाही. मन अस्वस्थ होऊन जाईल . परंतु नऊ महिने नऊ दिवस गर्भामध्ये राहणार हा जीव त्यावेळेस किती आनंदात होता. कारण त्याची नाळ त्यावेळेस भगवंत सोबत जोडलेली आहे . आता आपला ते सुख अनुभवता येत नाही कारण भगवंताचे आपले जोडलेली नाळ आपल्या उपाधींने, अहंकाराने तोडली आहे. जोपर्यंत उपाधी बाजूला जात नाही, मी पणाचा अहंकार बाजूला जात नाही, माझं , मला बाजूला जात नाही तोपर्यंत भगवंताचे आपली नाळ पुन्हा जोडली जाऊ शकत नाही. आणि जो ओतप्रोत असणारा आनंद तो आपल्याला मिळू शकत नाही. म्हणून संत सांगतात आपल्याला कोणती गोष्ट प्राप्त करून घ्यायची नाही. भगवंत हा प्राप्तीचा विषय नाही तर तो समजून घेण्याचा जाणून घेण्याचा विषय आहे. प्राप्तीची प्राप्ती आपल्याला संतांच्या मार्गाप्रमाणे जाऊन करून घ्यायची आहे. संतांशिवाय भगवंत प्राप्त होऊ शकत नाही, असलेला भगवंत आपल्याला कळून येऊच शकत नाही, कारण भगवंताने सर्व चाव्या संतांच्या हाती दिलेले आहेत. सद्गुरु माऊली सांगतात, "बिन गुरु न मिले संता" गुरु शिवाय संत कळू शकत नाही, भगवंत कळू शकत नाही, नाम कळू शकत नाही. म्हणून आपल्या मनामध्ये भक्ती भाव जो आहे, तो भक्ती भाव जाणून घेणारा समजून घेणारा आपल्या वाटेवरील काटे बाजूला करणारा गुरु आपल्या आयुष्यामध्ये यायला हवा. यालाच संत तुकाराम महाराज म्हणतात , ***भक्ताचा महिमा भक्तची जाणती | दुर्लभ या गती आणिकांसी || जाणोनि नेणते जाले तेणें | सुखे न बोलोनि मुखे बोलताती ||***

म्हणून संतही सांगतात, न बोलो फार, न बैसो जनामध्ये, मोडतील भक्तीच्या वाटा, आणि कोपतील संतजन " यालाच संत पुढे जाऊनही म्हणतात, मूख हलेना, कंठ हलेना, जीवा न सूमरे राम , राम हमारा जप करे , हम बैठे आराम " परंतु त्यासाठी आपला मनीचा भाव हा नम्र असायला हवा. यालाच संत तुकाराम महाराज म्हणतात, नम्र झाला भूता | तेणें कोंडीले अनंता || हेचि शूरत्वाचे अंग | हारी आणिला श्रीरंग || अवघा झाला पण | लवण सकळा कारण || तुका म्हणे पाणी | पातळपणे तळा आणी || म्हणून आपला जो भार वाहत आहे त्याला आपण शरण गेलं तर सगळं आवरण आपोआप बाजूला होतं. त्यालाच संत म्हणतात **विठू माझा लेकुरवाळा | संगे गोपाळांचा मेळा || निवृत्ति हा खांद्यावरी | सोपानाचा हात धरी || पुढे चाले ज्ञानेश्वर | मागे मुक्ताई सुंदर || गोरा कुंभार मांडीवरी | चोखा जिवा बरोबर || नामा करांगुळी धरी | जनी म्हणे गोपाळा || करी भक्तांचा सोहळा ||**

# गरुड आणि घुबड

आधुनिक केसरी

एका जंगलामध्ये एक गरुड व एक घुबड राहत होते. हे एकमेकांचे जनु शत्रूच होते. ते खूप दिवस एकमेकांशी भांडत असत. एक दिवशी ठरवतात की आपण आता मित्रत्वाने वागायचे. पिकांची पिल्ले खायचे नाहीत. यावर घुबड गरुडास मिळाले पण तुला माझी पिल्ले कशी दिसतात हे माहिती आहे का . तुला माझी पिल्ले माहित नसतील तर तू दुसऱ्या पक्षाचे म्हणून माझीच पिल्ले खाशील. अशी मला भीती वाटते. गरुड म्हणाले खरंच यार तुझी पिल्ले कशी दिसतात हे मला माहीतच नाही. यावर घुबड म्हणाले माझे पिल्ले खूप सुंदर दिसतात त्यांचे डोळे व पिसे सुंदर दिसतात त्यांचे सगळं काही सुंदर असतात. या वर्णनावरून माझे पिल्ले तुला सहज ओळखू येतील. पुढे एक दिवस गरुड तरी चा शोधत निघतो. एका झाडाच्या ढोलीमध्ये पक्षाचे पिल्ले दिसतात. विचार करतो की हे घुबडाचे तर पिल्ले नसतील. पिल्ले घाणेरडी कंटाळवाणी आणि कुरूप होती. यावर त्या गरुडाला लक्षात येते की आपल्याला घुबडाने सांगितले होते की माझी पिल्ले सुंदर आहेत. त्यावरून त्याला ही घुबडाची पिल्ले नाहीत असे समजून आपल्याला खाण्यासाठी काहीच अडचण नाही असे त्याला वाटते. तू त्या पक्षांना फत्ते करतो. घुबड त्या ढोली जवळ येतात त्याला आपली पिले नाहीशी झालेले पाहून तो लगेच गरुडाकडे जातो व त्याला म्हणतो की तू माझी पिल्ले मारून खाल्लीस असे मला वाटते. यावर गरुड म्हणाला मी पिल्लू खाल्ली तर आहेत पण तुझी नाही. यावर घुबड म्हणाले ते माझीच पिल्ले होती. म्हणाले यावर माझा काही दोष नाही तू आपल्या पिल्लाचे खोटे वर्णन केलेस त्यामुळे मी त्यांना ओळखू शकलो नाही. इतकी कुरूप पिल्ले घुबडाची नसतील एखाद्या दुसऱ्या पक्षाचे असतील असे समजून मी त्यांना मारून खाल्ले यात माझा काही अपराध नाही.




# तिमिरातूनी तेजाकडे जाणारे .... जागरण

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्योत्तर काळात भारतात अनेक सामाजिक व शैक्षणिक स्थित्यंतरे झाली.विशेषतः १९६० नंतर शैक्षणिक ओढ व त्यातून झालेले सामाजिक व आर्थिक बदल यामुळे एक संपूर्ण पिढी प्रभावित झाली. स्वातंत्र्य संघर्षानंतर या सामाजिक संघर्षात अनेक तरूण उभे राहिले.जगण्यासाठी, शिक्षणासाठी व एकूण संपूर्ण बदलासाठी लढणा-या या पिढीने आपल्या पुढच्या पिढीचे जगणे सोपे केले. देशाला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुनियंत्रित, प्रागतिक करण्यासाठी त्या पिढीने विविध योजना,प्रकल्प कार्यान्वित केले. शिक्षणाची कास धरली.प्रगतीच्या अनेक वाटा धुंडाळल्या.अशीच जगण्याची लढाई मांडणारे प्रसिद्ध लेखक भारत सातपुते यांचे जागरण हे आत्मचरित्र नुकतेच वाचनात आले.**

किसन वराडे यांचे सरवा,उत्तम बाविस्कर यांचे काळवाटा या आत्मचरित्रांच्या मार्गानेच जागरणही जाते.एक लेखक,कवी,शिक्षक, मुख्याध्यापक, व्याख्याते व वात्रटिकाकार असलेले भारत सातपुते सर ह्यांचा जीवनप्रवास तसाच खडतर आहे.अगदीच तावून सुलाखून तयार झालेले हे बहूआयामी व्यक्तीमत्व आहे. घरात एखादे शुभकार्य असेल,लग्न झालेले असेल तर आजही बरेच जण रात्रभर जागरण गोंधळ घालतात. पुस्तक हातात घेताच नाव व मुखपृष्ठ बघून काहीसे असेच असेल असे वाटले पण वाचत गेल्यानंतर लेखकाने आयुष्याच्या प्रवासात स्वतःच्या प्रगतीसाठी व समाजकार्यासाठी घातलेल्या निस्वार्थ जागराणाचा लेखाजोखा दिसून येतो.जागरण गोंधळ घालणा-या अल्पभूधारक शेतकऱ्याचा मुलगा, परिस्थितीशी दोन हात करत शिकतो, प्रामाणिकपणा, कष्टाळूवृत्ती व समाजसुधारक प्रवृत्ती यामुळे यशाची एकेक पायरी चढत आपली कर्मभूमी श्रमभक्तीच्या प्रकाशाने प्रकाशमय करतो.पाचवीलाच पुजलेल्या दारिद्र्याशी दोन हात करत,प्रगतीपथावर स्थिरावत एक यशस्वी मुख्याध्यापक म्हणून सेवानिवृत्त होतो याची यशोगाथा म्हणजे जागरण होय.
अभावग्रस्ततेकडून संपन्नतेकडे जाणारा जीवनप्रवास. लेखकाचे वडील सुपारी मिळाली की जागरण गोंधळ घालायला जायचे पण त्यांनी आपल्या मुलांना मात्र यापासून जाणीवपूर्वक लांब ठेवले.दुसरी शिकलेली आई व जेमतेम पाचवी शिकलेले वडील मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत मात्र जागरूक होते.रोज संध्याकाळी कामावरून आल्यावर अभ्यासाला बसवणे,अभ्यासाची चौकशी करणे हे ते न चुकता करत असत. लेखकाला या सगळ्या गोष्टींची चांगलीच जाण आहे लेखक म्हणतात आई भऊनी या जागरणाला जाऊ दिले नाही तर आमच्या शिक्षणासाठी जागरण केले. हातातोंडाची मोठ्या मुश्किलीने गाठ पडणारे हे कुटुंब शिक्षणाचा मात्र जागर करत होते.घरात अठरा विश्व दारिद्र्य पण सन्मार्ग कधी सोडला नाही.

जागरण कादंबरीची सुरवातच दिवाळी सणाचे वर्णन करून केलेली. वडीलांना मिळालेल्या मिठाईवर व टिकल्यांच्या एखाद्या डबीवर त्यांची दिवाळी साजरी व्हायची. दुस-यांनी टाकून दिलेले जुने कपडे अंगावर आनंदाने मिरवले जायचे. त्या काळात विकायला आलेली बंबई मिठाई केसांवर मिळत असे.मुलांना मिठाई खायला मिळावी म्हणून मेले केसही गळत नाही म्हणणा-या आईची उद्वीगता वाचकाला विषण्ण करते.हो पण संस्काररूपी धन मात्र आयुष्यभर पुरेल एवढे दिले आईवडीलांनी. त्यामुळे आयुष्यात कधी पाऊल वाकडे पडले नाही.संस्काराची हीच शिदोरी व दोन वेळच्या कष्टाची भाकरी या दोन गोष्टींमुळे लेखक कधी भरकटले नाही. परिस्थितीशी दोन हात करत शिक्षण घेत लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली.त्यात यशस्वी होऊन चांगली नोकरी ही मिळाली पण केवळ वडीलांच्या आग्रहाखातर परत गावी येऊन जिल्हापरिषदेत शिक्षकाची नोकरी पत्करली.आयुष्यर हाडाचे शिक्षक म्हणून काम केले.या कार्यकाळात अनेक चढउतार आले पण गंभीरपणे त्याचा सामना केला.एक शिक्षक म्हणून त्यांनी फक्त मुलेच घडवली नाही तर भवतालही सुसंस्कृत केला.व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न केले. सचोटी,कृतीशीलता,कार्यशीलता, सदाचारीवृत्ती व नेहमीच परपिडानाशक तत्परता यामुळे हळूहळू लक्ष्मी प्रसन्न होऊ लागली. कर्मभुमीतील अनुभव,सततचे चिंतन,मनन यामुळे ते अलिप्तपणे अक्षरोपासना करत राहिले.




भाकरीसाठी संघर्ष करता करता समाजातील तथाकथित दुष्ट प्रवृत्तीशीही ते लढत राहिले. या नादात लहान भावंडांकडे लक्ष द्यायचे राहून गेले याची खंत सातपुते सर प्रामाणिकपणे मान्य करतात.तरीही नोकरी नसलेल्या भावाला अण्णाला पूर्ण पाच एकर जमीन व गावातील जागा द्यायला संमती देतात.दुसरा भाऊ आबा हा विचार न करता वागणारा म्हणून ऑफिस मधील पैसा त्याच्या हातात देऊ नका अशी विनंती त्याच्या अधिका-यांना करतात.

कर्जबाजारीपणातून सुटका,अंगाशी आलेले नाना व मॅडम प्रकरण,नोकरीत वरिष्ठांशी होणारे वाद अशा अनेक प्रसंगांना तोंड देत समाजसुधारण्याची ओढ धरणे तसे कौतुकास्पदच.अशा अनेक प्रसंगांना प्रवाही भाषेत गुंफलेले असल्याने ही कांदबरी वाचायला कंटाळा येत नाही.आपण एवढे एकरूप होऊन जातो की आपल्या आयुष्यातील थोडेफार साधर्म्य असलेले प्रसंग वाचतांना हे आपलेच आत्मचरित्र आपण वाचतो आहोत असाही क्षणभर भास होतो.अभावग्रस्त बालपण जगलेला माणूस, फाटके तुटके मागून आणलेले कपडे घालणारा बालक मोठेपणी इतरांसाठी मदतीचा हात होतो.ताठ मानेने जगतो,पुढच्या पिढीला स्वाभिमानी,निर्व्यसनी बनायला शिकवतो. खोट्या वस्तीगृहाविरुद्ध तक्रार केल्यानंतर त्यांना वैयक्तिक पातळीवरती अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. पण सडेतोड वृत्तीच्या सातपुते सरांचे मनोधैर्य खचले नाही व्यवस्थेविरुद्ध ते लढत राहिले.शाळेच्या भल्यासाठी, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी सहकार्याशी घेतलेला पंगा त्यातून उद्भवलेले प्रश्न,या सर्वांशी निर्भयपणे दिलेला लढा अंतर्मुख करायला भाग पाडणारा आहे.कसलीही भोगलालसा त्यांच्या ठायी नव्हती. स्वैर,अविवेकी, विध्वंसक,संयमहीन, स्वैराचारी, स्वार्थी, अनर्थकारी, फुकट खाऊ वृत्ती ला त्यांनी कधीच जवळ केले नाही.प्रसंगी स्वतःचा खिसा खाली करून ऊर्जादायी कामे केलीत.ब-याचदा समाजाचा , व्यवस्थेचा विरोध पत्करून त्यांनी कामे केली.
आत्मरंगी अक्षरसाधकाची ही शब्दकरामत'जागरण' ही जिज्ञासू,वाचक,संशोधक,रसिक साहित्यिकांसाठी एक खमंग मेजवानीच आहे. कुटकुटे आजीचा तंबाखू सोडवण्याचा प्रसंग मला फार आवडला. आई तंबाखूमुळे कॅन्सर होऊन गेली म्हणून कुटकुटे आजीला आईसमान मानून मग त्यांना तंबाखू सोडायची गोड अट घालणे.त्याचा पाठपुरावा घेणे यासारख्या छोट्या छोट्या प्रसंगातून त्यांच्या कार्यपद्धतीची कल्पना येते.विद्यार्थी तेजसच्या आईने तेजसच्या वर्तवणुकीची तक्रार करताच तत्पर सायकलवर जाऊन त्याला समजवणारे शिक्षक आजकाल तसे दुर्मिळच.विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यावर मार्ग काढणे, प्रसंगी आर्थिक हातभार लावणे,कधी साखरपेरणी करत तर कधी कठोरपणे भरकटलेल्या विद्यार्थ्यांना वठणीवर आणणे, मुलांना व समाजातील इतर घटकांना व्यसनाधीनते पासून दूर करण्याचा प्रयत्न करणे, मुलांना शाळेच्या प्रवाहात आणणे.कृतीतुन त्यांना संस्कारित, स्वावलंबी व कृतीशील करणे, ह्यासाठी त्यांनी आयुष्य वेचले. हे सगळे प्रसंग, आठवणी या कादंबरीत सुंदर संवादी व प्रवाही भाषाशैलीत मांडले आहेत. स्वानुभवाचा हा मागोवा आत्मानंद देणारा आहे. सरदार जाधव यांचे सुंदर मुखपृष्ठ आपल्याला जागरण गोंधळात घेऊन जाते. मांजरा प्रकाशनाने प्रकाशित केलेले हे पुस्तक प्रत्येक वाचकाने वाचावे असेच आहे. भारत सातपुते सरांचा लेखन पसारा खूप मोठा आहे. त्यात अजून खूप भर पडायची आहे. त्यांच्या पुढील लिखाणासाठी खूप खूप शुभेच्छा.

**पुस्तक - जागरण, लेखक- भारत सातपुते**
**प्रकाशक - मांजरा प्रकाशन**

माधुरी चौधरी वाघुळदे
संभाजीनगर, ९४२१८६०८७३

# पंकजाताईचा पराभव खरंच झालाय का ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**बीड लोकसभा मतदारसंघात भाजपा नेत्या पंकजाताई मुंडे पराभुत झाल्या असल्या तरी नैतिकदृष्ट्या गुणवत्तेच्या आधारावर संशोधन केले आणि ज्या काही घटना समोर येवु लागल्या.शिवाय विजयाच्या बरोबरीने त्यांना मतं पडले. आकडेच्या गणितात स्ट्राईक रेट देखील चांगलाच म्हणावा लागेल. सामाजिकीकरण विखुरलेले असताना त्यात विजयासाठी मारलेली मुसंडी वाघाच्या झेपेसारखीच होती.**

अंतिम निकाल जय का पराभव ?यात संविधान भुमिकेत बोलायचं झालं तर पराभव त्यांना स्विकारावा लागला. पण सुक्ष्म निरीक्षण केलं तर प्रश्न असा पडतो की खरंच पंकजाताई पराभुत झाल्या का ?काल परवा एका जबाबदार पुढाऱ्याची व्हायरल झालेली कॅसेट एव्हाना त्यांनी केलेली गद्दारी अर्थात शेतानं कुंपण खाण्यासारखंच म्हणावे लागेल. आपल्यातला एक माणुस निवडणुक बप्पा कसे जिंकले? याचे वर्णन करत असेल तर यापेक्षा दुर्दैव कोणतं नाही? गद्दारीचीही परिसीमा असते. शेवटी विश्वास टाकावा कुणावर? किंवा अजुन असे किती कुंडलिक आहेत? ज्यांचे रंग भविष्यात पहायला मिळतील. नेतृत्वाने शेवटी करावं काय? आणि कसं वागावं? असे अनेक प्रश्न अनुत्तरीत राहु शकतात. ही गद्दारी शिवकालीन भाषेत सांगायची झाली तर औरंगजेबचा सेनापती झुल्फीखार अलीखान याने जेव्हा रायगडाला सैन्यासह वेढा घातला तेव्हा सुर्याजी पिसाळ किल्लेदाराच्या भुमिकेत रायगड किल्ल्याचे रक्षण करत होते. त्यावेळी याच पिसाळांनी आर्थिक मोहाच्या समुद्रात बुडुन स्वनेतृत्वासोबत गद्दारी करत अलीखानकडून हात ओले केले आणि रायगडाच्या किल्ल्याचा दरवाजा उघडुन दिला. तसंच काही बीड मतदारसंघात आपण विरोधकांना बुथ केंद्राचे दरवाजे उघडुन दिल्याचाही दावा व्हायरल कॅसेटद्वारे कानावर पडला.
बजरंग सोनवणे खासदार झाले तर पंकजाताई मुंडेंचा पराभव झाला. खरंच सोनवणे खासदार झाले का? पंकजाताईचा पराभव झाला का? याचं उत्तर सोनवणे खासदार झाले होय तर दुसऱ्या बाजुने ताईचा पराभव झाला उत्तर होयच येईल. पण राजकिय विश्लेषण गुणवत्तेच्या आधारावर करायचं झालं तर खरंच पंकजाताई पराभुत झाल्या का? या प्रश्नाचे उत्तर मतपेटीतुन मिळवण्यापेक्षा जनमतातुन हेरले तर त्या पराभुत झाल्या नाहीत हे नक्कीच. पंधरा लाखाच्या एकुण मतदानापैकी सात लाख पासष्ट हजार मतदान त्यांना पडले. पाच-सहा हजाराने सोनवणे निवडुन आले. साधारणतः पाहिलं तर तीन हजार जरी मतं मिळाली असती तर कागदावर पंकजाताई खासदार दिसल्या असत्या. खरं तर मतमोजणी आकडे घोळ झाले असाही अनेकांचा दावा गेवराई मतदारसंघातुन पुढे आलेला आहेच. मतमोजणी केंद्रात देखील पंकजाताईंना पडलेले मताचे आकडे कागदावर सोनवणेकडे गेल्याचे चमत्कारही लोकांनी पाहिले. पण मतं पडलेली कमी नाहीत. देशात लोकसभा निवडणुकीला पराभुत उमेदवाराला सर्वाधिक पडलेले मतं त्या यादीत देखील पंकजाताई पुढे आहेत. खरं तर त्यांचा पराभव विरोधकांना देखील मान्य नव्हता. कारण बीड जिल्ह्यातील सर्व समाज पंकजाताईच्या नेतृत्वावर प्रचंड प्रेम करतो आणि करत आला. त्या निवडणुकीत परळी, आष्टी आणि माजलगाव मतदारसंघातुन चांगलं मतदान मिळालं यात शंका नाही. माजलगावात देखील अपेक्षा प्रमाणे बरोबरीत मतदान मिळाले. आष्टी, पाटोद्यातुन दहा हजारं मतं गणितात कमी मिळाले. तरी मिळालेली बत्तीस हजार मतं कमी लेखुन चालणार नाहीत. केज विधानसभा मतदारसंघ गृहीत धरला तेवढं मताधिक्य इथे मिळाले नाही. तर गेवराईत अपेक्षापेक्षाही विरोधकांना मतदान पडले. सर्वात मोठा घात ज्याला विश्वासघात देखील म्हणता येईल. जो व्हायरल कॅसेटच्या माध्यमातुन पुढे आला. त्या बीड विधानसभा मतदारसंघाने मात्र फारच आश्चर्यकारक धक्का दिला. परळी पाठोपाठ आष्टी मतदारसंघाचं कौतुक करावं तेवढं कमीच. एकीकडे जातीय समीकरणं पुढे आलेले असताना अशा कठीण प्रसंगात उमेदवार म्हणुन पंकजाताईनं जो लढा दिला तो कमी नव्हताच. प्रचार यंत्रणेतल्या काही त्रुटी असु शकतात पण पंकजाताई असो किंवा पालकमंत्री धनंजय मुंडे असो यांनी लावलेली फिल्डींग कमी पडली नाही. बीडमध्ये कुणी काम केलं नाही? किंवा धोके कुणी दिले? ज्या पद्धतीने पराभवाला जबाबदार असलेले राजकिय समीकरण काल-परवा पुढे आले. ते पाहिल्यानंतर रायगडाचा दरवाजा किल्ल्याच्या रखवालदारांनीच जर उघडुन दिला तर मग यापेक्षा दुर्दैव कोणतं नव्हे? सुरूवातीला उल्लेख केल्याप्रमाणे अलीखानकडून सुर्याजी




पिसाळांनी आर्थिक लाभ घेतला अन् दरवाजाच उघडुन दिला. हा जो विश्वासघात आहे कदाचित नेतृत्वाच दुर्दैव म्हणावे लागेल. असे सुर्याजी पिसाळ आणखीन किती आणि कोण? कदाचित भविष्यात कळुन चुकेल. कारण नियत कुणाला सोडत नाही. भलेही औरंगजेबाने पिसाळांना जहांगिरी देवुन टाकली तर दुसऱ्या बाजुने छत्रपती शिवाजी महाराजांना देखील खंडोजी खोपडेंनी धोका देताना अफझलखानाचा तंबु गाठला होता. तसंच काही असे किती खंडोजी खोपडे ज्यांनी विरोधकांचे तंबु गाठले. हे देखील येणाऱ्या काळात निश्चित कळुन चुकेल. या लोकसभा मतदारसंघात जातीपातीचे राजकारण झाले का? कोणते समीकरण पुढे आले? किंवा कुणामुळे काय समीकरण बिघडले? ही चर्चा करण्याच्या भानगडीत जाण्यापेक्षा शेतानं जर कुंपण खाल्लं तर मालकासाठी दुर्दैव म्हणावे लागेल. एक मात्र निश्चित आहे की राजकारणात काम करताना नेतृत्वाला धोका दिला तर नियत साध्या कार्यकर्त्याला देखील सोडत नाही. कुठं ना कुठं हिसाब चुकता होतो आणि तो करावाही लागतो. पंकजाताईच्या पराभवाला कोण जबाबदार? असे रखवालदार हेच जबाबदार असं म्हटलं तर अतिशयोक्ती नाही. कारण जनतेच्या मनात हे नेतृत्व होतं आणि आजंही आहे. ज्यांनी संविधान पदावर बसावं आणि बीड जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करावा. कदाचित नेतृत्वाचा तो सुवर्णकाळ आणि विकासाचा सुर्य अवघ्या काही बोटावर मोजण्याएवढ्या दिवसावर आलेला असुन लवकरच पंकजाताईच्या बाबतीत चांगलं चित्र पहायला राज्यात निश्चित मिळणार असुन त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाचे स्वप्न देखील साकार झाल्याशिवाय राहणार नाही. सामान्य माणुस त्यांच्या नेतृत्वावर किती जीवापाड प्रेम करतो? हे राज्यातील नव्हे तर देशातील लोकांनी पाहिलं. पराभव जिव्हारी लागला म्हणुन चार तरूणांनी जीव गमावले. असं देशात एकाही नेत्याच्या बाबतीत घडलेले नाही. राजकारणात भले भले पराभुत होतात. पण आत्महत्या होण्याचे प्रकार याच नेतृत्वाबाबत पहायला मिळाले. सांगायचं तात्पर्य एवढंच आहे की, पंकजाताईचा पराभव खरंच झाला का? हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात पडतो तेव्हा त्या नैतिकतेच्या आणि गुणवत्तेच्या आधारावर तात्विकदृष्ट्या पराभुत झाल्या नाहीत असं ठणकावुन सांगायला आम्हीही मागे रहाणार नाहीत. एक जबाबदार कार्यकर्ता संभाषण करताना आम्ही किती बुथ केंद्र बप्पांना ताब्यात दिले? एव्हाना सारीच सारी यंत्रणा केजातल्या बंगल्यावर गहाण टाकली. याचाच अर्थ बीड विधानसभा मतदारसंघातून मिळालेले मताधिक्य यातले देखील बारकावे शोधायला हवेत. किल्ल्याच्या रखवालदाराने चाब्याच जर दुश्मनाच्या हातात दिल्या तर यापेक्षा विश्वासघात दुसरा कोणता असु शकत नाही.असं केलं नसतं तर बीड मतदारसंघातुन एवढं मताधिक्य विरोधकांना मिळालंच नसतं. एकानं धोका दिल्याचे कबुल केल्यानंतर असे डोमकावळे धोका देणारे भाजपात देखील कोण होते आणि कोण आहेत? येणारा काळ निश्चित सांगुन जाईल. खरं तर नेतृत्वाने देखील अशा धोकाधडी कार्यकर्त्यापासुन सावध रहायला हवं. एक गोष्ट खरी म्हणावी लागेल ती म्हणजे पंकजाताईचं मन आणि स्वभाव वाहत्या स्वच्छ निर्मळ पाण्यासारखं आहे. ना कुणाचा द्वेष ना गलिच्छ राजकारण, सामान्य लोकांच्या कल्याणासाठी जेवढं चांगलं करता येईल त्यापेक्षा अधिकचं त्या काही करतच नाहीत. पण स्वभावाचा देखील जवळचे लोक गैरफायदा घेतात. उनकाही हिसाब होना करना चाहिए.

# डिझायनिंग, आर्किटेक्चर व फॅशनमधील करिअरसाठी 'त्रिमिती' तर्फे रविवारी विनामूल्य सेमिनारचे आयोजन

## दहावी-बारावीनंतरचे अभ्यासक्रम, करिअरसंबंधी माहिती, तज्ज्ञांचे मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** बारावीनंतर डिझायनिंग, आर्किटेक्चर, फॅशन टेक्नॉलॉजीसारख्या क्षेत्रात शिक्षण व करिअरच्या अनेक संधी आहेत. मात्र, माहितीअभावी तुरळक विद्यार्थीच या क्षेत्रात प्रवेश घेतात. अधिकाधिक विद्यार्थ्यांना या नवनवीन अभ्यासक्रमांची माहिती व्हावी यासाठी तीन मैत्रिणींनी स्टार्टअप म्हणून सुरू केलेल्या 'त्रिमिती- दि इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन' संस्थेतर्फे रविवार, दिनांक ३० जून रोजी एका विनामूल्य सेमिनारचे आयोजन केले आहे. उस्मानपुऱ्यातील आयसीडी, श्रीनिधी हॉल येथे होणाऱ्या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह पालकांनीही उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

पारंपरिक अभ्यासक्रमांत अडकून न पडता डिझायनिंग, आर्किटेक्चर, फॅशन टेक्नॉलॉजीसारख्या वेगळ्या क्षेत्रात करिअरची संधी देणारे अनेक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. या प्रवेशासाठी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईनिंग (एनआयडी), नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी), कॉमन एंट्रन्स एक्झामिनेशन फॉर डिझाईन (सीड), अंडर ग्रॅज्युएट कॉमन एंट्रन्स एक्झामिनेशन फॉर डिझाईन (यूसीड), नॅशनल एप्टीट्यूड टेस्ट इन आर्किटेक्चर (नाटा) तसेच अभियांत्रिकी प्रवेशासाठी असणारी जॉईंट एंट्रन्स एक्झामिनेशन (जेईई पेपर २) सारख्या परीक्षांना बारावीनंतर सामोरे जावे लागते.

मात्र, या अभ्यासक्रमांची फारशी माहिती नसल्याने विद्यार्थी या क्षेत्राकडे वळत नाहीत. वळालेच तर देशभरातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करावी लागत असल्याने ऐन बारावीत तयारी सुरू करून उत्तीर्ण होण्याची शक्यता कमी राहते. यामुळे दहावीनंतरच ११ आणि १२ वी अशा दोन वर्षात प्रवेश परीक्षेची तयारी करणे गरजेचे आहे. नेमक्या याबाबतची माहिती 'त्रिमिती- दि इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन'च्या सेमिनारमध्ये दिली जाणार आहे.

उस्मानपुऱ्यातील संत एकनाथ रंगमंदिराच्या मागे श्रीनिधी हॉल, आयसीडी येथे रविवार, दि.३० जून रोजी संध्याकाळी ६ ते ८ दरम्यान "डिझायनिंग आणि आर्किटेक्चरमधील करिअर' या विषयावरील सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे. यात इन्स्टिट्यूट ऑफ इंटेरिअर डिझाईन अँड फॅशन डिझाईनचे (इफमा) संस्थापक अनंत आणि प्रणिता देशपांडे, आयसीडीचे संचालक प्रफुल्ल मिरजगावकर आणि 'त्रिमिती'च्या संचालिका शर्वरी पातूरकर, गौरी नरसापूर आणि दिव्या कुलकर्णी या मार्गदर्शन करतील. विद्यार्थ्यांनी पालकांसह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तीन मैत्रिणींचे स्टार्टअप 'त्रिमिती'

'त्रिमिती-दि इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन' हे स्टार्टअप तीन मैत्रिणींनी सुरू केले आहे. शर्वरी पातूरकर यांनी अर्बन डिझाईनमध्ये मास्टर ऑफ आर्किटेक्चर केले आहे. गौरी नरसापूर यांनी मास्टर ऑफ फाईन आर्ट्स इन पेंटिंगची पदवी घेतली आहे. तर दिव्या कुलकर्णी यांनी मास्टर ऑफ डिझाईन इन फॅशन टेक्नॉलॉजी-टेक्सटाईल डिझाईनचे शिक्षण घेतले आहे. तिघींना अध्यापन क्षेत्रातील पाच वर्षांचा अनुभव आहे. या क्षेत्रात अधिकाधिक मुलांनी वळावे यासाठी त्यांनी हा उपक्रम सुरू केला आहे हे विशेष.

# एकटं...

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग 55

जेव्हा आपलं घर माणसांनी, लेकरांनी भरलेलं असतं तेव्हा सहजच म्हटल्या जातं गोकुळ भरलेलं आहे. पण घरातील मुलं, माणसं जेव्हा शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने बाहेर जातात तेव्हा घर सुनं सुनं होतं.घरातील स्त्रीला एकटं वाटतं. पण सायंकाळी सगळे परत येणार या आशेवर ती असते. त्यामुळे फार काळ तिला एकटेपणा जाणवत नाही. नेहमी एकत्र राहणाऱ्या लोकांना एकटं राहणं आवडत नाही. पण काहींना सवयच असते एकटं राहण्याची.जे एकटे राहतात त्यांना पुस्तकं ,ग्रंथ वाचनाची आवड असेल तर ते एकटे नसतात. ग्रंथ ,पुस्तक त्यांच्या सोबतीला असतात. पण फार काळ एकटं कोणी राहू शकत नाही.

आणि राहू पण नाही. मनोरुग्न होण्याची भीती असते. तर ध्यान, अभ्यास ,लेखन, वाचन हे करताना एकटच असावं लागतं. पण अधून मधून मन रमवण्यासाठी माणसांचा सहवास हवा असतो .नाहीतर आपल्याला बोलता येऊन उपयोग काय.?

आपलं मधाळ बोलणं ऐकण्यासाठी कुणीतरी असावं. कोणाची तरी मधाळ वाणी आपण ऐकावी. समाजात एकत्र राहताना हे सगळं घडतंच आणि घडलं पाहिजे. एकटं राहणं आणि एकटं जगणं खूप अवघड प्रवास आहे .कारण आयुष्य भरभरून जगायचं असेल, खळखळून हसायचं असेल तर माणसांचं एकत्र सहवास असणं खूप गरजेचे आहे. कोणी आपल्याला एकटं पाडणार नाही असं आपलं वागणं असावं. आपणही कोणाला एकटे पाडू नये. एकटेपणात नकारात्मकता जन्माला येते. शरीरात रोग निर्माण होण्याची भीती असते. एकटेपणाचं जाळं आपल्या भोवती तयार व्हायला नको. आपणच त्या जाळ्यात अडकण्याची भीती असते .हम दो हमारे दो हे वाक्य आधी अवघड वाटायचं .पण आता तर हम दो हमारा एक ,हे जास्त रुजत चाललंय. मग त्या एकात न्यूनगंडाची भावना निर्माण होते. ते एकटं पडतं. त्याला एकट्याची सवय लागते. स्वतःच्या हिस्स्यात वाटेकरी त्याला नको असतो. वाटून घेण्याची सवय त्याला नसते. एकलकोंडेपणा वाढत जातो. काही वेळेला एकटं हवं पण कायम नको. जसं कधी एकच भाजी खाण्याऐवजी मिक्स भाजी खातात. त्यात काही न आवडणाऱ्या भाज्या पण आवडून जातात. तसंच जीवनाचं आहे. सगळ्यांसोबत आयुष्य गेलं, जीवन जगलो तर जीवनाचं सार्थक होतं. एकटं वाटत नाही. एकट्याने कोणतेच प्रश्न सुटत नाही. उलट वाढतात.. वाळलेला गवताचा एकत्र पिळा केला तर हत्तीला सुद्धा आवळता येईल. म्हणून एकटं राहू नका...



# शिक्षक विद्यार्थ्यांच्या दारी अभियान

## फुले महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले. शाळा नुकत्याच सुरू झाल्या. पण पाहिजे तशी उपस्थिती शाळेत नाही. विद्यार्थी शाळेत आला नाही तर शाळाच विद्यार्थ्यांच्या घरी जायला हवी. मुलगा शिकला तरच कुटुंब, समाज आणि राष्ट्र सक्षम होऊ शकते. तो मुलगा शाळेत येण्यासाठी "शिक्षक विद्यार्थ्यांच्या दारी" अभियान नुकतेच महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने सुरू करण्यात आले. या अंतर्गत विविध गावांना भेटी देणे, नागरिकांना शिक्षणाचे महत्त्व समजून देणे आणि विद्यार्थ्यांना शाळेत पाठवा असे आवाहन करण्यात आले. विद्यार्थी हा सबंध शिक्षण व्यवस्थेचा कणा आहे. पण हा कणाच शाळेत नसेल तर काय करणार? विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये शिक्षणाचा अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे. यामुळे विद्यार्थ्यांनी शाळेत यावे यासाठी महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या वतीने डॉ. संजय गायकवाड, प्रा. विजय वाघ, प्रा. राजेश भावसार, प्रा. जे एस पाटील, प्रा. एस आर जाधव, प्रा. सत्येंद्र सपकाळे, प्रा. अमोल निकम आदींनी वेगवेगळ्या गावात जाऊन विद्यार्थ्यांना शाळेत येण्याचे आवाहन केले.

आधुनिक केसरी



लय भारी

# सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424

दररोज नाश्त्याला काय करावे ,किंवा अचानक कोणी पाहुणे येणार म्हटल्यावर खास नवीन आणि छान असे काय बनवावे ,जे जास्त तेलकट ,तुपकट नसेल , कोणालाही सहज आणि आवडीने खाता येईल आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे जे कमी कष्टात ,कमी वेळात होऊन पचायला हलके असेल , हा प्रश्न सर्वच गृहिणींना नक्कीच पडतो . त्यातून इतक्या साऱ्या अपेक्षा पूर्ण करून कोणते पदार्थ बनवता येतील हा यक्ष प्रश्नच असतो .म्हणूनच आज असे काही पदार्थ या एकाच गोष्टीपासून बनणारे तुम्हाला सांगते आहे ते बनवून पाहण्याची नक्कीच तुम्हाला ओढ लागेल .कारण आजच्या हेल्थची काळजी असणाऱ्या सर्वच लोकांना उत्तम अशी पोटभर खाण्याजोगी आणि टेस्टी अशी ही डिश आहे . मग करूया ना सुरुवात ...**साहित्य :** १ वाटी हिरवे मूग , अर्धी वाटी पोहे किन्वा रात्री बनवलेला भात असेल तरी चालेल , अर्धी वाटी दही ,2 चमचे बारीक रवा , 2 चमचे साजूक तूप , 1 वाटी पालक प्युरी , अर्धा चमचा धने जिरे पावडर , 5..6 लसूण पाकळ्या , 4..5 हिरव्या मिरच्या ,1..2 लाल मिरच्या ,चवीनुसार मिठ , 2 चमचे फोडणीसाठी तेल , 1 चमचा तीळ , मोहरी ,जिरे , हिंग आणि असेल तर कढीपत्ता, वरून सजावतिसाठी थोडी बारीक शेव व कोथिंबीर. **कृती :** प्रथम चांगले उकळलेले पाणी मोठ्या बाऊल मध्ये काढून त्यात मूग घालून साधारण अर्धातास घट्ट झाकून भिजत ठेवावेत . मग कढई मध्ये पुन्हा भरपूर पाणी गरम करण्यास ठेवावे .ते गरम झाले की त्यात पालकाची निवडून स्वच्छ धुवून घेतलेली पाने 2 मिनिटे ठेवावीत. जास्त वेळ ठेवली तर रंग काळपट येतो . नंतर ती पाने लगेंच थंड पाणी घालून ते काढून निथळून ठेवावीत . पोहे भिजवुन ठेवावेत .मिक्सरच्या भांड्यात लसूण ,हिरव्या मिरच्या जसा तिखटपणा आवडत असेल त्यानुसार कमी जास्त घालाव्यात व फिरवून घ्याव्यात . मग त्यातच 1 बर्फाचा खडा घालून पालकाची पाने घालून मस्त बारीक वाटून घ्यावे . बर्फामुळे मिक्सरचे भांडे गरम होत नाही व त्यामुळे पालकाचा रंग हिरवागार राहतो . मग ते एका बाऊल मध्ये काढुन घ्यावेत आणि भात किंवा धुवून ठेवलेले पोहे व दही मिक्सरमध्ये थोडेसे पाणी घालून छान फिरवून घालावेत . ते पालकाच्या प्यूरीमध्ये घालावेत . आता त्यात रवा व साजूक तूप शक्यतो पातळ असलेले घालावे . धनेजिरे पावडर घालून चवीनुसार मिठ घालावे आणि ते बॅटर एकाच दिशेने वर्तुळाकार असे हलके होईल असे 2..3 मिनिटे फिरवावे . फिरत असताना त्यात हवेचे बुडबुडे भरून ते हलके होऊन मस्त फुगते. आता गॅसवर इडलीपात्र किंवा ढोकळा पात्र पाणी घालून गरम करण्यासाठी ठेवावे . थोडेसे तेल लावून त्यात बॅटर घालून ते स्टॅण्ड पात्रात ठेवावे व सात ..आठ मिनिटे उकळत वाफवायला ठेवावे . बॅटर मस्त टम्म फुगून छान जाळीदार झालेले असेल . ते बाहेर काढून सुरीने कडा सैल करून अलगद बाहेर काढून घ्यावेत व एका डिशमध्ये काढून ढोकळा स्टॅण्ड मध्ये बनवले असेल तर सुरीने चौकोनी आकारात कट करावेत . आता गॅसवर कढईत फोडणीसाठी तेल गरम करण्यासाठी ठेवावे . मोहरी ,जिरे ,तीळ घालून कढीपत्ता व हिंग घालावा व लाल मिरच्यांचे तुकडे घालून खमंग फोडणी बनवून त्यावर सर्वत्र पसरून घालावी . सजावटीसाठी बारीक शेव किंवा खोबरे घालून सर्व्ह करावे . **वैशिष्टय:**

ही डिश हिरव्यागार रंगावर लाल मिरच्यांचे तुकडे , पिवळी शेव ,पांढरेशुभ्र खोबरे यामुळे खूपच आकर्षक दिसते. शिवाय टेस्टलाही अप्रतिम लागते . जिरे ,मोहरी ,आणि तिळांमुळे एक वेगळीच भन्नाट चव लागते . तुपाऐवजी तेल घातले तरी चालते , पण साजूक तुपामुळे जाळी तर पडतेच पण खूप हलकी होऊन स्वादिष्ट लागते . आप्पेपात्रात याच पिठाचे आप्पेसुद्धा हिरवेगार, स्वादिष्ट बनवता येतात . नॉनस्टिकच्या तव्यावर या बॅटर मध्ये अजून थोडेसे बायंडिंग आणि चवीसाठी 2 चमचे बेसन घातले आणि सैलसर करुन धिरडे सुद्धा मस्त होतात . आधी प्लॅनिंग असेल तर रात्री मूग थंड पाण्यात भिजत घातले तरी चालतात . नवीन आणि आकर्षक असून टेस्टी आणि हेल्दी.. आरोग्यासाठी उत्तम अशी ही डिश आबाळवृद्धांसाठी चालणारी असून नक्कीच आवडणार .



# अतिवृष्टीची मदत मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी ई-केवायसी करून घ्यावी : तहसीलदार गोरे

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** तालुक्यात गत दोन वर्षातील विविध नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीची मदत मिळविण्यासाठी गावातील तलाठ्याकडून विशिष्ट क्रमांक मिळवून घेत ईकेवायसी करून घेणे अनिवार्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी तत्काळ आपल्या खात्याची ई-केवायसी करून घेण्याचे आवाहन कंधारचे तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी केले आहे. माहे



सप्टेंबर-ऑक्टोबर २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे, माहे मार्च एप्रिल २०२३ मध्ये झालेल्या गारपिठ व अवकाळी पावसामुळे, जुन-जुलै २०२३ मधील झालेल्या अतिवृष्टीमुळे व माहे नोव्हेंबर २०२३ मधील अवेळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी तलाठी, ग्रामसेवक व कृषि सहायक यांची त्रिस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. या त्रिस्तरीय समितीमार्फत तालुतील शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले होते. आजपर्यंत ५ लाख १४ हजार १८३ शेतक-यांना ४१५ कोटी रुपयांचे अनुदान बें क खात्यावर वितरण करण्याची मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी जिल्ह्यातील ६६ हजार ३३९ शेतकरी यांनी ई-केवायसी न केल्यामुळे रक्कम रुपये ४२ कोटी नुकसान भरपाईचा निधी प्रलंबित आहे. तरी शेतक-यांकडून विशिष्ट क्रमांकासह लवकरात लवकर ई-केवायसी करून घेण्याची कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी तहसीलदारांना दिले आहेत. त्या अनुषंगाने मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांच्याकडून निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये बाधित शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम वितरीत करण्याबाबत शासनाच्या पोर्टलवरून यादी अपलोड करण्याची कार्यवाही करण्यात आली. ही यादी अपलोड केल्यानंतर बाधित शेतकऱ्यांना आपल्या गावातील तलाठ्याकडून VK (विशिष्ट क्रमांक) घेऊन ई-केवायसी करणे बंधनकारक आहे.

त्याबाबत तहसील कार्यालयाकडून तलाठ्यामार्फत जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले असून, बाधित शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी केली नाही . अशा शेतक-यांनी तात्काळ जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रावर जावून ती करून घ्यावी, अन्यथा आपल्या आधार लिंक खात्यावर अनुदान जमा होणार नाही, असे तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे .

# सावळदबारा येथे वीज पडल्याने दोन जनावरे ठार; तत्काळ भरपाई द्यावी

## प्रा. जीवन कोलते पाटील यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे काल दि.२७/६/२४ रोजी रात्री झालेल्या विजेच्या कडकडाटास ह पाउस कोसळल्याने शेतकरी वासुदेव खडके यांचा गाय गोठा गावाबाहेर असून तिथे त्यांची जनावरे बांधली होती समोरच्या एका झाडावर वीज कोसळून दोन जनावरे यांची एक मोठी गाय व एक मोठा बैल हे दोनन्ही जनावरे दगावले. यामुळे शेतकऱ्याचे खूप मोठे नुकसान झाले आहे अगोदरच आस्मानी संकट व त्यामध्ये हे नैसर्गिक संकट शेतकऱ्यांनी जगावे की मरावे हा पडलेला मोठा प्रश्न तेव्हा कधी न भरून निघणारे हे नुकसान आज या शेतकऱ्याची झाले आहे तेव्हा त्या नैसर्गिक आपत्तीचा काहीतरी मोबदला शासनाने द्यावी अशी मागणी प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते व शेतकरी यांनी केली आहे. वीज पडल्या



बाबत प्राथमिक माहिती महसूल विभाग व पशुवैद्यकीय विभागाला देण्यात आलेली आहे असे शेतकरी वासुदेव खडके यांनी सांगितले. गावा जवळील येथील शेत शिवारात रात्री बारा ते एक वाजेच्या दरम्यान अचानक विजेच्या कडकडाट आणि अवकाळी पावसाला सुरवात होऊन वीज कोसळली. यावेळी एक बैल व गाय जागेवरच ठार झाले मात्र इतर कुठलेही हानी झाली नाही. पावसाचा विजेच्या कडकडाटा सह पावसाचे थैमान सुरु असून आज दि २७ जूनला रात्री 12 वाजता दरम्यान सावळदबारा येथील अल्पभूधारक शेतकरी वासुदेव दत्तू खडके यांच्या मालकीचे गाय व बैल असून गाय गोठ्यात नेहमी प्रमाणे बांधून ठेवले होते. अचानक पावसाचा व विजेच्या कडाडण्याला सुरवात झाली क्षणात वीज कोसळली त्यामुळे गाय बैल जागेवरच ठार झाले त्यामुळे शेतकरी वासुदेव खडके यांच्यावर अस्मानी संकट कोसळले असून मोठे नुकसान झाले आहे. सदर घटनेची माहिती होताच सोयगाव महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल होऊन मृत जनावरांचा सोयगाव पशुवैद्यकीय अधिकारी डॉ काकडे,काबळे यांनी पंचनामा केला असून अहवाल वरिष्टकडे सादर केला आहे. सदर जनावरांच्या अचानक जाण्यामुळे मोठे नुकसान झाल्याने प्रशासनाने तात्काळ शेतकरी वासुदेव खडके याना नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी प्रा.जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी केली आहे.

# राज्यावर 'झिका' संसर्गाचे सावट

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** पुणे शहरात 'झिका'चा रुग्ण आढळल्यानंतर नाशिकमधील वैद्यकीय विभाग 'अॅलर्ट मोड'वर आला आहे. अगोदरच शहरात स्वाइन फ्लू आणि डेंग्यूचे रुग्ण आढळत असल्याने 'झिका'चा शिरकाव होऊ नये यासाठी आरोग्य-वैद्यकीय यंत्रणेकडून उपाययोजनांना वेग देण्यात आला आहे. महापालिकेकडून शहरात साथरोग नियंत्रणासाठी 'रॅपिड रिस्पॉन्स टीम' कार्यरत करण्यात आली असून, मुख्यालय स्तरावर साथरोग नियंत्रण अधिकारी, क्षेत्रिय स्तरावर नोडल अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली आशा, अंगणवाडी सेविकांमार्फत दैनंदिन घरभेटींमध्ये वाढ करण्यात आल्याची माहिती मुख्य आरोग्य तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण यांनी दिली. शहरात पावसाळ्याच्या तोंडावर डेंग्यू आणि स्वाइन फ्लूचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. या साथरोगांमुळे पालिकेचे टेन्शन वाढले असतानाच आता राज्यात 'झिका' या विषाणूची 'एंट्री' झाली आहे. पुण्यातील एरंडवणा परिसरामध्ये 'झिका'चे तीन रुग्ण आढळले आहेत. ४६ वर्षीय डॉक्टर आणि त्यांच्या १५ वर्षीय मुलीला 'झिका'चा संसर्ग झाला असून, त्यांच्या संपर्कातील आणखी एकजण 'झिका'ने बाधित झाला आहे. नाशिक-पुणे 'कनेक्शन' पाहता नाशिकमधील आरोग्य यंत्रणा 'अॅलर्ट मोड'वर आली आहे. नाशिकमधून पुण्यात, तसेच पुण्यातून नाशिकमध्ये दररोज शेकडो जण कामानिमित्त, शिक्षणासाठी ये-जा करीत असतात. परिणामी पुण्यातील 'झिका'चा प्रादुर्भाव नाशिकमध्येही होण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे महापालिकेने सावधगिरी बाळगत तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर दिला असून, कीटकजन्य आजारांवर नियंत्रणासाठी महापालिकेच्या माध्यमातून धूर, जंतूनाशक फवारणी केली जात आहे.

# मांडवा येथील सरपंचासह महिलांचे अवैध धंद्यांविरोधात पोलिस अधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील मांडवा या गावातील सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष पोलीस पाटील यांच्यासह गावातील महिलांनी रिसोड येथील पोलीस स्टेशनवर धडक देऊन गावातील अवैध धंदे बंद करण्याबाबत दिनाक 28 जुलै 2024 रोज शुक्रवारला रिसोडचे ठाणेदार भूषण गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक गीते यांना निवेदन दिले. निवेदनात नमूद केले आहे की,रिसोड तालुक्यातील मांडवा हे गाव सुसंस्कारित असून या गावात अवैध धंद्याने कळस गाठला असल्यामुळे अवैध धंद्याचे माहेरघर बनले आहे.गावात अवैध देशी - विदेशी दारूसह वरली मटका,पत्ता राजरोसपणे सुरू असून यामुळे लहान बालकावर विपरीत परिणाम होत असून गाव व्यसनाधीन बनले आहे.मांडवा गावातील अवैध धंदे बंद करण्यासाठी सरपंच, माजी उपसरपंच, पोलीस पाटील यांच्यासह तंटामुक्ती अध्यक्षानी पुढाकार घेतल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. मांडवा गावातील अवैध धंदे तात्काळ बंद करण्यात यावे अन्यथा लहान बालकासह ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर सरपंच दुर्गा सुरेश गरकळ, तंटामुक्ती अध्यक्ष भगवान दलू राठोड, पोलीस पाटील माणिक गरकळ, माजी उपसरपंच विजय चव्हाण, विष्णुपंत कायंदे, शितल जाधव, अनुसया चव्हाण, कौसाबाई जाधव, सीताबाई राठोड ,सुभद्राबाई भवाळ, सिंधुबाई मोरे, कांताबाई कांबळे, विमलबाई वाकळे, कमलबाई जाधव, लताबाई भवाळ, डॉ. सुरेश गरकळ, संदीप पालवे, हरिभाऊ गरकळ, विजय जाधव, अनिल चव्हाण, ज्ञानेश्वर गरकळ यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# शाळा तेथे पास योजना राबविण्यात येणार : आगार प्रमुख विजय काळवणे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात शाळा तेथे पास योजना अंतर्गत राबविण्यात येणार आहे असे आवाहन सोयगाव आगार प्रमुख विजय काळवणे यांनी केले आहे.शाळा तेथे पास योजने अंतर्गत आज दि.26/6/2024 रोजी न्याशनल मराठी हायस्कुल, सोयगाव येथे आगार प्रमुख विजय काळवने तसेच शाळेचे मुख्याध्यापक अमजद पठाण सर यांच्या हस्ते मुलींना पासेस सोबत आगाराच्या वतीने वही व पेनाचे वाटप करण्यात आले त्यावेळी स्थानिक वार्ताहर योगेश बोखारे,आबा बाविस्कर सह शिक्षक वृंद त्याच बरोबर आगारातील पर्यवेक्षक / कर्मचारी श्री सतिश अंभोरे, स्थानक प्रमुख कृष्णा कावळे, लेखाकार ज्ञानेश्वर वाडेकर,सतिश पाटील,विनोद जाधव, समाधान जाधव हे उपस्थित होते सोयगाव एसटी महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. एसटीतून विद्यार्थ्यांना 66 टक्के सवलत दिली जात असते. या पाससाठी केवळ 33 टक्के भरुन पास काढता येत असतो. तर विद्यार्थींना बारावी पर्यंत मोफत एसटी पास मिळत असतो. या विद्यार्थ्यांना आता एसटीने थेट शाळेत पास वितरीत करण्याची योजना आखली आहे. राज्यात एसटी महामंडळाच्या सध्या 16 हजार बसेस असून 87 हजार कर्मचारी सेवा देत असल्याची माहिती सोयगाव आगार प्रमुख विजय काळवणे यांनी बोलताना सांगितले आहे. एसटी महामंडळ अनेक समाज घटकांना सवलतीत प्रवास घडवित असते. या सवलतीची प्रतिपूर्ती रक्कम सरकार एसटी महामंडळाला परत करीत असते. शाळा- महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना आता एसटीचे पास हे थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येणार आहेत. तशा सूचना एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला दिल्या आहेत. नवीन वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा आता सुरू झालेल्या आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून 66% इतकी सवलत दिली आहे,म्हणजे केवळ 33%



रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. त्याचप्रमाणे शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते. यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहून पास घ्यावे लागत होते. किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापन कडून पास घेतले जात असत. पण यंदापासून विद्यार्थ्यांना पास साठी आता रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही.

आता एसटी महामंडळ त्यांच्या शाळा – महाविद्यालयांनी दिलेल्या यादीनुसार संबंधित विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देणार आहे. जेणेकरून त्यांचा वेळ वाया जाणार नाही. या संदर्भात 18 जुन पासुन एसटी प्रशासनातर्फे 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' हि विशेष मोहीम आता सोयगाव तालुक्यात राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले आहे. या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनींना होणार आहे असल्याची माहिती सोयगाव तालुक्याचे आगार प्रमुख विजय काळवणे यांनी बोलताना सांगितले आहे.



धाराशिव जिल्ह्यातील येडशी रामलिंग येथे धबधबे खळखळून वाहत आहेत. येथील अभयारण्यात माकडांची संख्या भरपूर आहे. हे पाहण्यासाठी पर्यटकांची येथे रोज गर्दी असते. आलेल्या पर्यटकाकडून मिनरल बाटलीची मागणी करत चक्क माकडाने शुद्ध पाणी पिण्याचा आस्वाद घेतला. छायाचित्र : सचिन कोरडे, धाराशिव

# नितीनदादा लांडगे यांच्याकडून दिंडीतील वारकऱ्यांना रेनकोट

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रेरणेने व पालकमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना राज्य समन्वयक व शिवसेना धाराशिव जिल्हा निरीक्षक श्री नितीनदादा लांडगे यांच्या वतीने आज संत श्री रामचंद्र बोधले संस्थान डिकसळ इथून निघणा-या दिंडीतील वारक-यांना रेनकोट वितरीत करण्यात आले. यावेळी वारकरी संप्रदाय चे अध्यक्ष श्री प्रकाश महाराज बोधले यांनी उपस्थित वारकरी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. तसेच मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे यांनी नेहमीच वारकरी व दिंडी यांना आधार दिल्याचे म्हटले. या वेळी स्त्री पुरुष वारकरी मिळून तिनशे विठूभक्तांना रेनकोट वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा, युवासेना जिल्हा प्रमुख गणेश जगताप, सरचिटणीस निखिल घोडके, सुधीर भवर, सागर मुंडे, ॲड मंदार मुळीक, शंकर वाघमारे, चेतन कात्रे, प्रेम घुले, सोमा वावरे, संजय मुंडे, सनी बोरगे, प्रशांत शेळके,शकील काझी, संघर्ष कांबळे, उत्रेश्वर बप्पा चोंदे, धम्मपाल विद्यागर, राजेश गोरे, सचीन सौलाखे, डॉ गोविंद जोगदंड, किरण जावळे, संतोष एखंडे इत्यादी अनेक जण उपस्थित होते.



# लोणंद येथे छत्रपती शाहू महाराजांना मराठा समाज मंडळाचे अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** रयतेचा राजा, थोर कल्याणकारी राजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती लोणंद ता.खंडाळा येथे मराठा समाज मंडळाच्या वतीने साजरी करण्यात आली. या प्रसंगी जेष्ठ मार्गदर्शक आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते. छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी सुभाष घाडगे, सुनील यादव, शशिकांत जाधव, राहुल घाडगे, बाळासाहेब कदम, दादा इंदलकर, हेमंत निंबाळकर, अविनाश नलावडे, रोहित निंबाळकर, संदीप शेळके, विशाल जाधव,नितीन शिंदे, रोहित गाढवे, कन्हैया नलावडे, फुल मोरे, सदानंद मोरे, श्रीकांत सावंत, रवींद्र शेळके, अविनाश सावंत, शरद पवार, मेहुल भाटिया, तानाजी भाटे आदी उपस्थित होते.



# बंद पशुवैद्यकीय दवाखान्यामुळे जनावरांची गैरसोय; तालुक्यात आदेशाला केराची टोपली

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील पशुवैदकीय दवाखाना आठवड्यातून दोन दिवस मंगळवार गुरुवार चालु राहिल असे शासनाचे पत्र २८/५/२०२४ रोजी निघाले तरीही स्थानिक पशुवैद्यकीय दवाखाना २श्रेणी एक महिना उलटूनही शासनाच्या परिपत्रकाची अंमलबजावणी झाली नाही केंद्रीय ग्राहक संरक्षण समिती चे संस्थापक अध्यक्ष एडवोकेट जावेद मिर्झा यांच्या पाठ पुराव्यामुळे जिल्हास्तरावरुन तात्पुरत्या स्वरूपावर दोन दिवसाचे आदेश काढूनही अंमलबजावणी झाली नाही ग्रामस्थांच्या पशुधनाची उपचारा अभावी हेळसांड होत असल्याची तक्रार जिल्हा समितीवर केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद अशासकीय सदस्य अन्वर अली, अमोल जैन, अन्वर शेख विभागीय कार्याध्यक्ष रहीम पठाण यांचा प्रयत्नाला यश आले. परंतु केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे विभागीय अध्यक्ष रहीम पठाण व केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे सोयगाव तालुका अध्यक्ष शामका प्रदीप चव्हाण पत्रकार सुनील चोरमले व गावकरी शेख रियाज, शेख गफार फिरोज खान, ज्ञानेश्वर मानकर, भीमराव शेळके, राजू गावडे यांनी पशुवैदकीय दवाखाना सावळदबारा दि.२७/६/२०२४ वार गुरुवार रोजी भेट दिली असता बंद असल्याचे दिसून आले.

अजिंठा डोंगर रांगेत वसलेले सावळदबारा अति दुर्गम भागासाठी हा श्रेणी २ दवाखाना असताना तो बंद का आहे. शेतकरी व आदिवासीं लोकांकडे मोठ्या प्रमाणात गाई, म्हशी, शेळ्या आहेत. येथे साथीचे रोग तसेच वन्य प्राण्यांकडून हल्ले झाल्याच्या घटना घडत असतात. यामुळे दवाखाना व डॉक्टर उपलब्ध असणे गरजेचे आहे. वरिष्ठ या बातमीची दखल घेतील का नाही घेऊ शकत सध्या प्रशासन साखर झोपेत आहे.

# सेंट जॉन्स व रायन इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थी संसद सदस्यांचा शपथविधी संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** सेंट जॉन्स हायस्कूल व रायन इंटरनॅशनल स्कूल येथे नवनिर्वाचित विद्यार्थी संसद सदस्यांचा शपथविधी सोहळा 29 जून रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सय्यद नदिमा व नाट्यकलावंत विनोद जैतमहाल उपस्थित होते. कार्यक्रमाचा आरंभ प्रार्थना गीते, पवित्र ग्रंथातील वचने, विविध नृत्याविष्कार व स्वागतगीताने झाला. या प्रसंगी प्रमुख अतिथींनी शाळेच्या विविध विभागीय निवडणूक प्रक्रियेत निवडून आलेल्या विद्यार्थी संसद सदस्यांना स्कार्फ व बॅजेस देऊन सन्मानित केले. तसेच त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्यांप्रति सजग करून शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांनी सामाजिक जीवनात वावरताना सावध रहावे तसेच विद्यार्थी संसद सदस्य म्हणून



लोकशाही मूल्यांचे रक्षण करावे, असे आवाहन या वेळी विनोद जैतमहाल यांनी केले. दरम्यान शाळेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. ए. एफ. पिंटो व संचालिका श्रीमती ग्रेस पिंटो यांनी नवनिर्वाचित सदस्यांचे अभिनंदन केले. अध्यक्षांनी ठरवून दिलेल्या बारा मूल्यांपैकी नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी मुख्याध्यापिका तसेच शिक्षकवृंदाने विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. वृक्षारोपणाने सोहळ्याचा समारोप झाला.

# अभ्यासाने आत्मविश्वास, अहंकार यातील फरक कळतो

## प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर:** आभ्यासाने आत्मविश्वास व अहंकार यातील फरक कळतो, आणि आत्मविसाचा आवाज (गुंज) यशापर्यंत जातो तर अहंकाराचा आवाज (गुंज) विनाशापर्यंत जातो. हे चांगल्याप्रकारे समजल्यावर विद्यार्थी अहंकाराला टाळून आत्मविश्वासाला आत्मसात करण्याचा आटोकाट प्रयत्न करेल. हे निकोप व सुदृढ समाजरचनेसाठी फार आवश्यक आहे. असे प्रतिपादन बालाजी मंदिर टिळक नगर येथील मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या सप्ताहाचे दुसरे पुष्प गुंफताना प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांनी केले. "ज्ञानेश्वरीतील आभ्यास-एक चिंतन" या विषयावर भाष्य करताना ते पुढे म्हणाले की, भारतीय परंपरेत वयाच्या प्रत्येक टप्प्यावर जे आश्रम सांगितले आहेत त्यामुळे आजही भारतीय जीवन प्रणाली जगात सर्वश्रेष्ठ मानली जाते. ते चार आश्रम म्हणजे ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम. यापैकी 'ब्रहमचर्याश्रम' हा इतर तीन आश्रमांचा पाया मानला जातो. कारण माणसाचा हाच खरा अध्ययनचा काळ असतो. यासाठी पूर्वी 'गुरूकुल' पध्दत होती. मुलगा आठ वर्षांचा झाला की, त्याला अध्ययनासाठी गुरूगृही सोडले जायचे. गुरू त्याच्या मानसिकतेचा आभ्यस करून त्याप्रमाणे त्याला शिक्षण देत असत. त्यामुळे पुढे हे विद्यार्थी आत्मविश्वास संपादन करून आयुष्यात यशस्वी व्हायचे. पण आज काळाच्या ओघात 'गुरूकुल' पध्दत जवळपास संपुष्टातच आली आहे. तेव्हा प्रत्येक पालकाने आता आपले घरच गुरूकुल बनवायला हवे. आणि आपल्या मुलाला असे काही शिक्षण द्यावे की, जेणे करून त्याचा सर्वांगीण विकास होईल. पुढे प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) म्हणाले की, पालकाने आपल्या घराचे घरकुल करताना काही गोष्टी लक्षात घ्याव्यात त्या म्हणजे मुलाची आसन पध्दत, मनाची एकाग्रता, सहजयोग, मनाने वाचन, परिक्षेत झालेल्या चूकांची दुरूस्ती करून घेणे आणि मुलांचे छंद जोपासणे या सहा मुद्यांवरती कुलकर्णी सरांनी अतिशय सविस्तर असे केलेले भाष्य उपस्थितांना आवडले.

आभ्यास विषयी ज्ञानेश्वरीत १२ व्या अध्यात माऊली म्हणतात की, **आभ्यासहुनि गहान | पार्था मग ज्ञान | ज्ञानापासोनि ध्यान विशेषिजे || मग कर्मफलत्यागु | तो ध्यानापासोनि चांगु | त्यागाहुनि भोगु | शांती सुखाचा || ऐसिया या वाटा | इहींचि पेणी सुभटा | शांतीचा माजिवटा | ठाकिला जेणें ||**

या ओव्यांचे अतिशय सुंदर निरूपण करतांना कुलकर्णी सर म्हणाले की, इथे माऊलींनी आपल्याला अतिशय मोलाच्या अशा पाच गोष्टी सांगितल्या आहेत. त्या म्हणजे आभ्यास "आपण निश्चित केलेल्या ध्येयपूर्तीसाठी जे जे अनुकूल आहे ते ते स्विकारणे आणि जे जे प्रतिकुल आहे ते ते नाकारणे आणि ही क्रिया अखंडपणे चालू ठवणे म्हणजे आभ्यास होय."
ज्ञान सत् आणि असत् यातील भेद नाहीसा करते ते ज्ञान होय.
ध्यान फक्त आपल्या ध्येयवरतीच सदैव लक्ष केंद्रित करणे म्हणजे ध्यान. कर्मफलत्याग कर्मफलत्यागात दुःखांचा अंशही शिल्लक रहात नाही म्हणून हे फार महत्त्वाचे आहे.
शांती माऊलींनी इथे शांतीचा अर्थ फार व्यापक स्वरूपात सांगितला आहे. इथे शांती म्हणजे परमेश्वर प्राप्तीची सुखद अनुभुती होय. यालाच मोक्षप्राप्ती म्हणतात. वेगवेगळे दृष्टांत देऊन अतिशय सध्या, सरळ, सोप्या भाषेत माऊलींनी जे, आभ्यासा पेक्षा ज्ञान कसे श्रेष्ठ आहे, ज्ञानापेक्षा ध्यान कसे श्रेष्ठ आहे, ध्यानापेक्षाही कर्मफलत्याग कसा श्रेष्ठ आहे आणि कर्मफलत्यागा नंतर परम शांती अर्थात परमेश्वर प्रापतीची अनुभूती कशी येते हे उलगडून सांगितले. सुरूवातीला बालाजी मंदिराच्या ट्रस्ट तर्फे आजचे वक्ते प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास मंदिर ट्रस्टचे सर्व सदस्य व परिसरातील आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सामुहिक पसायदान म्हणण्यात आले व त्यानंतर प्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




# प्रभात महाविद्यालयात छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील निधोना येथील प्रभात कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात छत्रपती शाहू महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. लहाने यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकतांना ते म्हणाले की बहुजन समाजाचा उद्धार करण्यात व समतेचा पाया रचण्यात शाहू महाराजांचा सिंहाचा वाटा आहे. आहेरे व नाहीरे यांची दरी मिटवणारा दूरदर्शी लोकनायक राजा आहेत. महाराष्ट्राच्या पुरोगामी नेतृत्वात अग्रपंगतीत असणारे व्यक्तिमत्त्व, अशा लोकनायकाचे विचार आपणास नेहमीच प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरतील. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी व गावकरी यांची उपस्थिती होती, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक शरद सोनवणे, डॉ. एस. एच. पठाण, डॉ. संजय पाथ्रीकर, डॉ. शिवाजी डापके, डॉ शिवाजी वाणी, प्रविण काटकर, उमेश जाधव, पप्पू काटकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# जिल्हा उपाध्यक्षपदी पुंजाजी नलावडे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** (ता; खुलताबाद) येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे क्रियाशील कार्यकर्ते पुंजाजी तुकाराम नलावडे यांची त्या पक्षाच्या जिल्हा



उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने त्यांचे ग्रामवासीयांतर्फे अभिनंदन करण्यात आले. हे गाव डोंगराळ भागात असून ग्रामीण 25 ते 30 गावांच्या केंद्रस्थानी असले तरी वर्ष 1983 सालापर्यंत गावात जाण्यासाठी अर्धा किलोमीटर रस्ता धांड नदीतून पूर्वापार असल्याने गावात बारमाही बस येत जात नव्हत्या तसेच गिरजा नदीवर पूल नसल्याने बैलगाडीचा व पायी प्रवास हाच पर्याय होता. शरद चंद्र पवार पार्टीचे सक्रिय कार्यकर्ते असल्याने 1983 झाली सप्टेंबर मध्ये बाजार सावंगी येथे श्रीमान शरदचंद्र पवार यांना बोलावून प्रत्यक्ष चिखलातून रस्त्या व्हावी गावात पाणी नेले होते त्यांनी त्वरित दखल घेऊन शासनाकडून अर्धा किलोमीटर रस्ता शेतातून मंजूर करून घेतल्याने आज झालेल्या सडकेमुळे कन्नड व पिशोर नागापूर या मार्गांना संलग्न झाले आहे जिल्हा मार्गावर गाव आले आहे त्यामुळे आठवडी बाजार मोठी बाजारपेठ शैक्षणिक संस्था कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय यांची उभारणी होऊन शिक्षणाचे केंद्र झाले आहे. अशा कर्तबगार कार्यकर्त्यांची तालुका कामगिरी पाहून जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या उपाध्यक्षपदी केल्याचे पत्र जिल्हा अध्यक्ष पांडुरंग तायडे पाटील यांनी 26 जून रोजी पत्र पाठवून नियुक्ती केली.

# श्री तुळजा भवानी मंदिर संस्थानकडून पंढरपूर विकास आराखड्याची पाहणी करून घेतला सुविधांचा आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजा भवानी मंदिर व परिसराचा महाराष्ट्र शासनाकडून होवू घातलेला विकास आराखड्याला मदत व्हावी या प्रमुख उद्देशाने पंढरपूर देवस्थानचा सर्वकष झालेला विकास आराखड्याची पाहणी करण्यासाठी आज दि.२७ जुन २०२४ रोजी श्री तुळजा भवानी मंदिरचे शिष्टमंडळ गेले होते.
यावेळी शिष्टमंडळाने प्रथम श्री विठ्ठल रूक्मिणीचे दर्शन घेऊन राज्याच्या पुरातन विभागाच्या देखरेखेखाली मंदिरचा नव्याने झालेला दगडी गाभा-याची पाहणी केली.दर्शन मंडपाची, व्हिआयपी पासेस, गावकरी दर्शनाची सोय आदीची पाहणी करून भक्तांच्या सोयीसुविधांची माहिती घेतली. या शिष्टमंडळात धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा श्री तुळजा भवानी मंदिर सस्थानचे अध्यक्ष सचिन ओंबासे, स्ट्रक्टवेल डिझाईनर अँड कन्सल्टंट प्रा.लि.तुर्भे नवी मुंबईचे कार्यकारी संचालक, पुण्याचे वास्तुविशारद हेमंत पाटील,श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी तथा प्रांत अधिकारी राजेंद्र शेळके,पंढरपूर देवस्थानचे मंदिर व्यवस्थापक बालाजी पुदोलवार, तहसिलदार तथा व्यवस्थापक सोमनाथ माळी, श्री तुळजा भवानी भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे धाराशिव जिल्हा



सहसंपर्कप्रमुख अमरराजे कदम, उपाध्ये पुजारी मंडळाचे अध्यक्ष अनंत कोंडो, धार्मिक सहव्यवस्थापक सिद्धेश्वर इंतोले, विश्वास कदम, इंजि.राजकुमार भोसले, इंजि.अमृतराव, शंकरराव कदम, कबीर महाराज, आदी हजर होते.

# पोलीस भरतीत सापडले उत्तेजक द्रव्य

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पोलीस भरतीसाठी गोरेगाव येथे सुरू असलेल्या मैदानी परीक्षेदरम्यान उमेदवाराकडे उत्तेजक द्रव्य सापडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून याप्रकरणी वनराई पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. धावताना स्फुर्ती यावी यासाठी या उमेदवाराने स्टेरॉईड आणि इंजेक्शन आणले होते, ते उत्तेजक द्रव्य पोलिसांनी ताब्यात घेतले. या गुन्ह्यांचा तपास सुरू असून संबंधित तरूणाला नोटीस देऊन सोडण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. परीक्षेसाठी पात्र असलेल्या ३७४ उमेदवारांना गुरुवारी बोलाविण्यात आले होते. यावेळी प्रत्येक उमेदवारासह त्यांच्याकडील सामानाची तपासणी करण्यात आली. तपासणी केल्यानंतर त्यांना आतमध्ये सोडण्यात येत होते. प्रवेशद्वारावर एसआरपीएसचा एक अधिकारी आणि इतर कर्मचारी संबंधित उमेदवारांची तपासणी करीत होते. यावेळी एका उमेदवाराच्या बॅगमध्ये त्यांना स्टेरॉईड आणि एका खाजगी कंपनीच्या इंजेक्शनची सिरींज सापडली. हा प्रकार वरिष्ठांना सांगितल्यानंतर त्यांनी संबंधित उमेदवाराविरुद्ध कारवाईचे आदेश दिले.

# एसबीईएस सेंटनरी स्कुलचा स्थापनादिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था संचलित, एसबीईएस सेंटनरी स्कुलचा ०८ वा स्थापनादिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे प्राचार्य श्री राहुल मोहनपुरकरसर, शाळेच्या समन्वयक श्रीमती प्रज्ञा देशपांडेमॅडम आणि श्रीमती राखी गुप्तामॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वतीच्या प्रतिमेसमोर दीप- प्रज्वलन आणि पुष्प समर्पण करून झाली.

याप्रसंगी शाळेचे प्राचार्य श्री राहुल मोहनपुरकर यांनी ०८ व्या स्थापना दिनाच्या शुभेच्छा देताना, श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचा संस्कार आणि लौकिक जपणारी शाळा म्हणून उल्लेख होईल असा ठाम विश्वास व्यक्त केला. कोविडच्या काळातही शाळेने विद्यार्थ्यांचे आभासी वर्ग सतत घेतले. एकाही विद्यार्थ्याचे नुकसान होऊ दिले नाही. याचाही उल्लेख केला. विद्यार्थ्यांनी मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर शैक्षणिक आणि सामाजिक शिखरे पादात्रांत करावीत अशी अपेक्षा व्यक्त केली. ज्ञानरचनावाद आणि शाळेच्या शैक्षणिक जडणघडणीत विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा नेहमीच सहभाग असेल, त्यादृष्टीने प्रत्येक विद्यार्थ्याने सतत कार्यरत राहिले पाहिजे असेही मत व्यक्त केले. शाळेच्या समन्वयक श्रीमती प्रज्ञा देशपांडेमॅडम यांनी अहवाल वाचन केले .प्रशालेतील शिक्षिका श्रीमती ज्योती कोल्हटकर यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन आणि प्रास्तविक केले. श्रीमती हेमा जोशी यांनी स्वागत वाचन केले.

श्री गजानन केचे आणि श्री मंगेश कुलकर्णी यांच्या विद्यार्थी संचाने, ओंकार स्वरूपा या गाण्याचे सादरीकरण केले. शाळेचे विद्यार्थी आद्या कहाळेकर – १ ली, कु. विदुला मुळे - इयत्ता ७ वी, कु. वैष्णवी पाटील - इयत्ता ८ वी यांनी आपले अनुभव कथन केले. कु. सानवी देशपांडे या विद्यार्थीनीने, 'ज्योती कलश झलके' या गाण्यावर आपला नृत्याविष्कार सादर केला. शिक्षक वर्गातर्फे प्रातिनिधिक स्वरूपात श्रीमती विद्या कुलकर्णी आणि श्री द्वारकानाथ जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. व्यासपीठावरील आकर्षक सजावट श्रीमती सारिका नाईक यांनी केली .संपूर्ण कार्यक्रमाचे छायाचित्रण श्रीमती




राहीन शेख आणि भारती चोपडे यांनी केले. प्रस्तुत कार्यक्रमाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध कलागुणांच्या सादरीकरणासाठी आपल्या पाल्यांना, पालकांनी मदत केली. बैठकव्यवस्था श्री सुभाष देशमुख, श्रीमती शीतल गोपीशेट्टी व वर्गशिक्षकांनी पाहिली. प्रस्तुत कार्यक्रमाचे श्रीमती रंजना हुलसुरकर यांनी आभार प्रदर्शन केले. स्कुलच्या ०८ वा स्थापनादिन निमित्ताने शाळेचे पालकवर्ग, सामाजिक, शैक्षणिक अशा क्षेत्रांतून शाळेस शुभेच्छा प्राप्त झाल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शालेय कर्मचारी, शिक्षकवृंद आणि विद्यार्थीवर्गाने परिश्रम घेतले.




# मातोरीत दोन गटांत राडा; डीजे, दुचाकी फोडल्या

## अनेकांची डोकी फुटली; मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात

आधुनिक केसरी न्यूज

**गेवराई :** बीड जिल्ह्यात मराठा आरक्षण व ओबीसी आरक्षणावरून दिवशे दिवस वातावरण तापत असताना दिनांक २७ रोजी शिरूर तालुक्यातील व गेवराई हद्दीतील मातोरी गावात दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. या गावात दोन समाजाचे दोन गट आमने सामने आल्याने प्रचंड दगडफेक झाली. अनेक दुचाकी फुटल्या आहेत. डीजेचे देखील मोठं नुकसान झालेले आहे. मातोरी गावाच्या आजुबाजुने प्रचंड संख्येने लोक जमा झालेले असून परिसरात तणावाची परिस्थिती आहे. विशेष म्हणजे मातोरी हे गाव मनोज जरांगे पाटील यांचे आहे.

महाराष्ट्रात जाती आरक्षणावरून वातावरण दिवशी दिवस तापत असताना अंबड तालुक्यात आंतरवली या ठिकाणी मनोज जरांगे उपोषण करून मराठा समाजाला आरक्षण मिळाले म्हणून स्वतः बलिदान देण्याचे तयारीत असतानाच केवळ मराठा सम ाजाला आरक्षण मिळू नये या उद्देशाने ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांनी वडीगोद्री या ठिकाणी उपोषण करून एक प्रकारे मराठा समाजाला विरोध करण्याचा प्रकार केला आणि मराठा आणि ओबीसी यांच्यामध्ये याच ठिकाणी ठिणगी पडली असून त्याचा प्रकार दोन समाजामध्ये एक प्रकारे जातीय तेढ निर्माण झालेला आहे याचे परिणाम म्हणजे सध्या बीड जिल्हा मराठा समाज ओबीसी समाजाच्या विषयी लोकसभेचे निवडणुकीचे वातावरण सर्व महाराष्ट्राने पाहिलेले आहे. ओबीसी आरक्षणासाठी उपोषणाला बसलेले लक्ष्मण हाके भगवानगडावर जाणार होते. त्यांना पाडळशिंगी येथून घेण्यासाठी तिंतरवणी, माळेगाव, पारगाव या ठिकाणचे ग्रामस्थ डिजे ने लावून पाडळशिंगीकडे निघालेले होते. त्यांनी त्यांनी सोबत आणलेल्या डीजेवर मातोरीत आल्यानंतर दोन गाणे वाजवले. काही कार्यकर्त्यांनी इथे एका समाजाविरोधात घोषणा दिल्या. त्यामुळे दुसऱ्या बाजुने मातोरी ग्रामस्थांनी त्यांना डीजे बंद करून गावातून बाहेर जाण्यास सांगितले. मात्र मातोरी ग्रामस्थ आणि हाकेंना आणण्यासाठी निघालेल्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. पर्यायाने दोन्ही गटात प्रचंड दगडफेक झाली. यात अनेकांची डोकी फुटली आहेत. तर डीजेचे मोठे नुकसान करण्यात आले आहे. चार ते पाच दुचाकीं यावेळी फोडण्यात आलेल्या आहेत.. ही घटना समजल्यानंतर आजुबाजुच्या अनेक गावांनी मातोरी गावाला चोहोबाजूंनी घेरलेले आहे. त्यामुळे परिसरात प्रचंड संख्येने लोक जमलेली आहेत. पोलीसांनी जास्तीची कुमक मागवून मातोरीकडे धाव घेतलेली आहे.

# 'कीड' सुशिक्षित बेरोजगारांची वास्तव दाहकता मांडणारी कादंबरी : अरविंद उतखेडे

## विशाल मोहोड यांच्या 'कीड' कादंबरीचे थाटात प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** कीड या कादंबरीतून जातीय दंगली,कर्फ्यु,जाळपोळ,पदभरती,भ्रष्टाचार,निराशा, बेगडी राजकारण,खोटी आश्वासनं,या साऱ्या वादळात उद्ध्वस्त होणारी तरुणाई,वाचकाला अस्वस्थ करते.तसेचं आंदोलनातील मोर्च्यामधील जोश,निवडणूक काळातील खोटी आश्वासनं,योजनांमधील टक्केवारी, मराठा आरक्षणाचा तिंतबा, कौटुंबिक कलह, न कमावत्या मुलाबाबतची कुटुंबाची मानसिकता,पुरेसे शिक्षण घेऊनही रिकामे हात, त्यामुळे होणारी मनाची घुसमट,पवित्र पोर्टलची दैना,शिक्षण क्षेत्रातील दलाली,शोषक संस्थाचालक, व नैराश्येतून झालेल्या आत्महत्या यामुळे 'कीड' ही सुशिक्षित बेरोजगारांची वास्तव दाहकता मांडणारी कादंबरी ठरते.असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यिक अरविंदजी उतखेडे यांनी "कीड" या कादंबरीवर अध्यक्षीय भाषणातून बोलतांना केले.नव्या पिढीतील सुपरिचित लेखक श्री विशाल मोहोड यांच्या 'कीड' या कादंबरीचे प्रकाशन व निमंत्रितांचे कविसंमेलन अमरावती येथील श्री शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालयाच्या मुख्य सभागृहात साहित्य क्षेत्रातील नामांकित व्यक्तीच्या हस्ते रविवार दि.23 जून रोजी मोठ्या थाटात संपन्न झाले.

संवेदना बहुद्देशीय संस्था अमरावती, यशवंतराव चव्हाण सेंटर अमरावती विभाग व मराठी विभाग श्री शिवाजी कला, वाणिज्य महाविद्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या पुस्तक प्रकाशनाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध साहित्यिक अरविंदजी उतखेडे तर या प्रकाशन समारंभाचे मुख्यअतिथी म्हणून मा. डॉ.श्यामसुंदर निकम जेष्ठ लेखक तथा( माजी जिल्हा शल्य चिकित्सक) तसेचं प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध लेखिका व प्रमुख वक्त्या मा.प्रा.डॉ.शोभाताई रोकडे, श्री उद्धवजी शहाणे, जेष्ठ लेखक तथा रेखाचित्रकार,मा.प्रा. डॉ.वर्षा चिखले, मराठी विभाग प्रमुख श्री शिवाजी कला,वाणिज्य महाविद्यालय, मा.श्री प्रदीप देशमुख, कोषाध्यक्ष यशवंतराव चव्हाण, सेंटर अमरावती.मा. श्री संजय महल्ले, सुप्रसिद्ध लेखक तथा प्रकाशक अमरावती. आदी प्रमुख मान्यवरांची या प्रकाशन सोहळ्याला उपस्थिती होती.या प्रसंगी प्रमुख वक्त्या प्रा.डॉ.शोभाताई रोकडे यांनी "कीड" या कादंबरीवर आपल्या भाष्यातून प्रकाश टाकला. या प्रसंगी लेखक, संपादक विशाल कन्हेरकर, प्रा.डॉ.मंदा नांदूरकर यांचा त्यांच्या साहित्यिक कार्याची दखल घेत प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदिका ॲड.प्राजक्ता राऊत तर आभार प्रदर्शन सौ.आश्विनी वि.मोहोड यांनी केले.

त्यानंतर जेष्ठ कवी विष्णू सोळंके यांचे अध्यक्षतेत




निमंत्रितांचे कविसंमेलन अतिशय उत्साहात पार पडले कविसंमेलनाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ.शोभाताई गायकवाड,प्रा.डॉ.राजेश मिरगे,प्रा.डॉ.राजेंद्र राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. कविसंमेलनात मा.आबासाहेब कडू, ओमप्रकाश ढोरे, राजेश महल्ले, मंदा नांदूरकर, शीतल राऊत, गजानन काकडे, खुशाल गुल्हाने, विशाल कन्हेरकर, अजय अडीकने, सुयोग राजनेकर, गौरव कांडलकर, अंकुश वानखडे, कैलास कापडे, वर्षा भांदर्गे, सीमा भांदर्गे, अंजली वारकरी, अबोली अडीकने या निमंत्रित कवींनी पावसाच्या कविता सादर करून सभागृहातील रसिकांना चिंब भिजवून टाकले. या कविसंमेलनाचे सूत्रसंचालन सुयोग राजनेकर तर आभार प्रदर्शन अजय अडीकने यांनी केले. कार्यक्रमाला साहित्य क्षेत्रातील रसिक मंडळी आवर्जून मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# महाविकास आघाडीच्या नेत्यांना महिला कल्याणाच्या गोष्टी कधीच कळाल्या नाहीत : प्रवक्ते राम कुलकर्णी

## सत्ताधाऱ्यांनी मात्र मुख्यमंत्री लाडक्या बहिणीला अर्थसहाय्य केले

आधुनिक केसरी न्यूज



**अंबाजोगाई :** राज्यात आणि देशात सर्वाधिक काळ सत्तापदावर असताना शरदचंद्र पवार यांच्यासह काँग्रेसवाल्यांना आणि अलीकडे शिव उबाठा गटाला महिला कल्याणाविषयी कधी काही सुचलेच नाही. मात्र दोन वर्षात राज्यात सत्तेवर असलेल्या शिंदे-फडणवीस-पवार सरकारने महिलांना विकासाच्या प्रवाहात सोबत घेताना त्यांच्यासाठी राज्याची तिजोरीच खुली केली.महिनाकाठी मिळणारे 1500 रूपये हे त्यांच्या स्वावलंबी जीवन जगण्याला फार मोठी उपलब्धी असल्याची प्रतिक्रिया भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी दिली. अशा गोष्टी पुर्वी सत्तेत असताना विरोधकांना का दिसल्या नाहीत? हा सवाल देखील त्यांनी केला. प्रसिद्धीपत्रकात त्यांनी म्हटले आहे की, देशाच्या राजकारणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा उदय झाल्यानंतर महिला वर्गाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले. राजकारणासह विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम केवळ भाजपानेच केले. अनादि वर्ष ज्या काँग्रेसवाल्यांनी सत्तापदे भोगली. त्यांनी महिला सन्मानाचा विषय कधीच अजिंड्यावर घेतला नसल्याची टिका त्यांनी केली. मग त्यांना 50 टक्के आरक्षण असो किंवा कल्याणकारी योजना असो. राज्यात असलेल्या महायुतीच्या सरकारने तर माता-भगिनीसाठी तिजोरी खुली करून देताना लाडकी बहिण योजनेद्वारे 1500 रूपये प्रति महा जुलैपासुनच देण्याचा निर्णय काल अर्थमंत्री अजितदादा पवारांनी संकल्पाद्वारे विधानसभेत जाहिर केला. महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्य व स्वावलंबन आरोग्य पोषणासह सर्वांगिण विकासाच्या कल्याणकारी योजना जाहिर करताना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना जाहिर केली. योजने अंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील 21 ते 60 वयोगटात पात्र महिलाना शासन आता दरमहा 1500 रूपये देईल. हा निर्णय अतिशय क्रांतीकारी स्वावलंबी बनवणारा आहे. वास्तविक पहाता ज्या मंडळींनी सर्वाधिक सत्ता राज्यात आणि केंद्रात भोगली त्यांनी कधीच महिलांच्यासाठी अशा कल्याणकारी योजना आणल्या नाहीत. माय-बाप सरकार निर्णयक्षम असल्यानंतर सर्वसामान्य लोकांचा फायदा कसा होतो? याचे उत्तम उदाहरण म्हणजे लाडली बहिण होय. सामाजिकदृष्ट्या एकीकडे महिलांना नगण्य स्थान मिळत असताना त्यांची प्रतिष्ठा सन्मान वाढवण्याचे काम सत्ताधारी जेव्हा करतात एव्हाना गरजु आणि आर्थिकदृष्ट्या महिला वर्गांसाठी स्वतंत्र काही योजना जाहिर होते. तेव्हा लक्ष्मीच्या पावली त्या राज्यात आर्थिक सुबत्ता संपत्ती निश्चित वाढु शकते हे मात्र नक्की. शिंदे-फडणवीस-पवार सरकारनी मुख्यमंत्री लाडकी बहिण हातात घेतलेली योजना राज्यातील महिलांच्या जीवनमानासाठी भविष्यकाळात अत्यंत लाभदायक सन्मानपुरक ठरेल यात कुठलीही शंका नाही. केवळ हीच योजना नव्हे तर अर्थसंकल्पात काल आर्थिक स्वातंत्र्य आणि स्वावलंबन आरोग्य यावर आधारीत देखील काही योजना मंजुर झाल्या. राज्यात 6 लाख 48 हजार महिला बचत गट, त्यात वाढ करण्याचा निर्णय घेतला. बचत गटाच्या फिरत्या निधीच्या रक्कमेत पंधरा हजार रूपये केलेली वाढ आर्थिक सुबत्तेच्या दृष्टीने लाभधारक ठरणार. वर्षाकाठी तीन मोफत सिलेंडर पात्र कुटुंबाला देण्याचाही घेतलेला निर्णय ज्याला अन्नपुर्णा योजना असं नाव दिलं. शिवाय स्वयंरोजगार निर्मितीसाठी महिलांना ई-रिक्षा खरेदी करण्यासाठी 80 हजार कोटी रूपायांची केलेली निधीची तरतुद उपयुक्त ठरण्याचा दावा त्यांनी केला. प्रश्न हाच पडतो की ज्या विरोधकांनी महिलांच्यासाठी काही केलंच नाही तेच आता सरकारनं घेतलेल्या निर्णयाची थट्टा करतात म्हणजे गोरगरिब महिलांचा अपमान केल्यासारखं असल्याची टिका राम कुलकर्णी यांनी केली.

# मनपा कें. प्रा. व मा.शाळा एन-7 सिडको शाळेत पयाम-ए-इंसानियत फोरमतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप!


आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन सेवन सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेत पयाम ए इन्सानियत फोरमतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय शेख अहमद पटेल सर यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक माननीय शेख अहमद पटेल सर यांनी भुषवले. पयाम ए इन्सानियत फोरमचे पदाधिकारी अब्दुल हाई, तकियोद्दीन सिद्दिकी, मोहम्मद आवेज, मोहम्मद हुसेन, शेख अदनान हे सर्व पदाधिकारी सदरील कार्यक्रमास उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांच्या शुभहस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन मनोज अग्रवाल यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार श्री वेंकट जाधव सर यांनी मानले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती सुनंदा आरदवाड, श्रीमती अनिता शेटे,सौ.संगीता अंबेकर , श्रीमती मंगला महाजन,श्रीमती वैशाली सुरडकर,श्रीमती अंजली कुलकर्णी,श्रीमती सुनिता पाटील, श्री मनोज अग्रवाल, श्रीमती दीपाली औटे, श्रीमती शिल्पा बहुरे, श्रीमती वैशाली देशमुख,श्रीमती मंजुश्री राठोड,श्री वेंकट जाधव,श्रीमती शुभांगी चव्हाण, दीपक पडोळ,श्रीमती संपदा शिंदे,श्रीमती वंदना सुरडकर, श्रीमती पुष्पा दाभाडे, श्रीमती फिरदोस नदाफ, श्रीमती नादेरा सय्यद, श्रीमती सबा सिद्दिकी, इरफान सय्यद या शिक्षकांनी व रमेश देवडे, विजय गायकवाड,श्रीमती रेखा नाटेकर, शरद पाटील या सेवकांनी सहकार्य केले.



# तुकोबांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलं आहे. ग्यानबा तुकारामाच्या गजरात अवघा मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. मुख्य मंदिराला प्रदक्षिणा घालताच पालखीचा इनामदार वाड्यात पहिला मुक्काम असेल. तिथं रात्री आरती, मग कीर्तन होईल. लाखोंच्या संख्येने देहूत वारकरी दाखल झाले आहेत.

जगतगुरू संत तुकाराम महाजारांचा ३३९ वा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावात पार पडला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक देहूत दाखल झाले होते. ग्यानबा तुकाराम आणि ज्ञानोबा माऊली तुकारामाच्या गजराने अवघी देहू नगरी दुमदुमून गेली होती. काल पासून देहूत गर्दी झाल्याचं पाहायला मिळालं. इंद्रायणी तिरी वैष्णवांचा मेळा भरला होता. सकाळी इनामदार वाड्यात जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. तिथून टाळ मृदंगच्या गजरात मुख्य मंदिरात पादुका आणण्यात आल्या. काही वेळातच अश्व आणि दिंड्याचे देऊळ वाड्यात आगमन झाले. काल्याचे कीर्तन झाल्यानंतर ठीक पावणे तीनच्या सुमारास तुकोबांच्या पालखीने ग्यानबा तुकारामाच्या गजरात पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले. यावेळी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त होता. चोरीच्या घटना घडू नयेत म्हणून पोलीस फिरत होते.

# मुखेड तालुक्यात पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांचे लक्ष आकाशाकडे

आधुनिक केसरी न्यूज

**संजय कांबळे**

**मुखेड :** तालुक्यात मृग नक्षत्रात सुरुवातीला पाऊस पेरणी योग्य पडल्याने काही शेतकऱ्यांनी पेरणी करण्यास सुरुवात केली यात शेतकऱ्याने सर्वात जास्त सोयाबीन पिकांना पसंती दिली असून तालुक्यात मृग नक्षत्रात पर्जन्यमान कमी झाल्याने २४ जून पर्यंत शेतकऱ्याने ५३.६६ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. मुखेड तालुक्यात कृषी विभागाच्या वतीने दिलेल्या पेरणी अहवालाच्या माहितीनुसार तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र ९५ हजार ८७ हेक्टर असून यात लागवड लायक क्षेत्र ८१ हजार ८३२ हेक्टर आहे. यात तृण धान्यात खरीप ज्वारी १०६७, बाजरी २ हेक्टर पेरणी झाली तर गळीत धरण्यात सोयाबीन २६ हजर ८५९, तीळ ६१ हेक्टर कारळ / सुर्यफुल ३० हेक्टर तर नगदी पिके यात कापूस ६ हजार ७६ हेक्टर, नविन ऊस ३४२, खोड ऊस १ हजार ४५७ हेक्टर आहे तर हळद २३६ हेक्टर, फळबाग ३६५ हेक्टर, भाजीपाला ४१३ हेक्टर व इतर पीकामध्ये ४३९ हेक्टर पिके असून असे एकूण ४३ हजार ९१४ हेक्टरवर पिके असल्याची २४ जुन रोजीच्या अहवालानुसार माहितीप्राप्त झाली आहे. दरम्यान मृग नक्षत्र संपला असून पावसाचा जोर काही वाढलाच नाही. काही ठराविक भाग वगळता पावसाचे प्रमाण जेमतेमच आहे. तालुक्यातील जाहुर मंडळामध्ये २३ जून रोजी ७९ मि. मी. पावसाची नोंद झाली असून हा भाग वगवता इतर तालुक्यात पावसाचा रिमझिम सरी कोसळल्या आहेत, त्यामुळे शेतकऱ्याचे अर्धी पेरणी पूर्ण तर अर्धी पेरणी रखडली असून पेरणी झालेल्या शेतकऱ्यांनी व पेरणी राहिलेल्या शेतकरी आकाशाकडेच लक्ष देत देवांना पावसासाठी साकडे घालत आहेत.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# भूमिगत गटारीच्या कामात विलंब; रणजित राजेंचे आंदोलन

## पालिका व बीजेपीने कामात भ्रष्टाचार केल्याचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहराच्या देवपूर भागासाठी केंद्राने मंजूर केलेली १२३ कोटींची भूमिगत गटार योजनेचे काम पाच वर्षानंतरही पूर्ण झालेले नाही. २०१९ मध्ये योजनेचे काम सुरु झाले होते. योजनेसाठी देवपुरातील एसएसव्हीपीएस महाविद्यालयासमोर एक बाजुचा रस्ता गेल्या एक वर्षापासून खोदून ठेवला आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठी वाहतूकीची कोंडी निर्माण होते.

त्यामुळे शहरातील  शरद पवार गटाचे रंजीत राजे भोसले यांच्या नियोजनाने या ठिकाणी तीव्र मोठे आंदोलन करण्यात आले या ठिकाणी चालू असलेले काम बंद पाडण्यात आले खड्ड्यात उतरून निषेध करण्यात आला या ठिकाणी राष्ट्रवादीचे अध्यक्ष रंजीत राजे भोसले यांनी महानगरपालिका व भारतीय जनता पार्टीवर हल्लाबोल करण्यात आला या ठिकाणी होत असलेल्या गटारीच्या कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप देखील करण्यात आला त्या गटारीत भारतीय जनता पार्टीचे पक्ष चिन्ह गटारीत बुडवण्यात आले व घोषणाबाजी करण्यात आले. या ठिकाणी  रंजीत राजे यांनी सांगितले हे काम लवकर न झाल्यास अधिकाऱ्यांच्या घरासमोर आंदोलन करू असा इशारा या ठिकाणी देण्यात आला.



यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रणजीत राजे भोसले, जोसेफ मलबारी, भोला वाघ, भिका नेरकर, राजेंद्र सोलंकी, नंदू येलमामे, राजु डोमाडे, डॉमिनिक मलबारी, रामेश्वर साबरे, राजू मशाल, अमित शेख, दत्तू पाटील, कैलास भाऊ ,सोनू गुजर, राजेंद्र सोनवणे, ईश्वर जाधव, मंगलदास वाघ, जयश्री घेटे, आकाश बैसाणे, बंटी वाघ, दीपक देसले, दीपक देवरे, हर्षल जैन, चेतना मोरे, शकीला बक्ष, रवी पवार, अशोक गवळे, राजू चौधरी, सागर चौगुले,राजेंद्र चौधरी, प्रशांत बोरसे, गोरख शर्मा, उषा पाटील,संदीप पाटील, विकी धिवरे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी वाशी तालुक्यातून शंभर रुग्ण

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** वाशी महाराष्ट्राचे सार्वजनिक आरोग्य भूमिकल मंत्री तथा पालकमंत्री धाराशिव यांच्या वतीने मोफत नेत्र रोग तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये ज्या रुग्णांना मोतीबिंदू झालेला आहे. यांच्यावर पुणे येथे मोफत उपचार करण्यात येणार आहेत. त्यानुसार वाशी तालुक्यातील आतापर्यंत शंभर रुग्ण उपचारासाठी पुणे येथे रवाना झाले आहेत. मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी जाणाऱ्या रुग्णांना येण्या जाण्याची सोय तसेच तेथे राहण्याची जेवण्याची मोफत सोय मंत्री महोदय तानाजीराव सावंत साहेब यांच्या वतीने करण्यात आलेली आहे. आज सकाळी वाशी तालुक्यातील 68 रुग्ण शस्त्रक्रियेसाठी पुणे येथे गेले आहेत तसेच 32 रुग्णावर शस्त्रक्रिया मागील दोन दिवसापूर्वी झालेली आहे. शस्त्रक्रियेसाठी जाणाऱ्या रुग्णांना वाशी ग्रामीण रुग्णालयांमधून आज सकाळी 11 वाजता पाठवण्यात आले. यावेळी शिवसेना नेते नागजी नाईकवाडी, शिवसेना उपतालुकाप्रमुख विकास तळेकर, युवा सेना तालुकाप्रमुख प्रवीण गायकवाड, महिला आघाडी तालुकाप्रमुख अलकाताई भालेकर, हेमाताई कवडे, शहर प्रमुख सतीश शेरकर, युवा सेना शहरप्रमुख प्रकाश शेटे, शिवसेना गणप्रमुख राहुल आडमुटे, दिनकर शिंदे, डॉक्टर दयानंद कवडे, डॉक्टर महिंद्रकर, आदी, आरोग्य अधिकारी तथा शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# ऐन पावसाळ्यातही टँकरच्या संख्येत वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** विभागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या टँकरची संख्या यंदा पावसाळा सुरू होताच वाढली आहे. जूनच्या सुरुवातीला विभागात ९९ गावांना टँकरच्या साहाय्याने पाणीपुरवठा सुरू होता, ती संख्या आता १०५ वर पोहोचली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत ३४ गावांमध्ये टँकरचा आधार होता. पावसाळा सुरू होऊन तीन आठवडे उलटून गेल्यानंतर अमरावती विभागात दुष्काळाचे सावट दिवसेंदिवस गडद होताना दिसत आहे. गेल्या वर्षभरापासून पिण्यासाठी, पशुधनासाठी आणि शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याच्या बाबतीत मोठा प्रश्न नागरिकांसमोर उभा ठाकला आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत ३४ गावांमध्ये ३८ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत होता. यंदा मार्च अखेरीस केवळ बुलढाणा जिल्ह्यात २६ गावांममध्ये टँकरने पाणी पुरविण्याची वेळ आली होती. इतर जिल्ह्यांमध्ये टँकर सुरू करण्यात आले नव्हते. पण, आता अकोला वगळता विभागातील इतर चारही जिल्ह्यांमध्ये टँकर सुरू आहेत. सद्यस्थितीत बुलढाणा जिल्ह्यात ७४ गावांमध्ये ८१ टँकर, अमरावती जिल्ह्यात १४ गावांममध्ये १८ टँकर, यवतमाळ जिल्ह्यात १४ गावांमध्ये १४ तर वाशिम जिल्ह्यात ३ गावांमध्ये ३ टँकरमधून पाणी पुरविण्यात येत आहे. लढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा, चिखली, बुलढाणा, मेहकर, मोताळा, लोणार, सिंदखेड राजा, या सात तालुक्यांतील ७४ गावांना ८१ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

# बक्षिसातून विद्यार्थ्यांना दप्तरांचे केले वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** पारगाव, मागील काही महिन्यापूर्वी शाळेमध्ये झालेल्या विविध कला गुणदर्शन कार्यक्रमामधून मिळालेल्या बक्षिसाच्या पैशातून, त्याच शाळेतील विद्यार्थ्यांना आज दप्तर वाटप करण्यात आले. याबाबत सविस्तर माहिती अशी की वाशी तालुक्यातील जाणकापूर हे छोटसं गाव आहे. या गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये पहिली ते चौथीपर्यंत वर्ग आहेत. या शाळेमध्ये प्रत्येक वर्षी विविध कला गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यावर्षी झालेल्या विविध कला गुणदर्शन कार्यक्रम मध्ये महाराष्ट्र राज्याचे लाडके सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण मंत्री प्राध्यापक डॉक्टर तानाजीराव सावंत साहेब यांच्याकडून



11 हजार रुपये या कार्यक्रमासाठी देणगी देण्यात आली होती. या शाळेला अपेक्षेपेक्षा जास्त वर्गणी मिळाल्यामुळे कुठलाही आवाजावी खर्च न करता. या शाळेतील शिक्षक देशमुख मॅडम व सासवडे सर यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे दप्तर वाटप केले. या विद्यार्थ्यांना दप्तर वाटप प्रसंगी विकास तळेकर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक वाशी, राजा कोळी ग्रामपंचायत सदस्य पारगाव, चेतन तातोडे ग्रामपंचायत सदस्य पारगाव, भगवान वायसे माजी सरपंच जाणकापूर, लिंबराज वायसे, बाबासाहेब आटोळे, महेश कोकणे, अमोल कोकणे, आदी गावातील नागरिक उपस्थित होते.


शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर